# स्वामी उमानंद विशेषांक

**३१ डिसेंबर १९७९**

६३ वा वाढदिवस



'गुरु-प्रसाद-रुप'



‘ते हे चतुर्भुज कोमेली।
जयाची शोभा ररुपा आली
देखोनि नास्तिकी नोकिली। भक्तवृंदे।।’

# प्रकाशकांचे निवेदन

परम पूज्य ध्यानयोगिनी श्री कुसुमेश्वरी (आता स्वामी उमानंद सरस्वती) यांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या मंगल प्रसंगी "श्री कुसुमेश्वरी विशेषांक" दिनांक ३१ डिसेंबर १९७६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. त्या निमित्ताने स्वामी उमानंद यांचे अध्यात्मिक क्षेत्रातील उच्च स्थान, सिद्धयोग व कुंडलिनी जागृति या बाबतीत त्यांचा अधिकार व भक्तजनांच्या उद्धारासाठी त्यांचे अहर्निश चाललेले महान कार्य यांची माहिती प्रथमच लोकांना झाली. तसेच त्यांच्या अनेक प्रासादिक ग्रंथांची ओळख या खास अंकाने करून दिली.

या खास अंकास भक्तगणांकडून व जनतेकडून मिळालेला प्रतिसाद फार उत्साहवर्धक होता. कै. जी. एन. वैद्य, मुंबई हायकोर्टाचे माननीय न्यायमूर्ति, यांच्यासारख्या अध्यात्मातील अधिकारी व्यक्तींनीही परम पूज्य स्वामी उमानंद यांच्या अध्यात्मिक अधिकाराबद्दल गौरवोद्गार काढून त्यांना अभिवादन केले. खास अंक वाचून अनेक लोक मार्गदर्शनासाठी व सिद्धयोगाच्या दीक्षेसाठी त्यांच्याकडे येऊ लागले. अनेकांनी त्यांच्याकडून दीक्षा घेऊन आपले जीवन कृतार्थ केले.

खास अंक प्रसिद्ध झाल्यानंतर, परम पूज्य ध्यानयोगिनी कुसुमेश्वरी यांना गुरुदेव मुक्तानंद परमहंस यांनी संन्यासदीक्षा देऊन "स्वामी उमानंद सरस्वती" हे नाव दिले. मध्यंतरीच्या काळात सिद्धयोगास सहाय्यभूत होणारे अनेक प्रासादिक ग्रंथ परम पूज्य स्वामी उमानंद यांनी लिहिले आहेत. त्यांची ओळखही जिज्ञासूंना करून देणे जरूरीचे आहे. "श्रीगुरुचरित्र बोधेश्वरी खंड २." हा त्यांचा ग्रंथ आम्ही नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यांनी श्रीज्ञानेश्वरीवर लिहिलेले इंग्रजी भाष्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध व्हावयाचे आहे. परम पूज्य स्वामींच्या गुरुप्रासादिक, दैवी वाणीतून प्रगट होणारा हा ग्रंथ इंग्लिश भाषेचे भूषण ठरणार यात शंका नाही. त्यांच्या जुन्या व नव्या ग्रंथ-संपदेची ओळख लोकांना करून देणे जरूर आहे. शिवाय अनेकांनी परम पूज्य स्वामींच्या अध्यात्मिक कार्याबद्दल, अध्यात्मिक जीवनाबद्दल जिज्ञासा व्यक्त केली आहे. 'श्रीकुसुमेश्वरी विशेषांका'च्या सर्व प्रती संपल्यामुळे मुमुक्षु जनांच्या व शिष्यवर्गाच्या इच्छेस अनुसरून आम्ही हा 'स्वामी उमानंद विशेषांक' परम पूज्य स्वामींच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध करीत आहोत.

सर्वच दृष्टींनी 'विशेष' आहे हा अंक. श्रीकुसुमेश्वरींनी संन्यासदीक्षा घेतल्यानंतरचा हा अंक. एका संसारी स्त्रीने वैतागाने नव्हे, वैफल्याने नव्हे, वैराग्य महापावक प्राप्त झाल्याने घेतलेला, त्यांचा वैभवाला निदर्शक बनलेला हा संन्यास. स्त्रियांच्या इतिहासातला विशेष वैशिष्ट्यपूर्ण, अपवाद घटना आहे. श्रीकुसुमेश्वरी विशेषांकात ईश्वरसाक्षात्कारापर्यंत पोचलेल्या कुसुमेश्वरी स्वामी उमानंदांच्या रूपाने नियतीने नेमून दिलेले अवतारकार्य पार पाडण्यासाठी विश्वजीवनात अवतरल्याची ग्वाही 'स्वामी उमानंद विशेषांकाने' दिली आहे. (दीपलक्ष्मीला दिलेली मुलाखत वाचा.) ३१ डिसेंबर १९७६ ते ३१ डिसेंबर १९७९ अवधी तीन वर्षे. या ३ वर्षांच्या अल्पावधीच्या कारकीर्दीत परम पूज्य स्वामींच्या हातून इतकी महान कामगिरी घडली आहे की त्या कामगिरीचा, कार्याचा परिचय करून देण्यासाठी, गुरुकृपा काय नोहे! हे दाखविण्यासाठी, स्वामी उमानंद विशेषांकाचे प्रकाशन आम्हास हाती घ्यावे लागले. गुरुकृपेनेच हे महद्भाग्य आम्हांस लाभले. सारी गुरुलीला.

श्रीकुसुमेश्वरी विशेषांकाच्या वाचकांकडूनही या अंकाचे उत्स्फूर्त स्वागत होईल अशी खात्री आहे. कारण या अंकाचे अंतरंगच तसे आहे. परम पूज्य स्वामी उमानंदांचे चरित्र, त्यांच्या गुरुप्रासादिक ग्रंथांचा परिचय करून देणारी त्यांची वाङ्मयमूर्ती, "उमानंदवागीश्वरी", प्रश्नोत्तरी, पत्र-संकलन, मुलाखत आणि "गुरुचरित्र दाविले नयनी" सर्वच लेख एकापेक्षा एक सरस, मनाची पकड घेणारे. या लेखांचा अभ्यास केला तर परम पूज्य स्वामींच्या अलौकिकत्वाची, दैवी सामर्थ्याची आणि यौगिक बळाची थोडी तरी ओळख होईल. आकाशाचा अंत कोणाला कळणार? समुद्राची अथांगता कोणाला मापता येणार? स्वामींच्या सामर्थ्याची खरी ओळख कोणाला होणार? अपूर्णांनी पूर्णाच्या पूर्णतेची पहचान कशी करावी?

तरीही भक्तिभावाने, भक्तांनी वाहिलेल्या भावपुष्पांचा भक्तिसुगंध या अंकात भरून राहिला आहे. त्याच्या दरवळीनेच वाचकांचे मनोमधुप या अंकावर लुब्ध होऊन परम पूज्य स्वामींच्या पदांबुजदुगी रममाण होतील असा विश्वास आहे.

विशेष आनंदाची गोष्ट ही की याच विशेषांकाबरोबर प. पू. स्वामींचे Jnaneshwari As Understood व "श्रीगुरुचरित्रबोधेश्वरी" खंड तृतीय व चतुर्थ (एकत्र) हे दोन अलौकिक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. हे गुरुभक्त वाचकांचे अहोभाग्यच! हे दोन्ही ग्रंथ अध्यात्मपथावर अचूक मार्गदर्शन करणारे ज्ञानदीपच!

ज्ञानेश्वरी हा सिद्धयोगावरील ग्रंथ. परंतु उपलब्ध असलेल्या इंग्रजी ग्रंथांतून ज्ञानेश्वरीचे यथार्थ दर्शन या दृष्टिकोणातून घडविले गेलेले नाही. हीच उणीव प्रामुख्याने "Jnaneshwari As Understood." या सिद्धयोगी स्वामी उमानंद यांच्या गुरुप्रासादिक ग्रंथाने दूर केली आहे. विशेषतः इंग्रजी भाषिकांना ज्ञानेश्वरीचा सखोल अभ्यास करण्याची अपूर्व संधी या ग्रंथाने उपलब्ध करून दिली आहे.

हे दोन ग्रंथ म्हणजे प. पू. स्वामी उमानंदांनी आपल्या वाढदिवसाच्या मंगल प्रसंगी भक्तसाधकांना दिलेली अध्यात्मिक मेजवानीच! आणि त्यांच्याच शब्दात त्यांच्या गुरूंची "गुरुसेवा."

सद्गुरुनाथ महाराज की जय।

सर्व हक्क सुरक्षित

स्वामी मुक्तानंद विशेषांक

श्रीगुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्ट
अ-१०, शिवानंद नगर, चकाला,
अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०० ०६९

संपादक मंडळ
संपादिका : जीजी
सहसंपादिका १) सौ. खेडकर
२) माधुरी गोडसे

प्रकाशक
श्रीकुलुगेश्वरी प्रकाशन,
अ-१०, शिवानंद नगर, चकाला,
अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०० ०६९

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव,
मुंबई-४०० ००४

किंमत पंचवीस रुपये

३१ डिसेंबर १९७९

| भगवान नित्यानंद | ओम | गुरुदेव मुक्तानंद |
| --- | --- | --- |
| प्रसन्न | ॥ श्रीगुरुदेव ॥ | प्रसन्न |


छापता छापता—

प. पू. गुरुदेव स्वामी मुक्तानंद, अमेरिकेहून श्री. दादासाहेब यंदे ह्यांच्याशी बोलताना म्हणाले, "तिला (स्वामी उमानंद) सांग की तू फार उत्तम कार्य करीत आहेस. तू गुरुचे ऋण फेडले आहेस. मी खूष आहे. माझे तुला पूर्ण आशीर्वाद आहेत."

दिनांक २७-१२-७९

# अनुक्रम


| | |
|---|---|
| श्री गुरुदेवांचे आशीर्वाद | १ |
| मुक्तानंदांना मानवंदना | २ |
| गुरुनदी विसर्जन । मुक्तानंदी सामावणं | ३ |
| संपादकीय | ४ |
| अनयाचा आनंदे । धर्मदिसे ॥ | ६ |
| गुरुदेव मुक्तानंद म्हणे | १५ |
| श्री उमानंद चरित्र योगेश्वरी | १९ |
| प्रसिद्धी झाली अपरंपार | २२ |
| पत्रसंकलन | ३० |
| सत्संगीच्या डायरीतील काही पानें | ३६ |
| श्री उमानंद योगीश्वरी | ४६ |
| प० पू० स्वामी उमानंदांची वाङ्मयमूर्ती | ५४ |
| श्री गुरुभक्ती—योगेश्वरी | ५७ |
| परमपूज्य स्वामी उमानंदांचे प्रकाशित ग्रंथ | ५९ |
| श्री गुरुदेव ध्यान मंदिर व आश्रम | ६० |
| दृष्टान्तेश्वरी | ६५ |
| श्रीगुरुचरित्र वाचिले नयनीं । | ७० |
| प्रश्नोत्तरी | ७८ |
| गुरुची ओढ, गुरुकृपा, गुरुध्यान | ८७ |
| गुरु गोविंदा | ११९ |
| जयो ऽ स्तुते | ११६ |
| आरती | ११९ |



भगवान श्रीनित्यानंद प्रसन्न !



गुरुदेव श्री. मुक्तानंद प्रसन्न !

# श्री गुरुदेवांचे आशीर्वाद

यह हर्ष की बात है कि सौ. कुसुमताई शर्मा की षष्ठ्यब्दपूर्ति के शुभ अवसर पर एक स्मृतिग्रंथ प्रकाशित हो रहा है। अपने गृहस्थ-जीवन की सभी जिम्मेदारियों को सफलतापूर्वक निभाते हुए अध्यात्म क्षेत्र में भी एक प्रशंसनीय स्थान प्राप्त किया है जो सर्वसाधारण गृहस्थियों के लिये अपने आप में एक आदर्श है।

आप जनता के लिये बहुत अच्छा कार्य कर रही हैं। लोगों को गुरुभक्ति की ओर प्रेरित कर रही हैं। छोटे-बडे, बालक-वृद्ध सब को ध्यान मार्ग में लगा रही हैं। श्री गुरुदेव के ध्यानक्रांति कार्य में आप का योगदान उल्लेखनीय है।

आप एक मेधावी, बुद्धिमान व कुशल संगठनकर्ता है। बम्बई में श्री गुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्ट की स्थापना और उसका संचालन आपकी कुशलता का एक प्रमाण है। आप वेदान्त की अच्छी ज्ञाता एवं प्रचारिका हैं।

ध्यान सब मानवों के लिये हैं। ध्यान सार्वभौम साधन है। "ध्यानेन आत्मनि पश्यन्ति." ध्यान से आत्मदेव का सहज साक्षात्कार होता है। संसार में विचरते हुए, अपना प्रपंच, कामधंधा सम्हालते हुए सभी छोटे-बडे, अमीर-गरीब, विद्वान-अपढ सभी ध्यान कर सकते हैं।

किन्तु यह ध्यान बहुत सम्मान से, बहुत मर्यादा से करना चाहिये उसमें पवित्रता होनी चाहिये। अतः स्वच्छ और पवित्र देह मन से ध्यान करो। इसके लिये कुछ त्यागने की जरूरत नहीं है। अगर त्यागना हो तो अभिमान त्यागो, अहं को त्यागो।

यह ध्यान गुरुकृपा से सहज सुलभ होता है। अतः गुरु की शरण लो। उनका अनुग्रह प्राप्त करो। उनके साथ ध्यान करो। मात्र मूर्ख गुरुओं से बचना। विवेक बुद्धी से गुरु करना। गुरु करने में जल्दी नहीं करना। अंतर समझ से गुरु करना। कुछ गुरुलोग ऐसे होते हैं कि जो कृष्ण की गीता छोडकर अपनी गीता कहने लगते हैं। इसलिये पानी पीना छान के, गुरु करना पहचान के।

साधकों को और एक बात का विशेष ख्याल रखना चाहिये। कुछ साधक अपने को गुरु से भी अधिक सयाना समझने का प्रयास करते हैं। इससे आगे चलकर उनके पतन का खतरा रहता है।

इतना पथ्य सम्हालकर अगर तुम सत्यनिष्ठा से ध्यान करोगे तो सहज में संसार से तर जाओगे। इति आशीर्वाद।

—स्वामी मुक्तानंद

*

गुरुच्या देहाची जडणघडण जन्मोजन्मी चालू असते. गुरुचा देह म्हणजे नियतीची नामी कलाकृती.

*

गुरुभाव परमतीर्थ, गुरुपेक्षा गुरुभाव श्रेष्ठ.

*

गुरु जगतो कसा त्यापेक्षा मरतो कसा हे बघावे.

*

सिद्धयोग हा सिद्धियोगच आहे. येथे सर्व सहज घडते.

*

जोपर्यंत अंतः आतषबाजीचा आनंद नाही तोपर्यंत बाह्य आतषबाजीतच मन रमणार.

*

ॐ श्रीगुरुदेव

सद्‌गुरुनाथ महाराज की जय!

परम प्रिय, परमपूज्य विश्वात्मक जगद्गुरु नित्यानंदी

# मुक्तानंदांना मानवंदना

गुरुदेवांना कोटी कोटी नमस्कार! गुरुदेवा! आमचे हे केवढे महत् भाग्य की आज आपले पतितपावन चरण आमच्या श्रीगुरुदेव ध्यान मंदिराला लागले. आपल्याच कृपेने ध्यानमंदिराची स्थापना झाली. आपल्याच आशीर्वादाने गुरुमूर्तीची स्थापनाही झाली. त्याबरोबरच आमचा हा जनशीटला, स्वतःच्याच पदराचा, चिमुकला आश्रम आपले पवित्र निवास-स्थान व्हावे, ही आमची एकमेव इच्छाही आज आपण पुरी केलीत. आमच्यापाशी जे काही आमच्याजवळ आहे ते आपल्या चरणी समर्पण करून आज आम्ही धन्यता पावलो आहोत. ही सारी आपलीच लीला, आपलीच कृपा. असेच आम्हा अजाण लेकरांना सदैव सांभाळून घ्यावे हीच ह्या मंगल दिनी आमची नम्र प्रार्थना.

ह्या कलियुगाला वरदानच आहे की गुरु भेटेल आपैसा. त्यातही जेथे गुरुंना अहोरात्र जयजयकार, आरती, गुणगान होते तेथे तर गुरुला आपणहून वळणवारी करून यावेच लागते असे गुरुचरित्र सांगते. कारण कलियुगाचे एकमेव दैवत गुरुच. गेली दहा वर्षे आमच्या हातून जे काही आपले स्मरण झाले त्याचेच हे फळ आमच्या पदरात टाकायला आपण ही तसदी घेतलीत अशी आमची दृढ श्रद्धा आहे. म्हणूनच आम्ही शिबिरांच्या द्वारा, पाठीमागे आपण उभारलेले पाठीराखे फोटो व पुढे आपल्या तीर्थरूप गुरुचरणांना साक्षी ठेऊन, सर्व जगाला गरजून सांगत होतो की आजच्या युगाचे दैवत गणेशपुरीला प्रत्यक्ष प्रगट झाले आहे. गाणगापूर व गणेशपुरी दोन नाहीत. कारण 'तूचि दत्त' असे आपणच भगवान नित्यानंदांना संबोधिले आहे. बाबा सुखी जीवनासाठी आपली गुरुभक्तियोगाची युक्ती ही खरोखरच अभिनव आहे. ज्यांना आपला सहवास दुर्मिळ अशा आमच्या सारख्या संसारी जनांना, त्यात पारंगत व्हायला बराच अवधी हवा. त्यामुळे गुरुसेवा, गुरुआज्ञापालन आदि गुरुभक्तिशास्त्राचे पैलू, अज्ञानामुळे आमच्या हातून चुकत माकत व्यक्त होत असतात. पण आपण खरेच आमची माऊली, कृपेची साऊली आहात व म्हणूनच प्रत्येकवेळी आपण आम्हाला सावरून धरता, सुधारता.

गुरुदेवा, लहान बालकापासून तो तरुण, वृद्ध स्त्रीपुरुषात आपल्या फोटो-द्वारा, मूर्तीद्वारा होणारा चमत्कार पाहून अनुभवणारा, बघणारा, सर्वच महद्‌आश्चर्यचकित होतात. सिद्धगुरुचा हा सिद्धयोग, सहजयोग बहुजन समुदायाला अगदी अपरिचित व म्हणूनच नवीन आहे. पण लिफ्टसारखा गुरुचा उपयोग होतो हे आमच्यासारख्या सुखी गुरुभक्त प्रापंचिकाकडे पाहून, लोकांना पटायला वेळ लागत नाही. मग गणेशपुरीचा पत्ता सारी जनता विचारू लागते ह्यात काय आश्चर्य! गुरुदेवा, अपार कृतज्ञताबुद्धीने भारावून गेल्यामुळे रहावत नाही म्हणून आम्ही सांगतो की आपणच आमचे बोलविते धनी सदैव होता, व श्रोत्यांना भारावून टाकता. मग श्रोते उत्स्फूर्तपणे सहजच उद्‌गारतात, "केवढी ही पूर्ण गुरुकृपा! अधि-काराचा प्रश्नच नाही." आपणच स्वीकार, आम्ही सर्व आपले लाडके स्वीकार, केवळ माईक व पाईक झालो आहोत.

खरेच बाबा, दुनियेत गुरुजनांना तोटा नाही, अमाप पीक येत आहे. पण आपल्याकडे आल्यापासूनच आम्ही गृहस्थी मुलेबाळे असलेले सामान्य संसारी लोक पूर्ण सुखी झालो आहोत, ह्यात मुळीच संदेह नाही. श्रीगुरुदेवध्यान मंदिराचे हे सुमारे ८०० पुजारी ह्याची एकमुखाने साक्ष देतील. नित्यमुक्त आनंदाच्या चालत्या बोलत्या जाहिरातीच आम्ही झालो आहोत. अशीच आम्हा अज्ञाण्याहून अज्ञाणी असलेल्या भक्त भक्तांवर सदैव आपल्या कृपेची पाखर असो. आपल्यासारखा नित्यानंदी मुक्त आनंदरूप सिद्धगुरु असता पाठीराखा! इतरांचा लेखा करण्याचे कारणच काय! गुरुकृपा काय नोहे ह्याचा अनुभव असलेल्या साध्या भोळ्याभावड्या हृदयांची ही आर्ती, ही मानवंदना स्वीकारून, आम्हाला आपल्या चरणी सदैव विसावू द्या

देचि दान दे गा, गुरुदेवा!

सर्वस्वी आपलेच नम्र भक्त
श्रीगुरुदेव ध्यानमंदिराचे आबालवृद्ध पुजारी.

सद्‌गुरुनाथ महाराज की जय!

(स्वामी उमानंद)

•

सारता माळ्याला कांदा-लसूणीतही दंडरी दिसायची. हे ईशसृष्टीतील पदार्थ आहेत चितीचीच रूपे आहेत हे समजले तर त्रास होणार नाही.

•

# गुरुपदी विसर्जन । मुक्तानंदी सामावणं ।।

मित्र गुरुभक्तांनो ! गुरुभक्ती चढती वाढती होण्यासाठीच हे सारे उपक्रम, साधन, साध्य नव्हे. साठ वर्षे जे साठवलं तेच साठी उलटल्यावर साठा म्हणून उपयोगी पडणार. साधनेचा साठा किती साठवला त्याचा हा वाढदिवस. गुरुला आठवत आठवत जीवन जगण्यानेच तो साठा साठवला जातो. साठवण आहे तेथे संचय आहे. पुढील प्रवासाची शिदोरी आहे. वशी न ज्याची जितकी भर तशी भरभराट.

गुरुआज्ञापालन हेच शिष्याचे जीवन. गुरुआज्ञापालनाने गुरुस्मरण अखंड होते. गुरुदर्शीत मार्गाने गेले की साठी केव्हा उलटते तेही समजत नाही. 'वीशवर्ष्याले मिठी नुठी लाठी' झाल्याने बुद्धी नाठी होण्याचा प्रसंगच गुरुकृपेने येत नाही. गुरुकृपेच्या डोलीत बसून मजेत डुलत डुलत आयुष्याची चढण न कळत चढली जाते.

गुरुभक्तीची गंगा वळणावर वळत वळत एकेक वर्ष मागे टाकत गुरुकृपावर्षावात वयाची साठी गाठताच गुरुकृपा सागराला मिळावी हेच कोणत्याही गुरुभक्ताचे ध्येय, साध्य असणार. गंगा सागराला मिळाल्याची खूण आश्रमरूपी गंगासागर निर्माण होणे. मग 'ए पाणीवाला, ए पाणी-वाल्या !' ओरडत वणवण फिरणं संपते व जीवनाचीच पाणपोई घातली जाते. तृषार्त साधकांची सोय होते.

आता गुरुदेवा ! हेचि दान द्या, की गुरुपदी पूर्ण विसर्जन व्हावे. थोडेसुद्धा वेगळेपण उरू नये व मुक्तानंदी पुरे सामावून जाणे घडावे.

सर्वस्वी गुरुकृपांकित कुसुमेश्वरी

स्वामी उमानंद

स्वामी उमानंद

*

आकाराला महत्त्व नाही. कोणत्याही आकारातून शक्ती व्यक्त झाली तरी शक्ती ती शक्तीच !

*

आत्म्यावरील आवरण अनावरण करण्याचे सामर्थ्य फक्त मानवातच आहे. इतर प्राण्यात नाही.

*

आप्तस्वकीयांचा मोह महाभयानक असतो. अर्जुन महायोद्धा पण आप्तस्वकीयांच्या मोहात सापडला म्हणून किंकर्तव्यमूढ झाला.

*

मन वाऱ्यापेक्षाही वेगवान असते. पण ज्ञानी माणसाच्या मनाची धाव त्याच्याही पुढं ! साध्याकडे प्रथम त्याचे मन धाव घेते मग व्यवहाराची पातळी, साधनसामुग्रीची जुळवाजुळव नि तीही सहजच. मुद्दाम काहीच करावे लागत नाही.

*

क्षमा मागण्यासही मोकळं अंतःकरण पाहिजे. क्षमाही मोकळ्या मनालाच करता येते.

*

॥ ॐ श्री गुरुदेव ॥

# संपादकीय

परमप्रिय परमपूज्य ताई,

कोणत्या तरी दिव्य पूर्व सुकृताने आपल्या चरणभेटीचा योग आम्हा भक्त साधकांना लाभल्यापासून ज्या एका मानसिक समाधानात आणि सहजपणे सुखाचे अनुभव घेत आम्ही जगत आहोत ती दिव्य किमया आम्हांस अगम्य आहे.

ही किमया आपलीच आहे; साक्षात् गुरुप्रीतीचे हे बरसणे आहे. आपण गुरुदेवतेचा यथार्थ बोध देणाऱ्या 'गुरुत्वसिद्ध' शिष्य आहात की जो स्वतः प्रपंच परमार्थाचा मार्ग सुगम करून स्वतः चालून आला आणि इतरांची वाटच नव्हे तर चालही सुगम करू शकला.

ताई, आईने मुलाच्या चालीने चालावे, प्रसंगी उचलूनही घ्यावे इतके प्रेम पोटी ठेवून जेव्हा जेव्हा आपण साधकभक्तांना सांभाळू पाहता तेव्हा तेव्हा गुरुदेवतेच्या करुणामय मांगल्याचे दर्शन घडून त्या प्रेमबोधानेच आम्ही निश्चित होत असतो. रंग, सुगंध फुलांतून सहजच असतो तसा परमार्थ प्रापंचिकांना सहज सुलभ आहे याचा प्रत्यय आपण आणून देता. आकाशात भरारी, जलात तरंग, वेळूत सूर, चंद्रात चांदणे, सूर्यात प्रकाशकिरण इतके एकत्व वस्तुतः सर्वांचेच सद्गुरुंशी असते, हे आपणच दाखविता.

बंद खिडकी बाहेरच्या सूर्योदयाचे शाब्दिक वर्णन करावे तसे अध्यात्म-शास्त्राची ग्रंथांनी शोधून चर्चा करणारी विद्वानमंडळी पुष्कळ आहेत. कोणत्याही गुरूचा यथार्थ शिष्य न होता मार्गदर्शकाचा आव आणून अज्ञानाचा गुरु बनणारेही असतात. परंतु खऱ्या सावध भक्तीच्या, खऱ्या तळमळीच्या साधकांना मात्र असाच खराखुरा सद्गुरु भेटतो की जो बंद खिडकी उघडून तुम्हीच सूर्योदय पाहा म्हणतो. खिडकी उघडूनही देतो. ताई, आपणाशिवाय गुरुभक्तीची भावतरंगी पवित्र पहाट व सद्गुरुबोधाचा दिव्य तेजोरश्मी आमच्या बळाने आम्ही पाहू शकलो नसतो.

ताई,

सद्गुरुचरणी खेळणारी पोरसुद्धीची आम्ही बाळे बोधहस्यांकडेही किलकिल्या डोळ्यांनीच पाहणार. आमची समजही तोकडीच असणार. तोकड्या दल-फुलांची भावपूजा पाहून गुरुमाऊली आनंदित व्हावी व भक्तातच रमून जावी यास उपमा कोणती? बाळाच्या मुखाएवढा काऊचिऊचा घास भरविणारी आई त्याच्या बालक्रीडा सहन करीत भरवीतच राहते. व स्वतः तृप्तीने भरून जाते. अगदी तस्सेच, आपण गुरुबोधाचे ढवळले घास आम्हा अर्ध्या कच्च्या सदोष साधकांना मायेने भरवीत असता आणि सर्वांसह, सर्वांतर्यामी तृप्तीने नांदता.

ताई,

वनश्रीतले साधू, मठातले संन्यासी, गुहेतले तपस्वी, हिमालयातले योगी हे सामान्य प्रापंचिकांना आदरणीय, पूजनीय असले तरी दूरचे वाटतात, गूढ वाटतात, परंतु प्रपंचात राहून जनसामान्यांतही साधना घडते व गुरुभक्तीने परमार्थाचे पूर्णत्व अगदी सहज लाभू शकते हे आपण आपल्या उदाहरणाने सिद्ध केले आहे. एक सुशिक्षित, सुसंस्कृत गृहिणी प्रपंच नीटपणे करून सद्गुरुकृपेने उच्च कोटीची महान योगिनी कुण्डलेश्वरी बनू शकते, एवढेच नाहीतर 'गुरुत्वसिद्ध' अधिकाराने इतरांसही घडवू शकते हे आपण सध्या जे गुरुकार्य करीत आहात त्यावरून लक्षात येईल. सामान्य प्रापंचिकांना, मुमुक्षु साधकांना, 'सद्गुरु संदेशे' आपण फार जवळचे वाटता ते यामुळेच होय. माजघरात हृदयात मोकळे व्हावे इतक्या खेळकरपणे, सहजपणे आपण आत्मबोध करता. आपले चरणी आम्हांस हक्काचे माहेरघरच वाटते. परीक्षा संपवून सुटीत नानादिशांनी मुलांनी घरी एकत्र जमावे तसे नानामार्गांनी जन्मजन्मी चालून आपणाठायी आम्ही कायमचे विसावलो आहोत.

आपणाबरोबर प्रवचने, शिबिरे, ध्यानकेंद्र, उत्सवादी, गुरुपूजनादी कार्यक्रम यातून आम्ही सहली केल्या तेव्हा आपणाठायी असलेली गुरुत्व-सिद्ध दिव्यता नानाप्रकारे आम्हास अनुभवास आली आहे. खरी गुरुपरंपरा, गुरुभक्ति, गुरुसेवाकार्य, गुरुमयजीवन यांचा निश्चित अर्थ आपण दाखविल्यानेच आम्ही धोक्याचे वळणे, संशयाच्या खोल दऱ्या व आत्मघातकी कडे यांपासून सावध राहू शकलो. उच्चभ्रूंचे कृत्रिम जीवन आणि कष्टकऱ्यांचे दारुण जगणे आपण पूर्ण निरीक्षले असल्याने गुरु-भक्तीनेच जीवनात सुखाचा अमृतवर्षाव होऊ शकतो हे सत्य आपण स्वतःच्याच उदाहरणाने दाखवून देत आहात, 'यत्र ध्यान तत्र सर्व।' हे आपले जीवनचरित्र होय. आपण सद्गुरुभक्तीच्या आदर्शाची परिसीमा आहात.

ताई,

आपल्या साधनकाळात स्वामी चिन्मयानंदासारख्या ज्ञानगुरुकडे आपण योगायोगाने आकर्षिले गेलात. तिथे योग्य साधनेचा पाया भक्कम झाला. त्यांचे प्रेम, विश्वास आपण संपादू शकलात. साधनेत खूप मजल मारलीत, इतकी की परमेश्वर आपला ऋणी झाला. मग अधिक उशीर न लागता आपली व दीक्षाकर्त्या सिद्धसद्गुरुंची भेट झाली. नित्यानंदांची परंपरा सिद्ध करणारा हा महापुरुष म्हणजे भगवान स्वामी मुक्तानंद परमहंस होत. स्वामीजींचा आशीर्वाद व साक्षात् गुरुकृपा यांचे बळाने आपले आध्यात्मिक जीवन उजळून निघाले. पुढचा दिव्य मार्ग खुला झाला. पूर्ण प्राप्तीची वाटचाल सहजसाध्य झाली. गुरुभक्ती या अनमोल साधनेने

आपण गुरुदैवतांशी पूर्ण तन्मय झालात. दिव्य प्रेमरज्जूंनी एकजीव, एकरस झालात. इतके की स्पंदन, श्वास, अंतर, प्राणही जुळून गेले. एवंच, गुरुपरंपरासिद्ध करणारे आपण महान भूषण ठरला आहात.

ताई,

मुक्तानंदबाबा आणि आपण हा समसमा गुरुशिष्य संयोग म्हणजे जनार्दन एकनाथांची आधुनिक काळातील पुनरावृत्ती होय. गुरुभक्तीयोगाचे विश्वव्यापी प्रसारकार्य तडफदार शिलेदाराच्या रुबाबात बाबा करीत असून तो जणू विश्वकल्याणाचा कडेकोट बंदोबस्त आहे. शक्तिपातकुशल दीक्षाकर्त्या जगद्गुरूंची या युगी ही मेहेरनजरच. आयुष्यभर 'गुरुसेवा' करणाऱ्या ताई, जेव्हा बाबांच्या पुढे मांगल्याचा चिन्मयकलश घेऊन आपली दिव्य पावले पडू लागतात तेव्हा साहजिकच बाबांचे दोन्ही हात ईश्वरीय उन्मादाने, आवेशाने विश्वाला पूर्ण अभय देण्यासाठी आनंदाने उचावतात. आजच्या युगाची परीपूर्ण सुनील गुरुदेवता ती हीच नव्हे काय?

दत्तात्रेय शिष्य परंपरा। सहस्रार्जुन यदु दुसरा।
जनार्दन तिसरा। शिष्य झाला खरा कलियुगी॥
नित्यानंद तू चि दत्त। मुक्तानन्द वचन हे गुप्त।
मुक्तानंदच जनार्दन सत्य। ओघानेच सिद्ध॥
जनार्दन शिष्य एकनाथ। एकनाथेश्वरी कुसुमेश्वरी सांगतात।
मुक्तानंद सच्छिष्य गात। परंपरा ही गुरूची॥

गुरुपरंपरेच्या मार्गेत ताई, हीच महति माविल्याने आम्हीही उद्धरून जाणार आहोत.

ताई,

आपणास आज ६३ वर्षे पूर्ण झाली. परंतु वय फक्त कायेला असते. आपली काया तर केव्हाच तनु झाली. आपण गुरुभक्तीची साक्षात 'दर्शनी हुंडी' असल्याने आपले वय ६३ वर्षे पूर्ण झाले हे जणू स्वप्नातले अनुमान होय. आपली कांती, तेज, डोळे, उत्साह, ऊर्ध्व जटाभार आणि दिव्य मंदलमुद्रा पाहताच साधकही आपल्या सहवासातली वर्षे काही तासांचीच असल्याचा अनुभव घेतात. खरोखर आपण साक्षात चितीभगवती व परंपरेची पूर्ण कृपाशक्ति आहात. गुरुभक्ति-योगेश्वरी कुसुमेश्वरी हे आपले यथार्थ वर्णन आहे. अजूनपर्यंत जग आपणास गुरुभक्तिपरायण योगिनी कुसुमेश्वरी म्हणून ओळखत असे तरी यापुढे स्वामी उमानंदांचा परिचय जगाला करून घ्यावा लागणार आहे. संन्यास दीक्षेनंतर आपण श्री. कुसुमेश्वरीच्या स्वामी उमानंद झालात तरी आपण आमच्या ताईच आहात. आपणच आमचे जग आहात, जिथे नित्यानंद मुक्तानंद कृपाधारा जगदुद्धारा वहात आहे. गुरुमाऊलीच्या वात्सल्याने आपण आम्हास सद्गुरुबोधाच्या दिव्य चरणांशी ठेवावेत यातच आमचे जीवितसाफल्य आहे. इथे सद्गुरुप्रेरणेनेच सद्गुरु गायिला आहे नानाविध सुरांचेच संगीत व्हावे, नानाकिरणांनी प्रकाश तेजाळावा तसे आपलेच लीलामयी स्वरूप आमच्या मनोमानसी प्रगटत जाते. हा विशेषांक सद्गुरु अंकावरील बालकांचा चिमणा खेळ असला तरी आपल्याच कृपासामर्थ्याचे सौंदर्य त्यात प्रगट झाले आहे. गुरुभक्तांसह अगदी सर्वांनाच हा विशेषांक एक पर्वणी आहे. याच्या वाचनाने खऱ्या सद्गुरुभक्तीची यथार्थ दृष्टी लाभेल. सद्गुरुकृपेचे सामर्थ्य प्रत्ययाला येईल. शारीरिक, मानसिक, प्रापंचिक, सांचित अभाव संपुष्टात येतील. इहपर सुखाची गोडी लाभेल. स्वतःसह इतरांसही दिव्यत्वप्रद नेण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. कारण गुरुकृपा काय नोहे!

—संपादकीय नात्याने सद्गुरुसेवेचे निमित्त करून ताई आपल्या चरणी मी सर्वसाधक भक्तांसह पूर्ण कृतज्ञता व्यक्त करतो. आता, परमप्रसादाने, खुल्या हृदयाने गुरुचरणी एकच प्रार्थना आहे की या देहात असतानाच सर्व साधक गुरुभक्तांना आपण 'पूर्णज्ञानाचा' लाभ घडवावा. ऐक्यभावाची ओंजळी करून महिमानेश्वरीत आपण लिहिल्याप्रमाणे आम्ही आमची तळमळ व्यक्त करीत आहोत....

श्री गुरुदेवांना। हीच प्रार्थना। मी माझे अल्प
भावना। दूरी रिघावी॥ संसार व्हावा स्वर्गमय।
हृदी चित्ती ज्ञानोदय। जिवाचे समरा प्रेममय।
बनू द्या॥ नित्य आपुले पूजन। गुरु ॐ मंत्र जपून।
आमुचे प्राणापान। सदा करू दे॥ असावी कृपा अशी।
सर्वोत्तम भावानिशी करू द्या मजसी। आपुले पूजन॥

॥ सद्गुरुनाथ महाराज की जय ॥

*

जोडाक्षरे वाचता आली की अर्थ लागतो.

*

आचार्योपासना ही सिद्धयोगाची मुख्य साधना आणि गुरुमूर्तीवर आत्यंतिक प्रेमाने ध्यान हे त्या साधनेचे रहस्य.

*

प्रेम ने सर्वांना जिंकता येते.

(स्वामी उमानंद)

*

॥ ॐ श्रीगुरुदेव ॥

# अनवरत आनंदे । वर्षतिये ॥

१९१६ मधली ३१ डिसेंबरची पहाट ! साधारण ५ वाजण्याचा सुमार. वऱ्हाडमधील बुलढाणा जिल्ह्यातील खामगावच्या जवळचे सुटाळा खेडे. हिवाळी पावसाची पावसाळी संतत धार. सर्वत्र पाणीच पाणी. मळ्यातील ती झोपडी ती केवढी ! खाटेखालची जागाच फक्त होती कोरडी. तीच माईंनी निवडली व कन्येला जन्म दिला. सारेच महान, दिव्य जन्म निसर्गाच्या कुशीत होतात, निसर्गाच्या मांडीवर वाढतात, ईशसृष्टीत विहरतात. मानवी जगताच्या रहाटीपेक्षा काहीतरी आगळ्या, वेगळ्या, निराळ्या अलौकिक परिस्थितीच्या कोंदणातून चमकतात. जन्माच्या वेळचा वर्षाव, गुरुकृपावर्षावाचीच नांदी होता. दिव्यजन्म—कार्याची रूपरेषा स्पष्ट करणारा होता. चरित्रातील घटनांची भाषा कळली तरच थोर चारित्र्याची ओळख होते, दिव्यजन्म-कर्मांचा धर्म कळतो. साध्या घटनांच्या अर्थातून परमार्थच डोकावतो.

प्लेगचा कहर झाल्याने खामगावातील सर्वच कुटुंबे गावाबाहेर रहात होती. खामगावचे सुप्रसिद्ध वकील, बापूसाहेब ठोसर ह्यांनीही आपली फॅमिली सुटाळ्याला मळ्यावर धाडून दिली होती. स्थळकाळ नियतीला योग्य ठरली. तिने आपले नियत कार्य उरकले. योगिनी जन्माला घालण्याचा योग साधला. महायोगकार्यासाठी कोणी जगात अवतरली —योगराजबळी होऊन सर्वांना तारण्यासाठी, अनवरत आनंदाचा वर्षाव करण्यासाठी. सारी कृत्रिमता झुगारून, टाटर टर उडवून, फाडून चिंधी-चिंधी करण्यास निसर्गाची नैसर्गिकताच अंगी हवी. म्हणूनच तिचा जन्मही निसर्गाच्या नैसर्गिक वातावरणात झाला. पंचमहाभूतांनी पंचारती ओवाळली. पावसाळी हिवाळी धार ओघळली, ती दैव दाखवायला की ह्या दिव्य जीवनात उन्हाळा कधी येणारच नाही, सारे हिरवळत राहणार; गुरुकृपावर्षावाचीच ओल ओलावणार. शुष्क, कोरडे जीवन जेथे, तेथे कोरड्या जीवनाचा ओरडा थांबवायला कोरडे ओढण्यास, जीवनही ओल्सरच हवे. पितृमुखी, सुलक्षणी, सुकुमार, गौरवर्णी, लोभस लहानगीला पाहून त्याही परिस्थितीत माईंना मुंबईच्या डॉक्टरणीचे शब्द स्मरले, 'तुला अजाप मुलगी नाही ना झाली ? पहिले दोन मुलगेच आहेत ना ? मग थांब जरा; कायमचा बंदोबस्त करण्याची घाई करू नकोस. मुलगी होऊदे. आईवर मुली जसे प्रेम करतात तसे मुलगे करत नाहीत' नियतीला स्त्री-यती जगाला द्यायचा होता हेच खरे.

प्लेग ओसरला. ओसाड खामगाव पुन्हा वसले. ठोसरकुटुंब सुटाळ्याहून परतले. त्यांनी काही एकत्र मोठ्या कुटुंबात वाढू लागली. तीन मजली मोठे घर बाळलीलांना अपुरे पडू लागले म्हणूनच की काय तिला ते सोडावे लागले. व्यापक कार्यासाठी मनाची व्यापकता वाढविण्यास उपयोगी पडणाऱ्या घटना घडाव्याच लागतात. आईवडील, आप्तस्वकीयांचा दुरावा सहन करावा, व्हावाच लागतो. तसेच झाले. काही दीड वर्षांची असताना माईंची १६ वर्षांची, सख्ख्या बहिणीप्रमाणे प्रेम असलेली चुलत बहीण सहा महिन्यातच विधवा झाली. तिच्या आईवडीलांकडेच एकुलती एक, भावंडाविना माई लहानाच्या मोठ्या झाल्या होत्या. ते ऋण अल्पांशाने फेडण्यासाठी त्यांनी लहानग्या बाळीला, मावशींच्या ओटीत थोर मनाने घातले. व काहीशा वेळात मावशी वत्सला सासूसासऱ्यांजवळ राहू लागल्या. काहीचे मॉडर्न नामकरण झाले व ती कुसुम म्हणून ओळखली जाऊ लागली.

वऱ्हाडमध्ये गरांबपे कुटुंब सधन व थोर म्हणून प्रसिद्ध होते. वयाची पहिली दहा वर्षे कुसुमची ह्याच कुटुंबात फार सुखात, कौतुकात, लाडात, ऐश्वर्यात गेली. इंग्लिश पहिलीपर्यंतचे शिक्षणही वऱ्हाडातच झाले. वयाच्या मानाने अधिक समंजस, चुणचुणीत, बोलकरी, हुशार कुसुमचे घरीदारी, शेजारी, शाळेत सर्वत्र अतिशय स्वागत होई. लोकप्रियता गुरुत्वाचे लक्षणच असते. गुरुत्वाकर्षणाकडे सर्व आकृष्ट होणारच.

बालमनावर शिस्तबद्ध संस्कार होण्यास मावशींचा कडक स्वभावाचा नियतीने पुरेपूर उपयोग करून घेतला. राग, शिक्षा भोगून कुसुमचे मन लहानपणापासूनच दणकट बनले. स्वभावाला धार येण्यास गुळमुळीत परिस्थितीचा उपयोग होत नाही. अन्यायाची बोचच मनाला चिंतनशील बनवते. अवतार कार्यासाठी घडणघडण बनण्यास नियतीने दिलेले सारेच भोग ब्लेसिंग इन् डिसगाइज् ठरतात. थोरांचे जीवन हे त्यांच्या पूर्वजन्म-कर्मांचे फळ नसते तर त्यांच्या नियत कार्याचे ते पॅटर्न असते.

कुसुमची पाठ चांगली लागावी हाही हेतू माईंच्या त्यागामागे होता. त्याप्रमाणे कुसुमच्या पाठीवर एक मुलगी, मुलगा व पुन्हा मुलगी अशी तीन अपत्ये त्यांना लाभली, पण कुसुम मात्र मनाने त्यांना दुरावली. आईने आपल्याला रागीट, तापट, कठोर मावशीजवळ ठेवून विनाकारण अन्याय केला असे तिला वाटायचे. ती एकलकोंडी, अंतर्मुख झाली. सुट्टीत खामगावला घरी गेली तरी ती मोकळेपणाने वागत नसे. मनातल्या मनात कुढे. इतरांना ते कळत नसे. परमार्थाला जी अंतर्मुखता लागते, ती कुसुमची लहानपणापासूनच बनत गेली. प्रेमापासून तो प्रत्येक गोष्ट खरी आहे का ? तेच बघण्याची तिला सवय लागली. बनावटी, खोटेपणा, कृत्रिमपणा, आव तिला अजिबात सहन होत नसे. खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी हाच तिचा खाक्या ठरला. पुढे गुरुभक्तीचे पातिव्रत्य जमण्यास ह्या कृत्रिमतेचा तिरस्कार तिला चांगलाच उपयोगी पडला.

कुसुम दहा वर्षांची असताना मावशीने सासर सोडले. सासूसासऱ्यांशी तिचे पटले नाही. व ती कायमचीच स्वतःच्या वडीलांकडे, नाशीकला रहाण्यास गेली. अर्थातच कुसुमलाही बरोबर घेऊन. कुसुम हा

तिचाच त्यांचे ठरला होता. दुसरे कोणीही नातेवाईक त्याबाबतीत ढवळाढवळ करण्यास धजत नसत. नाशीकचे बाबासाहेब साठ्ये अतिशय हुषार वकील म्हणून प्रसिद्ध होते. गुरु हा लक्ष्मीपती असतो. कुसुमचे सारे जीवनच समृद्ध श्रीमंत कुटुंबात गेले. तिच्या चरित्राचे तर हेच वैशिष्ट्य. गुरुकृपेच्या ओंजळीत वसूनच अथपासून मजेत, आरामात, सुखात व चैनीत प्रवास. साठ्ये कुटुंबही चांगलेच ऐश्वर्यसंपन्न, आजोळीही सुखासुखीत, हुषार, सुरेख कुसुमचे लाडच लाड व कौतुकच कौतुक होऊ लागले. तिच्या मामाने तिचे इतके फोटो काढावेत की त्याला गणतीच नव्हती. लहानपणापासूनच कॅमेऱ्याला फेस करण्याची तिला सवय झालेली, पुढच्या जीवनातही उपयोगी पडली. एकाच आवारात दोन बंगले—एका बंगल्यात आजोबा व दुसरा बंगला मुलींच्या शाळेला दिलेला. त्यावेळी आजच्या सुप्रसिद्ध साहित्यिक दुर्गाबाई भागवत यांच्या आत्या सीताबाई भागवत ह्या त्या शाळेच्या हेडमिस्ट्रेस होत्या. कुसुमचे त्यांच्या शाळेत इंग्लिश पहिलीत नाव घातले. पाच सहा महिने फार चांगले गेले. पण कुसुमला नाशीकची दमट हवा मानवली नाही. तिला शाळा सोडावी लागली. हेडमिस्ट्रेसना फार वाईट वाटले, पण इलाज नव्हता. मावशी व कुसुम खामगावला राहण्यास गेल्या. खामगावच्या शाळेत कुसुम जाऊ लागली. सबंध आयुष्यात फक्त तीनच वर्षे कुसुम स्वतः आई वडीलांजवळ राहिली. खामगावची शाळा इंग्लिश तिसरीपर्यंतच होती. मुलांच्या हायस्कूलमध्ये मुली त्यावेळी घेत नसत. म्हणून मग नागपूरला घर करून मावशीने कुसुम व तिची पाठची बहीण कमल ह्यांना घेऊन रहावे असे ठरले. व इंग्लीश चवथीसाठी भिडे कन्याशाळेत कुसुम जाऊ लागली. विविध अनुभवांखेरीज स्वभावला पैलू पडत नाहीत, आतले तेज बाहेर येत नाही. अनुभवांचे क्षेत्र वरचेवर बदलून नियतीला हे साधायचे होते. पुरुषक्षेत्र बनण्याचीच ती पूर्वतयारी होती.

नागपूरच्या भिडेकन्याशाळेत हायस्कूल एन्ट्रन्सची परीक्षा पार पडली व त्याच सुमारास मावशीचे वडील वारले, भाऊ खूप आजारी पडला. मावशीने नागपूरचे बिऱ्हाड मोडले व ती माहेरी गेली. कुसुमच्या जीवनात योग्य तो बदल घडवायचा झाल्यास, नियतीने जणु मावशीला हाताशी धरले होते. आता शिक्षणात व्यत्यय नको, म्हणून कुसुमच्या वडिलांनी तिला मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेण्यास उमरावतीच्या सरकारी शाळेच्या वसतिगृहात तीन वर्षे ठेवली. ही तीन वर्षे कुसुमच्या जीवनात सर्वांगीण विकास करणारी ठरली. हेडमिस्ट्रेस पासून तो मेट्रनपर्यंत सर्वच शिक्षकवर्ग आदर्श होता, वैयक्तिक गुणांची जोपासना करणारा होता. त्याचवेळेस तिच्या भावाने लिहिलेल्या एका पत्रातील वाक्य महत्त्वाचे ठरले. "तुझ्यातील ईश्वरदत्त गुणांचा विकास करशील तर तू सामान्य मुलींहून निराळी ठरशील." लहानपणापासूनच कुसुमला आपल्यातील दैवी आकर्षण शक्तीचा अनुभव येत होता. कोणतेही गाव असो, कोणतीही शाळा असो, कोणतेही लोक आजूबाजूला असोत, ते तिच्याकडे आकर्षिले जायचेच. तिची आई म्हणे, "कुसुम लोकभाजिणी आहे." मॅट्रिकची परीक्षा देऊन शालेय जीवन संपलेली कुसुम मोठ्या आत्मविश्वासाने पुढील जीवनाला सामोरी गेली. अंतिम विजय सदैव आपलाच होणार हे सत्य तिला अनुभवाने पटले होते. अदृष्टच तिचे असे प्रभावी होते.

कॉलेज जीवनाला सुरुवात करावयास मिळणार ह्या भरंवशावर ती होती. पण त्याचवेळेस बापूकाकांची दृष्टी अधू झाली, त्यांनी वकीली सोडली. मोठ्या भावाचा अजून वकीलीत जम बसला नव्हता, त्याच्याहून धाकट्या भावाचे शिक्षण पूर्ण व्हायचे होते. कुसुमला कॉलेजखर्च परवडण्यासारखा नव्हता. ती खामगावला घरीच राहिली, पण स्वस्थ बसली नाही. गायन व पेटीवादन शिकू लागली. फर्स्ट इयरची सर्व पुस्तकेही तिने मागवलीत. नागपूर युनिवर्सिटी खाजगी रीतीने परीक्षेला बसू देत असे, त्याचा तिने फायदा घ्यायचे ठरवले. खामगावच्या ह्या वास्तव्यात तिची स्वतंत्र मते बनण्यास मदत झाली. घरचे वातावरण धार्मिक व कर्मकांडी. माई भजन, कीर्तन करणाऱ्या. देवाधर्माचे संस्कार तिच्या मनावर झाले. पण त्याच बरोबर कर्मकांडाचा फोलपणाही तिला जाणवला. ती मननशील, अंतर्मुख होऊ लागली.

एक वर्षानंतर बरेच बदल झाले. तिची पाठची बहीण मॅट्रिक झाली. भाऊ प्रोफेसर झाला. नागपूरला स्त्रियांचे कॉलेज निघाले. पुन्हा नियतीने मावशीला हाताशी धरले. दोन्ही भाच्यांना घेऊन नागपूरला तिने बिऱ्हाड करावे, तिच्या बहिणीने शाळेत शिक्षिकेची नोकरी करावी व कुसुमने वुइमेन्स कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून, एका वर्षात दोन परीक्षा देऊन एक वर्षाचा खर्च वाचवावा असा मार्ग निघाला. वुइमेन्स कॉलेजच्या प्रिन्सिपॉल मिस् रंगराव यांना ही धाडसी हुषार, धीट विद्यार्थिनी एकदम पसंत पडली. त्यांनी तिला एका वर्षात दोन परीक्षांचा अभ्यास करण्यास परवानगी दिली. पहिल्या तिमाही परिक्षेत तिने डायमेन्ड मार्क्स मिळवले, तेही दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमातल्या विषयात. ही तडफ व हुषारी पाहून त्यांनी कॉलेजची स्कॉलरशिप तिला दिली. वसतीगृहाचा खर्चही त्यात भागला व कुसुम कॉलेजच्या वसतीगृहात राहू लागली. तिच्या बहिणीलाही त्यांनी वऱ्हाडची बरसरी स्कॉलरशिप मिळवून दिली व तिलाही कॉलेजमध्ये घेतले. अर्थातच नियतीचे काम झाले व मावशीचे बिऱ्हाड मोडले आणि तिने शाळेच्या मुलींसाठी वसतीगृह काढले.

उमरावतीच्या शाळेप्रमाणेच कॉलेजजीवन प्रभावी ठरले. सर्व सर्व प्रोफेसर्स व मुलींमध्ये ती प्रिय झाली आणि प्रिन्सिपॉलची विशेष आवडती ठरली. गुरुशिष्यसंबंधाचे धडे कुसुमने इथेच गिरवले. अध्यात्मविद्येचे बिजारोपणही मिस रंगरावांनीच केले. १९३६ मध्ये कुसुम पदवीधर झाली. पुढे वुइमेन्स कॉलेजमध्ये एम्. ए. चे क्लासेस नव्हते. पण मिस रंगरावांनी कुसुमला वसतीगृहात राहण्यास परवानगी दिली. तिच्यासाठी लायब्ररीत एम्. ए. ची पुस्तके मागवली व तिला स्वतः त्या मार्गदर्शन करीत. तिला वसतीगृहातील जबाबदारीची कामे सांगत, कॉलेज मध्ये लेक्चर्सही देण्यास सांगत. सर्व सुरळीत चालले होते. पण नियतीला पुढील कार्यासाठी कुसुमची आणखीन खूप जडणघडण करायची होती. ती तिला एकाच जागी स्थिर होऊ देत नसे. खरे एपिसोड प्रकरण नागपुरात गाजले. कुसुमनेही नागपूर टाइम्सला पत्र लिहून मतप्रदर्शन केले. 'खऱ्याचा नरिमन झाला' असे प्रतिपादन केले. गांधींवरही टीका केली. वुइमेन्स कॉलेजच्या निर्भीड व बाणेदार विद्यार्थिनीचे पत्र, म्हणून संपादकांनी अग्रभागी छापले. नागपूरकरांनीही कौतुक केले. ही मुलगी पुढे शाइन् होणार म्हणून भविष्यही वर्तवले. पण कॉलेज कौन्सिलला ते मानवले नाही. 'सरकारी ग्रँटवर परिणाम होईल', वाटले. कुसुमला वसतीगृहात राहण्यास मनाई करण्यात आली. मिस रंगरावांना अत्यंत दुःख झाले. "प्रेसकडे धाडण्याआधी ते पत्र मला का दाखविले नाहीस! माझ्यावरचा विश्वास कोठे गेला तुझा?" असे त्या मोठ्या दुःखाने म्हणाल्या. कुसुमने हॉस्टेल सोडले व नियतीने आधीच मावशीकडून

काढून ठेवलेल्या भिडे कन्याशाळेच्या वसतीगृहात ती राहू लागली. सेवासदनमध्ये तिने शिक्षिकेच्या नोकरीसाठी अर्ज केला व तिला ती मिळालीही. एवढेच नाही तर महिन्यातच उत्तम शिक्षिका म्हणून तिचा बोलबाला होऊ लागला. ट्युशन्ससाठी पालक तिला गळ घालू लागले. थोरल्या भावाच्या कॉलेज शिक्षणालाही ती हातभार लावू लागली. एकीकडे एम. ए. चा अभ्यासही सुरूच होता. एक वर्षानंतर भिडेकन्या शाळेत तिला बोलावण्यात आले. ती नोकरी तिने धरली. कीर्तीत आणखीनच भर पडली. जे होते ते आपल्या भल्यासाठीच अशी तिची पूर्ण खात्री झाली. एक वर्षानंतर भावाने, तिने लग्न करण्यासाठी टुमणे सुरू झाले. त्याने आपल्या एका मद्रासी प्रोफेसर मित्राशी ओळख करून दिली व कुसुमचे १९४० एप्रिलपासून वैवाहिक जीवन सुरू झाले.

आता ती कुसुमची सौ. कुसुमताई शर्मा म्हणून ओळखली जाऊ लागली. सोशल लाइफ सुरू झाले. स्त्री मासिकाची लेखिका म्हणूनही ती पुढे येऊ लागली. वैवाहिक जीवनाकडे करीअर म्हणून ती बघे. व ते यशस्वी करण्यासाठी झटू लागली. कोणत्याही क्षेत्रात प्रयत्नांची पराकाष्ठा करायची व जीवनातून काहीतरी भरीव यश प्राप्त करायचे अशी कुसुमताईंच्या विचाराची बैठक होती.

पहिला मुलगा १२ महिन्यांचा होऊन वारला. पण तत्त्वज्ञानाची बैठक लाभल्याने कुसुमताईंनी ते दुःख सहज पचविले. त्या नेहमी म्हणत, 'एकाहून एक मोठाली दुःखे असतात. आपल्या दुःखापेक्षा मोठे दुःख ज्यांच्यावर कोसळले आहे त्यांच्याकडे पहावे. त्याप्रमाणे त्यांनी केले. त्याचवेळी एका त्यांच्या ओळखीच्या ॲडव्होकेट दांपत्याचा एकुलता एक कॉलेजमधला मुलगा, कलकत्याला शिबिराला गेलेला, तेथेच डिसेन्ट्रीचे निमित्त होऊन वारला. आता उतारवयात दुसरे अपत्यही होण्याची आशा नाही. त्यांची आठवण ठेवून कुसुमताईंनी ते दुःख पचविले. एक वर्षाने त्यांना दुसरा मुलगा झाला. अमरावतीच्या कॉलेज मधून बुलढाण्याला प्रो. शर्मांची बदली झाली. पुढे तिथल्या रॉबर्टसन कॉलेजमध्ये एम. ए. साठी कुसुमताईंनी नाव घातले. फुरसतीच्या वेळात बायका व मुलींना त्या इंग्लिश शिकवीत. आपला जास्तीत जास्त उपयोग दुसऱ्यांना झाला पाहिजे ह्याकडेच त्यांचे विचार असत. स्वतःच्या बंगल्यात कॉलनीतल्या बायकांचे मंडळही त्या चालवीत.

त्याचवेळेस राजस्थानमधील पिलाणीच्या बिर्ला कॉलेजमध्ये प्रो. शर्मांना चौपट पगाराची नोकरी चालून आली. पातिव्रत्याचे कंकण बांधलेल्या कुसुमताईंनी पतीच्या करीअरमध्ये शेवटपर्यंत धडाडीचे सहकार्य दिले. सर्व नातेवाईकांनी सरकारी नोकरी सोडून इतक्या दूरवर जाऊ नये असे मत दिले. पण कुसुमताईंनी एकटीने पाठींबा दिला व दीड वर्षाच्या मुलाला घेऊन हे छोटे कुटुंब मारवाडात शिरले. तेथेही कुसुमताईंनी महाराष्ट्रमंडळ चालविले, इंग्लिशचे क्लासेस घेतले. समाजकार्य चालू ठेवले. पिलाणीच्या वास्तव्यात त्यांना कन्यारत्नाचा लाभ झाला. ही मुलगी मोठ्या भाग्याची ठरली. कारण त्याचवेळेस वल्लभभाईंनी I. A. S. सुरू केल्याने प्रोफेसर I. A. S. झाले. कुसुमताई प्रोफेसरणीची ऑफिसरीण झाल्या. आता आणखीनच वेगळे जीवन सुरू झाले. पण त्याचाही कुसुमताईंचे उपजत गुण प्रकर्षाने पुढे येण्यास उपयोग झाला. जग बदलले, रहाणीमान बदलले. बदलीचे, मानसन्मानाचे, ऐश्वर्याचे, वैभवाचे, कीर्तीचे, पराक्रमाचे जीवन सुरू झाले. तरी कुसुमताईंनी आपले जीवन बरबाद होऊ दिले नाही. आपल्या मोठ्या पदाचा उपयोग त्यांनी समाजकार्यासाठी होऊ दिला. अमाप पुण्य जोडले. कोठेही ममत्व, स्वामीत्वाची भावना रुजू दिली नाही. बदली झाली की आपल्या हाताने सर्व दान करून टाकीत. एकंदर चार प्रांतातून २२ जागी बदल्या झाल्या. रायपूरला दुसरे कन्यारत्न लाभले. अनेक गावे पहायला मिळाली. सर्व स्तरांवरचे जीवन अनुभवले गेले. बोलण्या लिहिण्यात समाजात वावरताना जी धिटाई व आत्मविश्वास लागतो तो बळावला. नियती उत्तरोत्तर प्रभावी व्यक्तिमत्व बनविण्यास मदत करीत होती, हेच खरे. एकतर गुरुकृपेने वासनाक्षय तरी व्हावा लागतो किंवा सर्व तऱ्हेचे ऐश्वर्यभोग उपभोगून तरी सर्व इच्छा पुऱ्या व्हाव्या लागतात. कुसुताईंच्या अदृष्टात दुसरा उपाय होता. वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत सर्व सुखांचा अनुभव अनुभवला. डान्स, डिनर, ड्रिंक्स, पासून तो टेनीस, बॅडमिंटन, ब्रिजपार्ट्या, नाटके, सिनेमा, क्लब लाइफ, मोटार, मोठे मोठे बंगले, समाज कार्य, हारतुरे, पुत्रसुख सर्वकाही मिळाले आणि मुक्तीच्या तृप्तीची ढेकर देताच आत्मजागृतीचा क्षण आयुष्यात आला नाही तरच नवल!

बुलढाण्याला असताना टिळकशताब्दीच्या वेळी गीतारहस्य वाचण्यात आले. जवळच रामकृष्ण मिशनची लायब्ररी होती म्हणून रामकृष्ण, विवेकानंद संपूर्ण वाचायला मिळाला. महेसाणाला अरविंदांचे ग्रंथ वाचले तर पुण्याला कृष्णमूर्ती, तर मुंबईला राधाकृष्णन्, गुरुदेव रानडे ह्यांचे ग्रंथ कुसुमताईंनी वाचले. आईवडिलांनी धार्मिक संस्कार केल्यामुळे त्यांच्या हातून उपासतापास सतत झाले. अंबिकापूरला अंबरीष राजाचा सिनेमा पाहिल्यावर वाळूचे शिवलिंग स्वतः हाताने बनवून, त्याची, तेलाचा अभिषेक दर सोमवारी करून, यथासांग पूजा सतत दीड तप झाली. सोमवारव्रत, सोळा सोमवार, शिवलीलामृताचे पारायण आदि शिवाची प्रिशराधना झाली. त्यामुळे अध्यात्मिक जीवनाचीही तयारी, प्रेयस-श्रेयस मार्गांची वाटचाल होत असताना नियतीने आधीच करून घेतली होती. त्यामुळे मुंबईला बदली होताच स्वामी चिन्मयानंदांचे मार्गदर्शन होण्याचा योग आला व आधीच विवेक, वैराग्य, षट्संपत्ती, मुमुक्षुत्वाने युक्त कुसुमताई चिन्मय मिशनमध्ये ७ वर्षे स्थिर झाल्या. उपनिषद क्लासेस, गीतायज्ञ ह्या सर्वांना हजर राहून स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला; परीक्षाही दिल्या गेल्या. त्यांच्या पुस्तकांचे मराठीत भाषांतर करून झाले व अभ्यासमंडळही घरी चालवले. मध्यंतरी सोनोपंत दांडेकरांचे आशीर्वाद लाभून ज्ञानेश्वरीचा अभ्यास व प्रवचने गेले दीड तप अव्याहत सुरू आहेत. ह्या साऱ्या पुण्याईने १९६८ मध्ये गणेशपुरीचे सिद्धगुरुपरंपरेचे स्वामी मुक्तानंद भेटले व सिद्धयोगाची दीक्षा मिळून कुसुमताई कुसुमेश्वरी झाल्या.

कुसुमेश्वरींनी मुक्तानंद बाबा भेटल्यापासून बरीच ग्रंथ निर्मिती केली. त्या गुरुभक्तीपरायण झाल्या. गुरुकृपांकित झाल्या. अंधेरीला गुरुदेव ध्यान मंदीर व आश्रम स्थापून दुसऱ्यांना ध्यानदीक्षा देऊ लागल्या व १९७४ पर्यंत आपला सर्व भाग्याचा संसार सुखाने शांतीपूर्वक पुरा करून सुना, लेकी, जावई ह्यांच्यावर सर्व जबाबदारी सोपवून संसारातून निवृत्त झाल्या. नातूही लाभल्यावर शास्त्राचीही काही ऋणु आडकाठी राहिली नाही व म्हणून त्यांच्या गुरुदेवांनी कुसुमेश्वरींना वयाच्या ६१ व्या वर्षी संन्यासदीक्षा दिली व त्या स्वामी उमानंद म्हणून आता ओळखल्या जातात.

थोडक्यात त्यांचे चरित्र असे अनवरत आनंद वाहूनालूंनी जीवनभर वर्षाव करणारे आहे. तेथे शोकाकुल अंतःकरणाचे जळणे नाही की

त्रिविध तापांचे पोळणे नाही. असे सर्व बाजूंनी समृद्ध, ऐश्वर्यशाली, परोपकारी जीवन दुर्मिळच. अनवरत आनंदाची पाणपोईच जणू.

श्री कुसुमेश्वरींचे (भक्तांच्या लाडक्या ताई) सर्व जीवनच असं अनवरत आनंदाची पाणपोई बनलेले आहे. त्या जेथे गेल्या, ज्यांच्या सहवासात राहिल्या, तेथे सर्वत्र आनंदच वितरला त्यांनी. जेथे आनंद तेथे आकर्षण आलेच. प्रसन्न नि आनंदी मनाचे पडसादही प्रसन्न. अशा आनंदी ताईंचे वैवाहिक जीवनही फार सुखाचं झालं असल्यास नवल काय ? सांसारिक जबाबदारी पार पाडून, गृहिणीची सर्व कर्तव्ये चोख बजावून, कुटुंबातील सर्वांना सुखी, समाधानी, तृप्त बनवून त्यांनी आपले वैयक्तिक जीवन संपविले व १९७५ साली गुरुपौर्णिमेच्या गुरुमुहूर्तावर गुरु कार्यार्थ, अवघाचि संसार थाटण्यासाठी बाहेर पडल्या. आल्या त्या प्रथम राहिल्या मोहन कुलकर्णींकडे, आपल्या एका भक्ताकडे. टाईमगॅप अॅरेंजमेंट होती ही. एका संकुचित कुटुंबात अवघाचि संसार कसा काय मांडणार ? प्रवचने एकीकडे, कार्यकर्ते दुसरीकडे, ताई तिसरीकडेच अशी त्रिस्थळी यात्रा सुरूच होती. अशा परिस्थितीत आपल्या भक्तांच्या आग्रहास्तव त्यांना मुक्त सहवास देण्यास 'घराबाहेर' पडलेली ही भक्तवत्सला एका कुटुंबवत्सल घरात आपल्या अमर्याद भक्तगणांचे चोज कसं काय पुरविणार ? प्रश्न ! प्रश्न आणि प्रश्नच ! पण या सर्व प्रश्नांना योग्य ते उत्तर देण्यास, प्रश्नांचे अनुकूल उकल करण्यास गुरुकृपा समर्थ आहे ही ताईंची निष्ठा ! विरोध पचवून, सर्व अडचणींवर मात करून "कुसुमेश्वरी जन्मभरी गुरुचेच करी." या गुरु आदेशप्रमाणे जनात अखंड कार्य चालू होते, तर मनात श्री गुरुदेव ध्यानमंदिर साकारित होत होते. अखेर प्राप्त घडी येताच तपश्चर्या फळाला आली, ताईंचा संकल्प, अपार गुरुकृपा आणि भक्तांची भक्ती यांचा त्रिवेणी संगम जुळून आला नि मनातील श्री गुरुदेव ध्यानमंदिर प्रत्यक्षात साकार झाले.

आज हेच अनवरत आनंदाच्या पाणपोईचे स्थान बनलेले आहे. ब्रह्मरसाची, ब्रह्मानंदाची पाणपोई आहे ही ! संसारतापाने पोळलेला, सुख-शांती-समाधानासाठी तान्हावलेला अतृप्त जीव येथे येतो, ताईंच्या प्रसन्न, शांत, स्निग्ध दर्शनाने तृप्त होतो, प्रवचनाच्यावेळी किंवा सत्संगसमयी उसळणाऱ्या हास्यकल्लोळात बुडून जातो. 'ब्रह्मानंदी लागली टाळी' अशी त्याची अवस्था होते. एकदा आलेला विहंगीटर येथेच रमतो. परत परत येत राहतो नि शेवटी या आनंद सिंधूतील बिंदूच बनून जातो.

अनवरत आनंद हवा तर आनंदाचे माध्यमही शाश्वत नि अनवरत हवं ! अनवरत, अखंड आनंद मिळण्याचे अनवरत माध्यम म्हणजे गुरु ! पण त्यासाठी गुरुची माहिती हवी. महती कळली पाहिजे. आतून contact आला पाहिजे. गुरुविषयीचे ज्ञान असल्याशिवाय contact येणार कसा ? यासाठी गुरुची ओळख, गुरुभक्तियोगाचे ज्ञान करून देणे ओघानेच आले. ताईंची कल्पकता म्हणजे कल्पलताच. पाहिजे तेव्हा पाहिजे त्या योजना तिच्याजवळ तयार. खरी भक्ती तेथे सहज सुचते युक्ती, हा ताईंचा नेहमीचाच अनुभव. प्रवचने आधी सुरू होतीच. धून, भजने, आरत्या सर्व चालू होतेच. पण साधकांची साधना हवी तशी प्रगती दाखवेना म्हणून आपले हक्काचे स्थान होताच ताईंनी दीडदिवसांची शिबिरे सुरू केली. शनिवारी दुपारी २ ते रविवारी सायंकाळी ६ पर्यंत अखंड साधना सुरू. दीडशे ते दोनशे लहान मोठे साधक या शिबिरांचा लाभ घेत. हेतू साध्य झाला. ध्यानात प्रगती दिसू लागली. गुरुसान्निध्यात, चितीमय वातावरणात दीड दिवस घालविणाऱ्या साधकांत व इतर साधकात (आचार, विचार efficiency इ.) स्पष्ट फरक जाणवू लागला. ४ जून १९७६ पासून दर शनिवारी, रविवारी, ताई अमेरिकेहून प. पू. बाबांच्या आलेल्या आज्ञेनुसार इन्टेन्सिव्ह घेऊ लागल्या. आतापर्यंत ताईंकडून हस्तपात्, शब्दपात् किंवा दर्शनाने दीक्षा मिळत असे. अखंड गुरुकृपाओघात ताईंही यौगिक सुखाचे सोहळे भोगत होत्या. कुंडलिनी सहस्रारांत स्थिर झाली. तिने जणुकाय स्वतःचे वारूळ तयार केले. ताईंच्या माथ्यावर नैसर्गिक शिखाभार झुलू लागला. जटेचा नैसर्गिक मुकुट तयार झाला. अंतर्ज्ञानाने बाबांना ताईंचे हे वाढते यौगिक सामर्थ्य कळले असावे म्हणून, आपल्या शिष्येचा अधिकार पाहून त्यांना स्पर्शदीक्षा देण्याचा अधिकार दिला. मग काय ? कार्याला भलताच वेग आला. ताई आधीच चालतं बोलतं पॉवर हॉऊस बनल्या होत्या. त्यांच्या वास्तव्याने व येथे चालू असलेल्या अखंड जापमाने हे स्थानही पॉवर-हाऊस बनले. या स्थानाजवळ येताच शक्ती लोकांना पकडू लागली. संवेदनाक्षम लोकांना तर आवारात शिरताच शक्तीचे अस्तित्व जाणवू लागले. ध्यानदीक्षा घेणाऱ्यांना चटकन ध्यान लागू लागले. परम पूज्य ताईंची 'शक्तिपातकुशल' म्हणून कीर्ती दूरवर पसरू लागली. आणि परगांवच्या ध्यानींचीही दीक्षा घेण्यासाठी या स्थानी गर्दी होऊ लागली. श्री गुरुदेव ध्यान मंदिराकडे जनतेचे लक्ष वेधू लागले.

श्री गुरुदेव ध्यानमंदिरात 'गुरुमूर्ती' पाहिजे. 'ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः ।' गुरुमूर्ती स्थापनेचे पुण्यही फार ! गुरुमूर्तिची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी गुरुगृही जावयाच्या दानाची भट प. पू. ताईंना चितशक्तिविलासाचे सर्व अधिकार गणेशपुरीला देऊन आधीच पूर्ण केली होती. गुरुमूर्तिकार मांजरेकरांनी मूर्ति बनविण्याचे कबूल केले. आता राहिला गुरुदेवांच्या—स्वामी मुक्तानंद परमहंसांच्या परवानगीचा प्रश्न. त्यांचे वास्तव्य होते त्यावेळी अमेरिकेत. परवानगी आणण्याची व्यवस्था झाली. गुरु हा भक्तिवश, भावाचा भुकेला. प. पू. ताईंनी आपल्या अनन्य नि एकनिष्ठ भक्तीने गुरुकृपा नेहमीच खेचून घेतली आहे. अपार गुरुकृपा नि गुरुप्रसन्नतेच्या त्या धनी बनल्या आहेत. परम पूज्य बाबांनी 'मूर्ति स्थापनेची' परवानगी तर दिलीच आनंदाने पण त्याबरोबर प. पू. ताईंना पाहिजे असलेले विविध पोझमधील फोटोही पाठविले. मध्यंतरी मुहूर्त झाला अत्यंत शास्त्रीय पद्धतीने. १९७७ च्या विजयादशमीस मूर्तीची स्थापना करण्याचा संकल्प सुटला.

९ ऑक्टोबर १९७६ ला प. पू. बाबा परत आले परदेश यात्रेहून. त्यावेळी स्वागताचा पहिला हार बाबांच्या गळ्यात आपला पडावा, मंगल-कलश व आरतीचा मान आपल्या सूनला मिळावा ही ताईंची मनोमन इच्छा. पण हे जुळणार कसं ! पण बाबांना योगच असा जुळवून आणला की ताईंची इच्छा पूर्णपणे सफल झालीच इतकेच नव्हे तर फोटो काढताना असा काही एक चमत्कार घडला की, ती प. पू. बाबांची इच्छा, ताईंची यौगिक Stage दाखविण्याची नियतीने केलेली योजना की, फोटोग्राफरची किमया कळेना, पण ताईंच्या तपश्चर्येचे मधमधीत फळ त्यांच्या पदरात पडले हे खरं ! प. पू. बाबांनी आपले दोन बाहु प. पू. ताईंच्या मागे उभारून चतुर्भुजा बनविले आहे ताईंना. चतुर्भुजा ताईंचा हा फोटो म्हणजे दैवी चमत्कारच ! बाबांच्या मध्ये व ताईंच्या मध्ये अंतर किती ! मध्ये लुडबुडणारे लोक तरी किती ! पण तरीही तो फोटो अचूक आला. काय सुचवायचेंं आहे नियतीला ? देवी भागवत सुरू झाल्याची ही खूण की, ताईंच्या अवतार कार्याची नांदी ! प. पू. ताई म्हणतात ही सारी गुरुकृपा !

पण सर्वज्ञ, त्रिकालज्ञ बाबांनी सर्व काही जाणले, ताईंच्या माथ्यावरील वाढलेला जटाभार, शिखा नव्हे, नैसर्गिक मुकुट पाहून स्मित हंसले आणि दुसऱ्या दिवशी ताई माधुरीताई गणेशपुरीस गेल्या त्यांच्या दर्शनास, तेव्हा हजार भक्तांच्या मेळाव्यात बसलेल्या ताईंकडे हात करून आपल्या पुढेच बसलेल्या भक्तांना म्हणाले, "ती तुमच्या मागे बसली आहे नं गादीवर ती बडी साधु आहे. कशी दिसते बघा! मी तर आधी ओळखलेच नाही तिला. अगदी महादेवासारखी दिसते. मोठी रुद्राक्ष देणार आहे मी तिला." असं म्हणून पुन: गप्प बसले, आणि अचानक ताईंना जवळ बोलावून ताईंनी त्यांच्या गळ्यात हार घालण्यापूर्वीच प. पू. बाबांनी ताईंच्या गळ्यात शेवंतीचा मोठा हार घातला. प. पू. ताईंच्या चरणापर्यंत रुळत होता तो हार. स्वतःच्या गळ्यातील हार काढून ताईंच्या जटेभोवती गुंडाळला तरी शिखा उघडीच म्हणून दुसरा एक मोठा हार घेऊन शिखा पूर्ण झाकून टाकली. एक केशरी वस्त्र घेऊन ताईंना त्या वस्त्रात असं काही घट्ट लपेटून टाकले की बस्स! ताईंच्या दिव्य शिखेवर कुणाची नजर पडू नये नि दिव्य तेजस्वी कांतीवर कोणाची दृष्टि लागू नये म्हणून का बाईसाईने झाकून टाकले? (आई आपल्या बाळाला इतरांच्या नजरेपासून अशीच जपते ना!) माधुरीला म्हणाले, 'नीट सांभाळ हे आमच्या मदरला." 'मदर' शब्दाने काय सुचविले? फॉरिनर्सनी त्यांना मदर म्हणावे हे तर सुचविलेच पण ताईंनी ओलांडलेला कुंडलिनीयोगाचा टप्पाही सुचविला. शिवाशिवाचे लगीन झाल्यावर कुंडलिनी जेव्हा जग-दंबेचे बाळ प्रसवते तेव्हा शिव व कुंडलिनीचे पतिपत्नीचे नाते संपून तो आता विश्वाकडे मातृत्वाच्या दृष्टीने पाहतो. प. पू. ताई आता जगज्जननी बनल्या. विश्वकल्याणाचे कंकण बांधणे ओघानेच आले.

इकडे भक्तगण ३१ डिसेंबरच्या कार्यक्रमाची आखणी करण्यात दंग होता. ३१ डिसेंबर १९७६. ताईंच्या वयाला ६० वर्षे पूर्ण होणार. प. पू. बाबा पण परत आले आहेत. सुंदर योग आला आहे जुळून. प. पू. बाबांचा स्वागत समारंभ नि ताईंचा षष्ट्यब्दिपूर्ति समारंभ (उत्सव) हे दोन महोत्सव एकाच मांडवांत मोठ्या थाटाने साजरे करावे व त्याचवेळी ध्यान-योगिनी श्री. कुसुमेश्वरी विशेषांक प्रकाशित करावा. एकाच खर्चात तीन महानकार्ये उरकण्याचा विचार असावा श्री गुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्टच्या कार्यकारी मंडळाचा. प. पू. ताईंच्या समोर हा प्रस्ताव मांडला. त्या हंसल्या (का?) नि म्हणाल्या, "ठीक आहे. बाबांच्या कानावर घालेन मी हे. त्यांची पूर्वपरवानगी घेतली पाहिजे ना?" आणि श्री कुसुमेश्वरी विशेषांकही काढायचा. तेही बाबांच्या कानावर घालेन." प्रथम प. पू. बाबांनी येण्याचे मान्य केले. विशेषांकाची कल्पना तर त्यांना फारच आवडली. मी लिहीन त्यात. अंक निघालाच पाहिजे, असा आग्रह धरला. तोंड भरून आशीर्वाद दिला. त्याप्रमाणे अंक निघाला. गुरु-देवांनी पानभर आशीर्वादही पाठविला. पण मी आता क्षेत्रसंन्यास घेतला आहे या सबबीवर वाढदिवसास येण्याचे मात्र रहित केले. प. पू. ताईंना काय वाटले असेल हा निर्णय ऐकून? तरीही ताई शांत होत्या. कोणतीही Re-action दाखविली नाही. निराशा गिळून टाकली नि शांतपणे म्हणाल्या "आम्ही सर्व येऊ येथे! माझे गुरुदेव हजर असतांना माझा ६० वा वाढदिवस साजरा होत आहे, केवढं भाग्य माझं! आपण इथेच मला आशीर्वाद द्यावा. वाढदिवसाचे दिवशी दुसरं काही नको.' बाबा खूष झाले ताईंचा विनम्रभाव नि समर्पण पाहून. आपल्या ताईंचा वाढदिवस कसा साजरा करावयाचा या विचारातच गढून गेले ते.

३१ डिसेंबर जसजसा जवळ येऊ लागला तशी सर्वांची उत्सुकता शिगेला पोचली. ७ बसेसची संख्या पूर्ण झाली. इतरांना स्वतंत्रपणे येण्यास सांगितले. ताई कार्यकर्त्यांना बारिकसारिक सूचना देत होत्या. "बाबांना शिस्त फार आवडते. अतिशय सावध व तत्पर राहिले पाहिजे. बाबा फार खूष आहेत. माझ्यापेक्षा बाबांनाच ३१ तारखेची काळजी." इत्यादि इ. गणेशपुरीच्या आश्रमात उत्साहाचे वारं संचरत होतं. आपल्या ताईंचा वाढदिवस थाटात साजरा झाला पाहिजे. काही न्यून राहता उपयोगी नाही ही दक्षता. बाबा ताईंच्या परीक्षाही कडक घेतात नि लाडही खूप करतात. वाढदिवसाचा थाट असा काही उडवून दिला की बस! आपल्या ताईला नेत्रनीरांजनातील तेजस्वी ज्योतीने ओवाळलं काय, त्यांच्या सेनेला 'सावधान येती घरा' म्हणून गौरविले काय! T. V. वर सर्व कार्यक्रम चित्रित करविला काय नि नित्यानंदकडून (वस्त्रे) ताईंची ओटी भरविली काय! सर्वच अपूर्व आगळं नि वेगळंच! स्वयंपाक घरापासून ते सभामंडपापर्यंत स्वतः जातीने जपत होते. पंक्तीवर पंक्ती उठत होत्या नि बाबा पंक्तीत फिरून सर्वांची विचारपूस करीत होते. "गणेशपुरीस असा आनंदकल्लोळ कधी उडालाच नाही. बाबांना आजच्यासारखं आनंदी नि उल्हसित मूडमध्ये आम्ही कधी पाहिलेच नाही." असे कित्येक आश्रमवासियांनी बोलून दाखविले, अम्मा म्हणाल्या, ताईंना, "बाबांनी तुमच्या सर्व तपश्चर्येचे फळ तुमच्या पदरात एकदमच घातले." प. पू. ताईंनी आपल्या आश्रमातर्फे दोन हजार पुरण-पोळ्या नेल्या होत्या प्रसाद म्हणून. हजारो लोक जेवले. आश्रमवासि-यांनी सकाळ संध्याकाळ दोन दिवस पोळ्या खाल्ल्या तरी पोळ्या शिल्लकच. बाबा म्हणाले, "हीच बरकत" ताईंकडे सर्व बाबतीत अशीच बरकत राहील" हा तोंडभरून दिलेला आशीर्वादच.

झालं न कधी असंच सर्व घडलं त्यादिवशी. ताईंच्यावर सर्वांचेच अपार प्रेम! रजा काढून दांड्या मारून पुरुषवर्गदेखील या दिव्य सोहळ्यास उपस्थित, मग साधकांचं काय? ७ भरलेल्या बसेस ताईंच्या स्पेशल मांडारीकरांबरोबर गणेशपुरीस गेल्या. रस्ताभर धून, गुरुगीता, जय-जयकार घोषणांनी वातावरण धुंद झाले होते. सायंकाळच्या घरच्या (मंदिरातील) समारंभाचाही थाट नवपद्मासारखाच होता. सर्व शिस्तीत, इतक्याशा जागेत ५००/६०० लोक दाटीने मावले; गुरुमाऊलीच्या हातचा प्रसाद घेऊन वाढदिवसाचे गोडवे गात घरी गेले.

आता ताईंचे सारं लक्ष केंद्रित झाले गुरुमूर्तीवर. त्यांचे श्री मांजरेकरांकडे दर गुरुवारचे खेटे सुरु होतेच. वाढदिवसाच्या निमित्ताने मांजरेकरांना गणेशपुरीस नेऊन बाबांचा भरघोस आशीर्वादही मिळवून दिला. बाबांनी या गुरुमूर्तीकाराचा योग्य तो सन्मानही केला. तरीही ताईंच्या मनासारखा वेग काम घेईना. शेवटी बाबाच सर्व करवून घेतील; असा विचार करून, बाबांवर निर्भर राहून, ताईंनी आपले लक्ष नाशिकच्या शिबिराकडे वळविले. बाबांनी ताईंना नोव्हेंबरमध्येच पुढची शिबिरे घेण्यास सांगितले. गुरुआज्ञापालन हा तर ताईंचा धर्म! त्यांनी लागलीच नाशिक, पुणे, हैद्राबाद, श्रीवर्धन, गुलबर्गा, नागपूर इ. गावांच्या शिबिरांची आखणी केली. नाशिकला १९७७ च्या पाडव्याला शिबिराच्या दुसऱ्या मोहिमेचा नारळ फोडण्याचे निश्चित झाले. गुरुदेव ध्यानमंदिराची Intensive जोमात सुरु होतीच. शनिवारी रात्री मुक्कामास येणाऱ्या साधकांची संख्या वाढली. जागा अपुरी पडू लागली. म्हणून संधी मिळताच शेजारचा फ्लॅट मंदिराला जोडून टाकला. अवघ्या ८ दिवसात आवश्यक ती रकम

उभी झाली. संकल्प सुटताच तो पुराही होतोच. पैसा बँकेत नसतो की लक्षाधीश, कोट्याधीश मोठ्यावलवाल्यांच्या भक्कम देणग्याही मिळत नाहीत. अभक्तांचा पैसा न घेण्याच ताईंचं ब्रीद. ताईंच्या भक्तांत महिन्याच्या अखेरीस कशीतरी दोन टोकांची मिळवणी करणाऱ्या मध्यमवर्गीय भक्तांचा भरणा अधिक. श्रमजीवी लोकांचाही समावेश आहे यात. मग हा पैसा येतो कसा ! 'तुझ्या घरी ऋद्धीसिद्धी झाडू मारतील, तुला काही कमी पडणार नाही।" असे तोंड भरून प. पू. बाबांनी दिलेले आशिर्वाद आहेत पाठीशी. निरपेक्षतेचा वारसा आहे हा !

मार्च १९७७ उजाडला नि नाशिकच्या शिबिराची जोरात तयारी सुरू झाली. सौ. जेऊरकरांची (नाशिक शिबिराच्या यजमान व एक कुण्या भक्त.) धावपळ चालू होतीच. शिबिराला निघण्याच्या आदल्या दिवशीच प. पू. ताईंना नातू झाल्याची खुशखबर आली. सर्वांना आनंद झाला. "आता मी संसार ऋणातून पूर्ण मुक्त झाले. गुरुकार्याला पूर्णपणे वाहून घेण्यास शास्त्रदृष्ट्याही पूर्ण मोकळी झाले." इति ताई. सौ. सुषमाच्या मुलाचे पेढे वाटून गोड तोंडाने मोठ्या आनंदाने नाशिक शिबिराचे यात्रिक सद्गुरुनाथ महाराजकी जय, पुकारून नाशिककडे रवाना झाले.

निवडणुकांची धामधूम सुरू होती नाशिकला. तरीही या शिबिराची धाम-धूम नाशिककरांना अधिक जाणवली. प. पू. ताईंचे गुरुआकर्षणच जबरदस्त ! जनता शिबिराकडे आपोआप आकृष्ट झाली. घवघवीत यश शिबिराच्या पदरात पडले. प. पू. बाबांनी विदेश यात्रेस जाण्यापूर्वीही प. पू. ताईंना शिबिरे घेण्यास सांगितले होते. प. पू. ताईंची कार्याची झेप नि वेग विलक्षण. अवघ्या १३ महिन्यात २१ लहानमोठी शिबिरे घेऊन महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यांत गुरुंचा निरोप पोचविला. गुरुंच्या जयजयकाराने वातावरण दुमदुमून टाकले. सर्वत्र उत्स्फूर्त जोरदार स्वागत झाले प. पू. ताईंचे आणि त्यांच्या ध्यान सेनेचे. अक्कलकोटला तर अक्कलकोटच्या स्वामींनी त्यांच्या ओटीत दोन नारळ घातले. हा भरघोस आशीर्वाद मिळवून सातारा, कऱ्हाड, कोल्हापूर, सोलापूर इ. शहरे आपल्या ध्यान सेनेसह पादाक्रांत करीत, सर्वत्र गुरुभक्ती-ध्वजा फडकवीत, एकापेक्षा एक सरस विजय मिळवीत गुरुंच्या जयजयकारात सर्वत्र गुरुंचा निरोप पोचवून चक्राल्यास गुरुदेव ध्यानमंदिरात विसावल्या. त्यावेळी सिद्धयोग-ध्यान-शिबिरे होती. दीक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झाला नव्हता. आता 'दीक्षा देण्या साधुजना' ही सिद्धयोग ध्यान-दीक्षा-शिबिराची फेरी सुरू झाली. नाशिक, गुलबर्गा, श्रीवर्धन, पुणे, हैद्राबाद, नागपूर अशी एकामागोमाग एक शिबिरे घेण्यात आली. गाणगापूरला संगमावर प. पू. ताईंना दोन कुण्यांची अनपेक्षित पडलेली मिठी, गुरुक्षेत्री, गुरुपदी पोचलेल्या प. पू. ताईंचे देवळात झालेले जल्लोष स्वागत, श्रीशैलमूला देवळाच्या पुजाऱ्याने श्रीशैलबरोबरच श्री—कुसुमेश्वरांची केलेली पंचारती, पुणे, श्रीवर्धन हैद्राबादला आलेले प. पू. ताईंच्या वाक्पटू दैवी, यौगिक सामर्थ्याचे अनुभव आणि नागपुरास वयोवृद्ध, तपोवृद्ध, योगीश्रेष्ठ, श्री जनार्दनस्वामींनी प. पू. ताईंवर केलेल्या कृपेचा वर्षाव, सर्वच घटना अविस्मरणीय ! या सर्व शिबिरांचा एक स्वतंत्र इतिहासच होईल. या शिबीरांनी गुरुपीठाचा, गणेशपुरीचा पत्ता ज्याना नव्हता त्यांना कळविला. आणि गुरुंची माहिती, महती लोकमानसावर ठसविली. गुरुभक्तांच्या ध्यानसेनेत अनेकांचा समावेश केला, ठिकठिकाणी केंद्रे स्थापन केली. आज नागपूर, नाशिक, पुणे, खोपोली, श्रीवर्धन येथे गुरुभक्तांच्या योगाने जोरदार मूळ धरले आहे. केंद्रे उत्तम चालू आहेत. श्रीगुरुदेव मंदिराशी सतत संपर्क राखून आहेत. विशेष कार्य-क्रमांना या सर्व केंद्रातील साधक श्रीगुरुदेव ध्यानमंदिरात येऊन राहतात. सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होतात. गुरुमाऊलीच्या सत्संगाने तृप्त होऊन परत जातात. श्री गुरुदेव–मंदिर–आश्रम त्यांचे Second home बनले आहे. ही सर्व केंद्रे गुरुकृपेच्या सावलीत वाढत आहेत. इतक्या दूर राहूनही प. पू. ताईंच्या दैवी सामर्थ्याचे, यौगिक बळाचे विविध अनुभव येत आहेत त्यांना. नागपुरास तर केंद्राचे जाळे विणले जात आहे. ताई म्हणतात "भूमी सुपीक आहे."

आता पुतळ्याचे काम पूर्ण झाल्याशिवाय स्थान सोडायचं नाही असा निर्णय घेतला ताईंनी. "विजयादशमीचा मुहूर्त साधा मूर्तिस्थापनेसाठी" असं बाबांनी सांगितले. बाबाच आता सर्व करवून घेणार हा ताईंचा विश्वास. तर बाबांनी सांगितलेला मुहूर्त टळू द्यायचा नाही हा मूर्तिकाराचा निर्धार. गुरुमूर्ति-स्थापना म्हणजे अति पुण्याईची गोष्ट ! त्यासाठी भरपूर पुण्य आपल्या पदरी पाहिजे. यासाठी ताई स्वतः तर तपाने तावत होत्याच पण साधकांकडूनही विविध प्रकाराने तापस करवून घेत होत्या. पुतळा पूर्ण होत आला. नि कलाकारांच्या मार्गात अनपेक्षित अडचणी उभ्या राहिल्या. प. पू. ताईंनी उग्र तापस मांडले. सर्व अडचणींवर मात करून विजया दशमीचा मुहूर्त साधण्याचे सामर्थ्य गुरुकृपेने प्राप्त झाले. नवमीस सायंकाळी ७ वा. प. पू. बाबांच्या मूर्तीने मंदिरात प्रवेश केला. विजयादशमीस गुरुमूर्तीशा(?)च्या हस्तेच मूर्तीची स्थापना करण्यात आली मोठ्या समारंभपूर्वक. ताईंनी आपल्या एकलव्याच्या भक्तीने त्या मूर्तीत प्राणप्रतिष्ठा केली. बाबा स्वतः आपल्या या प्रतिमेवर खूष आहेत. ही मूर्ती म्हणजे 'ताईंचा मुक्तानंद' म्हणून ते ताईंच्या गुरुभक्तीचा गौरव करतात. तर बाबांची ही बोलकी प्रतिमा पाहून 'किसनीभक्ती' असे सहजोद्गार बाबांच्या भक्तांच्या मुखातून बाहेर पडतात. तर बाबांना पाहून लोक क्षणभर पायरीवरच थबकतात. ताईंच्या एकनिष्ठ, अनन्य-भक्तीचे प्रतीकच आहे हे. उगाच नाही "ऐसा शिष्य होणे न" असे उद्गार ताईंच्या एका भक्ताबद्दल अमेरिकेत बाबांच्या मुखातून उत्स्फूर्त बाहेर पडले.

ही गुरुमूर्ती मंदिरात बसल्यानंतर साप्ताहिक शिबिराची गर्दी वाढू लागली. एकाचा अनेक होणे हा चितीचा धर्म. साधकांची संख्या भराभर फुगू लागली. सोसायटीच्या डोळ्यावर आली ही मंदिराची भरभराट. ही कॉलनी फक्त राहण्यासाठी. पब्लिकची ये जा नको आम्हांस येथे, तुम्ही सार्वजनिक कार्यक्रम बंद करा. असे रोजचे टुमण सुरू झाले मधून मधून. पण ताईंनी मंदिरातील कार्यक्रम नेहमीप्रमाणेच चालू ठेवले होते. अखेर संघर्ष वाढविण्याऐवजी सामोपचाराने घ्यावे, रामायणातील रावण चेत-विण्यापेक्षा नसत्र संघर्षाला शांत करणेच इष्ट असा विचार करून प. पू. ताईंनी आपत्काळ म्हणून रोजची प्रवचने बंद करण्याचा निर्णय घेऊन रविवार पूर्ण दिवस कार्यक्रम नि गुरुवारी सायंकाळी ६ ते ७॥ ही सोसाय-टीची सवलत पदरात पाडून घेतली. पण ज्ञानेश्वरीवरील प्रवचने बंद म्हणजे आज एक तपाच्यावर चालू असलेल्या ज्ञानेशांच्या सेवेत खंड. सर्वांच्या विरोधाला तोंड देऊन सर्व अडचणींवर मात करून, प्रवचनांच्या गोडीने ज्या वाचका कोठेही व केव्हाही प्रवचनास येत राहिल्या त्यांना प्रवचन सुखापासून वंचित कसं करायचं ! यासाठी आपले हक्काचे स्थान असूनही पूर्वीसारखे दरवेशाचे जीवन पत्करावे लागले तरी हरकत नाही. पण प्रवचने झालीच पाहिजेत यासाठी देवळे, हॉल यांचा शोध सुरू झाला.

पण इकडे ताईंना स्फुरण झाले की स्थान तयार झाले असता बाहेर प्रवचने का? प्रवचने गुरुमूर्तीसमोरच व्हावीत. पण बाहेरच्या प्रवचनरसिक साधकांची सोय काय? यावरही ताईंना उपाय सुचला. प्रवचने आश्रमातील लोकांसमोर व्हायची नि टेप करून बाहेर टेप सेन्टर्स सुरू करायचे. योजना यशस्वी झाली. १०-१२ श्रोत्यांसमोर दिलेली प्रवचने देखील रंगू लागली. पण दुधाची तहान ताकावर किती दिवस भागणार? शेवटी रायकरांकडे (पारदांस) प्रवचने सुरू झाली. रविवारची ध्यानशिबिरे सुरू होती पण सोसायटीच्या अडवणुकीच्या धोरणामुळे पुढे तीही बंद करावी लागली. आपत्तीच इष्टापत्ती ठरते. परिस्थितीवर मात करण्यातच खरा पुरुषार्थ हा ताईंचा सिद्धान्त. एक केन्द्र बंद झाले म्हणून का कार्य थांबते? एकाचे अनेक होणे हा तर चितीचा धर्म! निरनिराळ्या ठिकाणी सिद्धयोग ध्यानकेंद्रे सुरू करण्याची ताईंची योजना तयार झाली.

गणेशपुरीचे खेटेही सुरूच होते. प. पू. बाबांनी विचार केला की ताईंच्या संसारिक जबाबदाऱ्या मागेच पूर्ण झाल्या. आता अवघाचि संसारही नक्कम पायावर उभारला गेला आहे. तेव्हा पुढील कार्याच्या दृष्टीने ताईंना लौकिक अर्थाने संन्यासदीक्षा देणे इष्ट. संन्यस्त जीवन तर त्या आज कित्येक वर्षे जगत होत्याच पण शास्त्रोक्त शिक्कामोर्तब होणे आवश्यक. आध्यात्मिक करिअरसाठी. म्हणून १५ मे १९७८ साली बाबांनी ताईंना शास्त्रोक्त संन्यासदीक्षा दिली नि ताई कुसुमेश्वरीच्या स्वामी उमानंद बनल्या. संसारी स्त्रियांपुढे एक नवा आदर्श ठेवला गेला.

ताईंनी संन्यासदीक्षा घेतल्यावर बाबा त्यांच्या श्रीगुरुदेव ध्यान मंदिरास भेट देणार होते. आता ती ही अट पूर्ण झाली. बाबांनी मे मध्ये श्री गुरुदेव ध्यान मंदिरात येण्याचे निश्चित केले. प. पू. ताई आपल्या गुरुदेवांच्या आगमनाची आज किती दिवसांपासून तयारी करीत होत्या. त्यांच्या स्वागतात, त्यांच्या व्यवस्थेत इवलेसेही न्यून राहू नये म्हणून कटाक्षाने, जातीने सर्व व्यवस्था परत परत बघत होत्या. ताईंची प्रत्येक कृती योजनाबद्ध नि शिस्तबद्ध! त्यामुळे वेळेवर गोंधळ नाही. गडबड नाही की धावपळ नाही. प. पू. बाबा आपल्या परिवारासह ३०-५-७८ च्या सकाळी आले. दोन दिवस राहिले. आपल्या ताईचा मांडलेला अवघाचि संसार डोळे भरून पाहिला. वडीलकीच्या नात्याने, घरातील कर्त्या पुरुषाच्या जबाबदारीने चारी फ्लॅट्स फिरून पाहिले. कानाकोपरा तपासला. गच्चीवर फेऱ्या मारल्या. किचनमध्ये जाऊन अन्नपूर्णींना दर्शन दिले. त्यांच्या कामाची आस्थेने चौकशी केली. नाश्त्याच्या वेळी उपमा करण्यात रस घेऊन थोडा वेळ बल्लवाचार्याचीही भूमिका पार पाडली. "उनी संगे दढू लागे" हा अनुभव चाखला अन्नपूर्णींनी. "ताई फार महान आहे. कर्तबगार आहे. मुंबईत तिने हा सुरेख गुरु तयार करून मोठे कार्य केले आहे. फार चांगले काम करते आहे ताई." असे तोंड भरून कौतुक केले किचनमध्ये त्या साधकांसमोर. प. पू. ताईंनी आखलेले शिस्तबद्ध नि बहारदार कार्यक्रम पाहून तर सर्वच खूष झाले. आश्चर्यचकित झाले. ताई राउंड न घेताही सर्व कामे इतकी व्यवस्थित वेळच्यावेळी होतात तरी कशी याबद्दल वाटणारे आश्चर्य, कुतूहल अम्मांनी बोलूनच दाखविले. अन्नपूर्णेची व्यवस्था चोख होती. सर्व पाहुणे मोठे खूष होते अन्नपूर्णेच्या पाककौशल्यावर. चवीने खात होते. सर्व पदार्थांचा आदर करीत होते. आणि खूपीत होते बाबा आपल्या ताईच्या पराक्रमावर, कर्तबगारीवर. इतक्या अल्पावधीत मुंबईसारख्या मोठ्या शहरात, बाहेरच्या कोणाची मदत न घेता ४ फ्लॅट्सचा आश्रम ताईने उभारला, इतकी सुंदर मूर्ति मंदिरात बसविली, (गुरुमूर्तीची स्थापना म्हणजे ताईच्या यशोमालेतील तुराच) इतकी मोठी शिस्तबद्ध ध्यानसेना तयार केली, कर्तृत्वाला तोड नाही नाईच्या! हे सर्व पाहून बाबा सुखावले, आनंदले आणि दोन दिवस मोठ्या मजेत राहिले. जायच्या दिवशी गुरुशिष्याचा सुखसंवाद चालू होता. ताई मखरासंबंधी बोलत असाव्यात. प. पू. बाबा एकदम म्हणाले, "मी माझ्या बाबांचे केले तू तुझ्या बाबांचे कर." चतुर ताईंनी हिन्ट घेतली. बाबांना मखराची कल्पना आवडल्याची खूणगाठ बांधली. नि आपल्या बाबांनी आपल्या बाबांना मखरात बसवले तसेच आपणही आपल्या बाबांना मखराच्या सुंदर कोंदणात बसवायचा संकल्पही सोडला मनात. पुत्राचा पुरुषार्थ पाहून पित्याच्या मुखावर ओसंडणारा प्रसन्न आनंद येथील वास्तव्यात बाबांच्या मुखावर झळकत होता. ताईंच्या प्रसन्न व्यक्तित्वाने, कुशलनेतृत्वाने, आणि भक्तिभावाने भारलेल्या भक्तांच्या अस्तित्वाने येथील वातावरणात एक आगळीच प्रसन्नता पसरली होती. भारावलेल्या अंतःकरणाने प. पू. बाबांनी या स्थानाचा आणि स्थानाच्या स्वामिनीचा निरोप घेतला.

प. पू. बाबा गणेशपुरीला गेले नि नवीन केन्द्रे सुरू करण्याची ताईंची योजना पुढे आली. परंतु बाबा लवकरच तिसऱ्या विदेश यात्रेस जावयाचे होते. ते येथे असेतो गणेशपुरीस जाण्यासाठी मोकळा वेळ ठेवला आणि १८ ऑगस्टला बाबांना विमानतळावर निरोप देऊन आल्यावर सायंकाळी नारळी पौर्णिमेच्या मुहूर्तावर ताईंनी महालक्ष्मीचे केंद्र सुरू करून आपल्या नवीन मोहिमेचा नारळ फोडला. एका महिन्यात ८ केंद्रांचे उद्घाटन झाले. ताई म्हणजे सगुण शक्तीच! या शक्तीला आवर सोसायटी कशी घालणार? गुरुदेवध्यानमंदिरातील कार्य व्यापक झाले. मुंबईच्या कानाकोपऱ्यात जाऊन पसरले. ज्योतीने ज्योती पेटू लागल्या. आता सर्व केंद्रेही लहानमोठी शक्तिस्थानेच बनवून टाकली ताईंनी. येईल त्याला ध्यान लागू लागले.

हळूहळू सोसायटीचा विरोध बोथट झाला नि ताईंनी त्यांच्या सवलतीच्या चौकटीत बसवूनही मोठ्या युक्तीयुक्तीने सर्व कार्यक्रम परत मंदिरातच चालू केले. 'इयं चातुर्यं शहाण झाले.' हाच अनुभव येतो पदोपदी. प्रथम रायकरांकडील प्रवचने बंद करून भेटीसाठी ठरवून दिलेल्या वेळातच प्रवचने सुरू केली. ही ॲडिशनिंग्हटी पचली पाहून ताईंनी रविवारी ध्यानदीक्षा ही सुरू केली, सकाळच्या सत्संगाच्या वेळात. सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तीत नि सोसायटीने दिलेल्या वेळातच! सोसायटीला बोलायला जागाच नाही! स्थान तयार करायचं, पुण्यक्षेत्र बनवायचं म्हणजे १२ वर्षे एका जागी गुरुचे वास्तव्य असणे आवश्यक—त्यासाठी ताईंनी आता क्षेत्रसंन्यास घ्यायचा ठरविले. बाहेरचे व्याप आवरते घेतले. १९७८ दिवाळीच्या सुटीत हरिहरेश्वर या क्षेत्रस्थानी तीन दिवसांचे तपस्याशिबीर घेऊन ताईंनी आपला क्षेत्रसंन्यास जाहीर केला. नि त्याबरोबरच बाबांनी आज्ञा केली तरच हे स्थान सोडायचं हेही सांगून टाकले. हरिहरेश्वर म्हणजे दक्षिणकाशी. या पावनक्षेत्री गुरूच्या पावन सहवासात घालविलेले तीन दिवस, तीन रात्री म्हणजे त्या शिबिरात सहभागी झालेल्या साधकांनी केलेली अनंत पुण्याची कमाईच!

हरिहरेश्वराहून परत आल्यानंतर ताईंनी आपल्या खोलीची गुहाच बनविली आणि या चिन्मयगुहेतच लेखन, वाचन, ध्यान—साधनेतच त्या जास्तीत जास्त काळ घालवू लागल्या. शैविझमचा सखोल अभ्यास सुरू केला. दुपारी आश्रमवासियांना त्यातील निवडक भाग वाचून दाखवत.

इतक्यात अमेरिकेहून बाबांचा संदेश आला Training Classes सुरु कर. त्याप्रमाणे ११ मार्च १९७९ ला ताईंनी सिद्धयोग अभ्यासवर्ग सुरु केले. जून अखेर १६ प्रवचने झाली. फार उपयुक्त ठरली ही प्रवचने. "असं ज्ञान कोठेही मिळायचं नाही अन्यत्र" ज्याच्या त्याच्या मुखी हीच भाषा!

२१ डिसेंबर १९७८ ला प. पू. ताईंनी वयाची ६२ वर्षे पूर्ण करून ६३ व्या वर्षात पदार्पण केले. लौकिक दृष्ट्या त्यांनी वृद्धापकाळात प्रवेश केला. पण दिव्यतेजात न्हाऊन निघालेली त्यांची दिव्य तनु आणि मुखावर पसरलेले दिव्य गोड भाव त्यांच्या चिरतारुण्याची ग्वाही देतात. सतरावियेचे स्तन्य पिणाऱ्या या महायोगिनीला वार्धक्य स्पर्श तरी कसं करणार? उलट केस काळे कुळकुळीत झाले आहेत नि नवीन दात येत आहेत. ताई म्हणतात हा महायोग आहे. मानवी आकार धारण केला म्हणून मानवाचे सर्व सोहळे करायचे. ताईंच्या भाषणानेच या दिवसाचे विशेषत्व, माहात्म्य स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, "आज श्री कुसुमेश्वरीचे नाटक संपले नि आता स्वामी उमानंदाचे नाटक सुरु होणार उद्यापासून. आज त्या नाटकाचे 'भरत वाक्य'. थोडक्यात आता कुसुमेश्वरीचे पर्व संपलं."

या पर्वात त्यांनी खूप खूप कार्य केले. गीतेच्या ४ थ्या अध्यायात लुप्त झालेला योग आता प्रगट होत आहे असे त्या वारंवार सांगतात. तो योग म्हणजेच सिद्धयोग. या योगाचे स्वानुभवसिद्ध शास्त्रच त्यांनी तयार केले. सिद्ध–गुरुभक्तियोगाची सर्व अंगे तर त्यांनी परिपुष्ट केलीच पण त्या योगाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी आवश्यक ती योग्य साधन संपत्तीही सिद्ध केली. ती साधने हाताळणारे कुशल कार्यकर्तेही तयार केले. गुरुमूर्तीची पूजा करण्यासाठी पुजारी, गुरुची कीर्ती गाण्यासाठी कीर्तनकार, गुरुची महती पटविण्यासाठी प्रवचनकार आणि गुरुगुणगानांनी लोकांची मने लुब्ध करणारी भजनीमंडळे ही सर्व यंत्रणा कार्यान्वित करणारे संघटनाकुशल कार्यकर्ते कल्पक संयोजकही पाहिजेत, कार्यावर लक्ष ताईंचे. ताईंना हा ग्रुप इतका शिस्तबद्ध तयार झाला आहे की बाबा ताईंशी बोलताना, 'तुझी सेना' असा उल्लेख करतात या ग्रुपचा. ताई म्हणतात, "ठोकून ठोकून ही ठोक्याची पातेली तयार केली आहेत." उगाच नाही त्यांचा निराळेपणा "उठून दिसत." विविध स्वरूपाचे आहे प. पू. ताईंचे कार्य. त्यांनी अपार ग्रंथसंपदा निर्माण केली. (माहिती अंकात इतरत्र पहा.) पण "कुसुमेश्वरी गुरुचे करी" या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन १९६८ सालापासून सुरू झालेले श्री कुसुमेश्वरीचे हे नाटक रंगतच गेले. स्वतःचे स्थान नसल्याने रंगभूमि सारखी बदलत असे इतकेच.

१ जानेवारी १९७९ पासून ताईंच्याच भाषेत "स्वामी उमानंदांचे नाटक सुरू झाले."

१५ मे ला स्वामी उमानंदांचा संन्यासदीक्षा वर्धापन दिन. त्यानिमित्त संन्यस्त जीवनाला साजेसा 'तपस्या सप्ताह' कार्यक्रम स्वामींनी आयोजित केला. हा 'तपस्या सप्ताह' मुंबईत खूपच गाजला. ६४ ब्राह्मणांनी (पैकी सुमारे १५ संस्कारित ब्राह्मण) सोवळ्यात केलेले गुरुचरित्र नारायण आणि स्वामींची ब्रह्मरसाने ओथंबलेली ज्ञानेश्वरीवरील रसाळ प्रवचने ही या सप्ताहाची वैशिष्ट्ये. नागपूर, नासिक, पुणे, खोपोली आणि जेथे जेथे केन्द्रे आहेत त्या सर्व गावाहून तपस्या सप्ताहात भाग घेण्यास साधक बहुसंख्येने उपस्थित. गुरुपौर्णिमा, स्वामींचा वाढदिवस व दीक्षादिन या वार्षिकोत्सवांना सर्व केंद्रांनी प्रतिनिधित्व करायचेच असा दंडकच घातला आहे स्वामींनी। याखेरीज केंद्रे चालवावयाची तर कार्यकर्ते कार्याशी पूर्ण परिचित पाहिजेत. यासाठी गुरुदेव ध्यानमंदिरात प. पू. स्वामींच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या आश्रमात या कार्यकर्त्यांनी सवडीनुसार साधनेस येऊन रहावे, येथील कार्यपद्धतीची माहिती करून घ्यावी, गुरुभक्तियोगाचे प्रात्यक्षिक पाठ गिरवावे, स्वामींच्या पावन सहवासात आपली देहमनबुद्धी धुवून काढावी नि सिद्धयोगाचे सिद्धविद्यार्थी बनून कार्यास लागावे...थोडक्यात पद्धतशीर ट्रेनिंगच घ्यावे. अशी नवीन योजना प. पू. स्वामींनी कार्यान्वित केली आहे. नवे जुने कार्यकर्ते या योजनेचा लाभ घेत आहेत.

'नर करणी करे तो नरका नारायण होय' हे स्वामींनी स्वतःच्या उदाहरणाने पटवून दिले आहे. स्वामी उमानंद म्हणजे जीव ब्रह्ममय कसा होतो याचे हे प्रात्यक्षिक आहे. नराचा नारायण होण्याचा आदर्शपाठ आहे. इतकेच नव्हे तर संसारसागरात गटांगळ्या खाणाऱ्या जीवांना हा दीपस्तंभच आहे. नियतीने या महायोगिनीला जन्मास घातले. पण जगापुढे आणले प. पू. स्वामी मुक्तानंद परमहंसांनी. महायोग्यालाच महायोगिनीची ओळख पटणार. प. पू. ताईंच्या रूपाने त्यांना मूर्तिमंत पावित्र्य भेटले. महायोगिनीची सर्व सुप्त लक्षणे त्यांच्या ठायी त्यांना प्रतीत झाली. उजव्या भुवईखालील तीळ, डाव्या तळपायावरील तीळ व महायोग्याची खूण पटविणारी अन्य सामुद्रिक लक्षणे त्या सर्वज्ञ महायोग्याच्या (प. पू. बाबांच्या) ध्यानात आली नसतील का? आलीच असणार आणि म्हणूनच आपण जन्मभर कमावलेले यौगिक धन व गुरुकृपेने प्राप्त झालेली दैवी संपदा सांभाळू शकेल, पेलू शकेल, नव्हे भरही घालू शकेल अशी व्यक्ती योगायोगाने म्हणा, नियतीच्या पूर्वयोजनेने म्हणा, भेटली अखेर, या विचाराने बाबा संतोषले, तुष्टले आणि त्यांनी नियतीने घडविलेली ही योगिनी स्वामी उमानंदांच्या रूपाने जगापुढे उभी केली. पूर्णात् पूर्णमुदच्यते। या न्यायाने आज पूर्णत्व प्राप्त झालेल्या प. पू. स्वामी उमानंदांची अध्यात्मिक प्रगती व गुरुकृपाप्राप्ती निर्देशीत करणारी कालनिर्देशिकाही मोठी उद्बोधक आहे. त्यांच्या वयाच्या ४५ व्या वर्षी ज्ञानगुरुची—स्वामी चिन्मयानंदांची भेट.

वयाच्या ५२ व्या वर्षी दीक्षाकर्त्या गुरुची (गुरुदेव स्वामी मुक्तानंद परमहंस) भेट. समाधीपाशी दीक्षा दिली व एकमुखी रुद्राक्षाचा कंठा घातला.

५४ व्या वर्षी गुरुदेवांनी भाळी भस्माचा त्रिपुंड्र व पिंडी स्वहस्ते काढली.

५५ व्या वर्षी गुरुदेव मुक्तानंदांनी मस्तकावर हात ठेवला.

५६ व्या वर्षी दसऱ्याला हातीकडून गुरुदेवांनी गळ्यात माळ घालविली.

५७ व्या वर्षी प. पू. गुरुदेवांनी किरमिजी रंगाचे वस्त्र पांघरविले. ओंकारेश्वरात संक्रांतीच्या दिवशी भगवान नित्यानंदासमोरील नैवेद्य गुलाबाची फुले वाहून प. पू. ताईंना (स्वामींना) खाण्यास दिला. ५८ व्या वर्षी अक्कलकोटच्या स्वामींनी दोन नारळ ओटीत घातले.

५९ व्या वर्षी प. पू. गुरुदेवांनी प. पू. ताईंच्या गळ्यात आपल्या गळ्यातील हार घातले. व त्यांच्या शिखेची पूजा बांधली.

६० व्या वर्षी गुरुदेवांनी हातीकडून ओटी भरविली आणि दंडात झोळी अडकविली (भिक्षा मागण्याचा अधिकार, संन्यस्त जीवनाची नांदी की सर्वसिद्धीची भिक्षा!)

६१ व्या वर्षी गाणगापुरास दोन कुत्र्यांची मिठी पडली. (कुत्र्यांनी आपल्या मालकाला, दत्ताला.)

शैलमला पुजाऱ्याने शैलमबरोबरच स्वामींची पंचारती केली. नागपुरास पूज्य जनार्दन स्वामींनी आपल्या गळ्यातील हार घातला. पूर्ण कृपेचा वर्षाव केला.

वयाच्या ६२ व्या वर्षी गुरुदेवांनी संन्यासदीक्षा दिली. दोनदा मस्तकावर (मागे पुढे) हात ठेवून मस्तकाचे चाळे केले.

६३ व्या वर्षी गुरुदेवांनी एका हृदयीचे दुसऱ्या हृदयी घातले.

अशाप्रकारे कृपेच्या माध्यमातून अनवरत सामर्थ्याची बरसात करून प. पू. बाबांनी आज अनवरत आनंदाचा वर्षाव करणाऱ्या स्वामी उमानंद विश्वकल्याणार्थ सिद्ध केल्या आहेत.

गुरूने दिलेले नाव सार्थ असते. नावावरून त्याचे कार्य, जबाबदारीची जाणीव इतरांना व्हावी हा नाव ठेवण्याचा हेतू! संन्यासदीक्षेनंतर उमा हे नाव देऊन ताईंच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा, असामान्य भूमिकेचा, अमाप क्रियाशील कर्तृत्वाचा केवढा गौरव केला आहे बाबांनी! एका वेदोक्त सूक्तात रुद्राच्या विविध भूमिकांबरोबर उमेलाही किती विविध भूमिका वठवाव्या लागतात याचे सुंदर वर्णन केले आहे.

रुद्रो नर उमा नारी। तस्मै तस्यै नमो नमः

रुद्र विष्णू तर उमा लक्ष्मी, रुद्र सूर्य उमा छाया.

रुद्र सोम उमा तारा, रुद्र दिवा उमा रात्री, रुद्र यज्ञ उमा वेदी, रुद्र वन्ही उमा स्वाहा, रुद्र वेद उमा शास्त्र, रुद्र वृक्ष उमा वल्ली, रुद्र पुष्प उमा सुगंध, रुद्र अर्थ अक्षरा सोमा, रुद्र लिंग उमा पीठ. अशा या अनंत भूमिका शिवाच्या क्रियाशील शक्तीला नटवायच्या असतात.

प. पू. ताई म्हणतात उमा शिवाची क्रियाशील शक्ती उमाकुमारी, ब्रह्मकुमारी. ब्रह्मजिज्ञासा पूर्ण करण्यासाठी कोठे जायचे? उमेकडे. शिव active नसतो तर उमा! उमा व्यक्त शंकर, शंकर अव्यक्त उमा. कल्याणकारी शक्ती तीच उमा. व्यवहारात ही शंकराची शक्ती उमा आपल्या उपयोगी पडते. म्हणूनच का बाबा म्हणाले असतील "ती एक दिवस महामाया होणार आहे. लोक तिची पूजा करणार आहेत."

उमा चितांचा विलास, हाच ज्ञानेशांचा अमृतानुभव! हाच उमानंद! नित्य—मुक्तआनंद आहे तेथे उमानंद! उमानंद म्हणजे नित्यमुक्त व्यक्त प्रगट आनंद.

बागचं नंदनवन बनविले, आश्रमाचा आनंदाश्रम झाला, भक्तांना आनंदरसकल्लोळी बुडविले. आता भूलोकांचे आनंदभुवन बनवून "आनंदे भरीन विश्व सारे" या जिद्दीने पुढे सरसावलेल्या स्वामी मुक्तानंदांच्या उमानंदाना खूप कार्य करायचं.

कोणते? प. पू. बाबाच एकदा म्हणाले होते म्हणे,

"तुझ्याकडून फार मोठं कार्य होणार आहे. तुला १०८ योगविद्यापीठे चालवायची आहेत." प० पू० बाबा जगभर योगविद्यापीठांचे जाळे विणत आहेत. हीच योगविद्यापीठे चालविण्याचे महान कार्य प. पू. ताईंच्या हातून घार पडायचं असेल, म्हणूनच प. पू. बाबांच्याच शब्दात "तू खूऽप केलं, खूऽऽप करायचंय."

**सद्गुरुनाथ महाराजकी जय!**

*

मनाला जेथे श्रम नाही तो आश्रम!

*

फळाच्या माध्यमातून कल्याणकारी शक्ती (कृपा) भक्ताच्या ओंजळीत ओतायची असते,
ती शक्ती रसरशीत माध्यमातूनच दिली जाणे इष्ट.

*

मी करते किंवा करतो ही भावना सोडून द्या. गुरुचे इन्स्ट्रूमेंट बना. त्याची सत्ता व आपली नम्रता हे तत्त्व
जर ध्यानात ठेवले, आचरणात आणले तर त्याच्याकडून सामर्थ्य मिळेल.

*

कर्मकाण्डातून मुक्तता झाल्याशिवाय चिंतामुक्त होणार नाही.

*

गुरुची कृपादृष्टी अमृतमय!

(स्वामी उमानंद)

*

# गुरुदेव मुक्तानंद म्हणे

माझी आई (कुसुमेश्वरी) महाबळेश्वरला असताना चित्शक्तीविलासाचे मराठी भाषांतर करण्यास परमपूज्य मुक्तानंद बाबांकडे रोज जात असे. एक दिवस तिला बरे नव्हते म्हणून ती जाणार नव्हती. तिचा निरोप सांगायला मी परमपूज्य बाबांकडे गेले. मला पहाताच ते म्हणाले, कि 'तुझ्या आईसारखी दुर्मिळ आई मला मिळाली असती तर मी केवढा महान झालो असतो व काय काय करून दाखवले असते. आईची सर्व कामे करत जा बरं का...!' वाचकहो, ह्यापेक्षा माझ्या आईची ओळख करायला दुसरे योग्य शब्द माझ्याजवळ नाहीत.

—नीलिमा शर्मा

परमपूज्य बाबांच्या एकसष्ठाव्या वाढदिवसाला गणेशपुरीला आम्ही सर्व परमपूज्य ताईंचे भक्त गेलो होतो. निरोप घेऊन परत येण्याच्यावेळी परमपूज्य ताईंचा हात हातात घेऊन परमपूज्य बाबा आमच्याकडे वळून म्हणाले, 'ताईच्यात मला बघा. ताई फार उच्च कोटीची योगिनी आहे.' आता याहून अधिक स्पष्ट काय सांगायचे!

—अक्का नाईक

परमपूज्य ताईंबरोबर आम्ही नेहमी आश्रमात जात असू. तेव्हा परमपूज्य बाबा परमपूज्य ताईंविषयी जे काही बोलत ते आम्ही ऐकलेले आहे.

'ताईंचा संयम पाहून मला फार कौतुक वाटते—एकवेळ जेवण, चटईवर निजते, माठातले पाणी नको. नास्ता नाही...'

'मला वाटले नव्हते मला अशी व्यक्ती मुंबईत मिळेल. अशी कोणी असेल मुंबईत तर आणून दाखवा...

'ताई, तुमचे ऋषीतुल्य, संयमशील जीवन बघून मी खूप खूष झालो आहे...'

'शर्मा अम्मासारख्या व्यक्ती आश्रमाला पाहिजेत. त्यांचे जीवन बघून मलाच शरम वाटते...'

'ताई ज्ञानी आहे, ध्यानी आहे, विद्वानही आहे. ताई तुमच्याकडून पुष्कळांना मार्गदर्शन होणार आहे. तुमचा क्लास जोरात चालो.'

दिल्लीच्या लोकांना परमपूज्य बाबा म्हणाले. 'ह्या चांगल्या भाषांतरकार आहेत. तत्त्वज्ञानी आहेत. फार दांडगा अभ्यास आहे. इंग्लिश फार चांगले आहे.'

'ह्यांच्याकडून दुसऱ्यांना ध्यान लागते. ज्ञानेश्वरी पण सांगतात. फार पवित्र वातावरण आहे घरचे. हजारोंना ध्यान लागणार आहे...'

'सगळे सगळे सोडले आहे हिने...'

'हजारात दहाजणी अशा नाहीत तर हिने काही बिघडणार नाही. तिला मी माझी खूप शक्ती दिली आहे. ती बोलेल ते खरे होणार आहे. वाचासिद्धी प्राप्त होणार आहे. नित्यानंद बाबांचे काही भक्त माझ्या विरुद्ध असाच प्रचार करीत. पण माझे काही बिघडले नाही.'

'तुझ्या अदृष्टातच महायोग आहे. अंग तापून तापून निघते.'

'काय सुंदर अनुभव येतात ताईला.'

'दिव्य योग आहे हा! काही कमी पडत नाही. खूप मिळणार आहे तुला.'

'तुला पुष्कळ चमत्कार दिसतील.'

'ताई मोठी पराक्रमी आहे. खूप पराक्रम करणार आहे.'

महाबळेश्वरला असताना 'चित्शक्तिविलास'चे भाषांतर करून रोज परत जाताना परमपूज्य बाबा परमपूज्य ताईंना फळे देत. एकदा गणेशपुरीहून आंब्याची टोपली आली होती. परमपूज्य ताईंना देण्यास जो आंबा काढत तो मोठा येई. परमपूज्य बाबा म्हणाले, 'हिचे कर्मफळच मोठे!' त्यावर परमपूज्य ताई म्हणाल्या, 'नाही, गणेशपुरीची प्रसादफळेच मोठी!'

चित्शक्तिविलासच्या निर्मितीचे कार्य हाती घेताना परमपूज्य बाबा लोकांना म्हणाले, 'शर्माअम्मा रोज आली तरच माझ्या हातून हा ग्रंथ पुरा होईल.' आणि परमपूज्य ताईंना म्हणाले, 'हा ग्रंथ मी तुला अर्पण करणार आहे.' व म्हणूनच चित्शक्तिविलास'च्या 'समर्पण', ह्या प्रकरणाच्या शेवटी ते लिहितात, 'माझ्या मातृदेव श्री कुसुमेश्वरीच्या स्मृतीत हा ग्रंथ समर्पित आहे.'

—साधक भगिनी

एक दिवस आम्ही काही बायका परमपूज्य बाबांच्या दर्शनाला गणेशपुरीला गेलो होतो. आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी सत्संगाला सुटी असल्याने परमपूज्य ताईदेखील गणेशपुरीला येणार होत्या. आम्ही हे सहज परमपूज्य बाबांच्या कानावर घालण्यासाठी म्हणून म्हणालो, 'उद्या ताईंना सुटी आहे. म्हणून ताई गणेशपुरीला येणार आहेत.' तशी ते एकदम उसळून म्हणाले, 'तिला कसली सुटी! ती तर सुटलेलीच आहे. तुमच्याचसाठी गळली आहे.'

—सौ. भातखंडे

परमपूज्य बाबा फॉरीन टूरवर जाण्यापूर्वी आम्ही परमपूज्य ताईंबरोबर गणेशपुरीला गेलो होतो. तेव्हा परमपूज्य बाबांनी परमपूज्य ताईंना 'शिबिरे घे' म्हणून आज्ञा दिली व म्हणाले, 'तुझ्या जिभेवर मुक्तानंद येऊन बसेल. कडक बोल. गुरुकृपा सर्व ठीक करेल. गुरुवर प्रेम कर.' मोजकेच शब्द पण परमपूज्य ताईंना गुरुकृपेचे भक्कम भांडवल देऊन गेले. ते पुढे म्हणाले, 'मी गणेशपुरीला व तू मुंबईला राहून कार्य करायचे. गुरु ॐ शिवाय तिसरे अक्षर नको.'

—सौ. भागवत

एकदा परमपूज्य ताईंच्या आज्ञेने आम्ही काही मुली गणेशपुरीला रहायला गेलो होतो. तेव्हाबरोबर परमपूज्य बाबांनी चौकशी केली. 'कोण कोठून आलात' वगैरे. आम्ही सांगितले की, 'आम्ही ताईंकडून आलो आहोत.' त्याबरोबर ते आमच्यापैकी एकदोघींच्या पाठीवर थाप मारत म्हणाले, 'ह्या ताईच तुमची गुरु आहे, तुमचा गुरु मुंबईला आहे. ताई लहान मुलांवर चांगले संस्कार करते. खूप चांगले कार्य करते. आमची कॉपी करते.' आपल्या गुरुपुत्रीविषयी श्री मुक्तानंद गुरुमाऊलीने निःसंदिग्धपणे काढलेले हे उद्गार ऐकून कोणाच्या मनात संदेह राहील!

—मुलींचा ग्रुप

'चित्शक्तीविलास' ह्या ग्रंथाच्या परमपूज्य ताईंनी केलेल्या मराठी अनुवादाला आशीर्वाद देताना परमपूज्य बाबा म्हणतात, 'अपने अंतर जगत की पूर्ण समझ चित्शक्तीविलास है। जिसका जन्म हिन्दी भाषा में हुआ था उसको अब सिद्ध परंपराकी योगिनी श्री कुसमेश्वरी मराठी भाषा में विलसित कर रही है। वह मराठी भाषांतर चित्शक्ती का पुरस्कार है। ध्यानयोगिनी कुसुमताई शर्माने ध्यान का अभ्यास करके ध्यान में कुछ देखके मराठी भाषानुयाइयोंके सन्मानार्थ सेवा रूपमें पुरुषार्थ के साथ यह भाषांतर किया है। उसके लिये आपका धन्यवाद। श्रीमती कुसुमताई एक उच्च कोटिकी योगिनी है। आप मेधावी एवं विद्वान हैं। कवियित्री भी हैं। आप बालबच्चों के साथ रहकर अपने पतिदेव को आदर सत्कार और सेवा आतिथ्य से संतुष्ट रखते हुए साधना करती हैं। आप सांसारिक जनों के लिये परम उदाहरण स्वरूप हैं। आप गृहस्थी, बालबच्चेवाली, बड़े अफसरकी धर्मपत्नि तथा पढ़ी लिखी होने से आज के महिला समाज के लिये उच्च आदर्शरूप हैं। आपका भाषांतर बहुजन हिताय शांतीदाता बने इति आशीर्वाद एवं गुरुदेवसे प्रार्थना।'

—स्वामी मुक्तानंद
(चित्शक्ती विलास)

परमपूज्य बाबा ४ एप्रिल १९७२ च्या पाडव्याला जेव्हा पार्ल्याला आले होते तेव्हा जनसमुदायाला उद्देशून परमपूज्य ताईंची ओळख करून देताना म्हणाले, "ही फार चांगली गुरु होणार आहे. नित्यानंदांचीच शक्ती हिच्यामध्ये आहे. हिच्या कार्याचे बाळ आता रांगताना दिसत आहे. पण दोन वर्षांनी ते इतके मोठे होईल की सिद्धांना पीळ भरू लागेल."

—श्री. अंदुरकर

परमपूज्य ताईंच्या कृपेने मला न्यूयार्कला परमपूज्य बाबांकडे जायची संधी मिळाली. तेथे आम्ही परमपूज्य ताईंकडून गेलेलो असल्याने परमपूज्य बाबा आम्हाला भेटले व आमच्याशी बोलले. ते म्हणाले, "ताई खूप मोठे कार्य करीत आहे. 'ऐसा शिष्य होणे नाही' अशी कामगिरी करीत आहे. फार मोठे कामगिरी करीत आहे." आमच्या परमगुरुंचे आमच्या गुरुदेवांबद्दलचे धन्योद्गार ऐकून आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

—कु. ललिता गोडसे

अमेरिकेहून अम्मा आपल्या पत्रात ताईंना लिहितात.

"ऐसा प्रतीत होता है की श्री गुरुदेवका ध्यानयोगका कार्य जगभरमें फैलनेवाला है और आप जैसी उच्च योगिनीद्वारा यह कार्य "और भी ज्यादा फैलेगा।"

दुसऱ्या एका पत्रात अम्मा लिहितात.

"गुरुपादुका अर्चना अर्थात गुरुस्मरणेश्वरी मिला। पूज्य गुरुदेवने वह पढा। और खुश हुए। वे कहते हैं कि आपके मुखसे सरस्वती निकल रही है। "या गुरुचरण सेवा तशा प्रसन्न देवा..." आपके पर श्री गुरुदेवकी अगाध कृपा है..."

—अम्मा

परमपूज्य बाबा विदेशयात्रेहून परत आल्यावर प० पू० ताईंसह आम्ही त्यांच्या दर्शनास गणेशपुरीला गेलो. परमपूज्य बाबा पुढेच बसलेल्या त्यांच्या काही भक्तांना प० पू० ताईंकडे हात करून म्हणाले, "ती तुमच्या मागे बसली आहे ना गादीवर, ती बडी साधू आहे. कशी दिसते बघा. मी तर आधी ओळखलेच नाही तिला. अगदी महादेवासारखी दिसते. मी तिला (मोठी) रुद्राक्ष देणार आहे." असं म्हणून पुन्हा गप्प झाले. थोड्यावेळाने अचानक त्यांनी परमपूज्य ताईंना एकट्यानाच जवळ पुढे बोलावले. प० पू० ताई हार घेऊन उठल्या आणि पुढे गेल्या. प० पू० बाबांनी आधी त्यांना हार सुद्धा घालू दिला नाही. आधी घाईघाईने स्वतः त्यांच्या गळ्यात मोठा भरदार शेवंतीचा हार घातला. प० पू० ताईंच्या चरणापर्यंत तो हार रुळत होता. मग प० पू० ताईंनी त्यांच्या गळ्यात कस्तुरी मोगऱ्याचा हार घातला. त्याचवेळी प० पू० बाबांनी एक केशरी वस्त्र घेतले आणि प० पू० ताईंना असे काही वस्त्र लपेटून घातले की बस्स! मग स्वतःच्या गळ्यातील हार काढला आणि प० पू० ताईंच्या जटेवर एक हात ठेवून एका हाताने हार प० पू० ताईंच्या मस्तकाभोवती गुंडाळायला सुरुवात केली. एक हार गुंडाळला तरी शिखा पूर्णपणे झाकली गेली नाही. म्हणून आणखी एक तसाच हार गुंडाळला आणि संपूर्ण शिखा झाकून टाकली. जणु फुलांचा मुकुटच चढविला. हे सारे करीत असताना सतत नॉन स्टॉप बोलत होते. ते म्हणाले, "खूप काम केलं, अजूनही खूप काम करायचं आहे." जणू काही एका पर्वाचा शेवट आणि दुसऱ्या पर्वाची नांदीच त्यांना सुचवायची होती. मग मी नमस्कार करायला गेले तेव्हा ते म्हणाले, "नीट सांभाळा हं आमच्या सदरला! आपली एखादी अगदी precious मौल्यवान गोष्ट दुसऱ्याच्या हाती सोपवताना आपल्याला जसे वाटते अगदी तस्सेच त्यावेळी प० पू० बाबांना वाटले असावे. तसेच त्यांनी प० पू० ताईंना 'सदर' असे संबोधून अनेक गोष्टी सूचित केल्या. एकतर जीवाशिवाचे ऐक्य झाल्यावर कुंडलिनी जेव्हा जगाएवढे बाळ प्रसवते तेव्हा शिव व कुंडलिनीचे पतीपत्नीचे नाते संपून तो आता तिच्याकडे मातृत्वाच्या दृष्टीने पाहतो. कुंडलिनी योगाचा हा टप्पा प. पू. ताईंनी ओलांडल्याचे त्यांनी सुचविले. शिवाय ह्या जगन्मातेला फॉरीनर्सनी कोणत्या नावाने संबोधावे हेही सुचविले. तो सोहळा इतका दिव्य अपूर्व होता की हजारोंच्या समुदायामध्ये गुरुशिष्याचा एकांत आणि त्या एकांतातील देहभानाचूनि आलिंगन पाहून आम्ही मनोमन धन्य झालो.

—माधुरी गोडसे



प. पू. स्वामी उमानंद



कशी पकडली !



गुरु परंपरा

'करिष्ये वचनं तव !'



भावकुसुमांजली : २६ फेब्रुवारी १९७४ : श्रीगुरुदेव विश्वयात्रेस निघण्यापूर्वी विमानतळावर, मुंबई

प० पू० श्री मुक्तानंद बाबा ३० मे १९७८ला श्री गुरुदेव ध्यानमंदिर सकाळ येथे प० पू० ताईंच्या निवासस्थानी आपल्या परिवारासह दोन दिवस रहाण्यास आले. त्यावेळी आम्हां अन्नपूर्णांच्या बायकांना कार्यक्रमास हजर रहाता येत नसे. मग प० पू० बाबाच आम्हांस दर्शन देण्यास किचनमध्ये येत. प० पू० ताईंचे एकंदर कार्य पाहून त्यांना फार आनंद झाला. आणि आम्हांला त्यांनी तो बोलून दाखविला. ते म्हणाले, अन्नपूर्णांना—

"तुमचे स्वामी महान आहेत. तुमचे स्वामी फार महान आहेत. फार महान आहेत तुमचे स्वामी. त्यांनी मोठं कार्य केलेले आहे. हा स्त्रियांचा मोठा ग्रूप तयार केला आहे त्यांनी. फार चांगले कार्य केले आहे.

—आजी गोळीवडेकर

प. पू. ताईंबरोबर सतत असणाऱ्या नव्या जुन्या साधकभगिनींनी दिलेल्या माहितीच्या आधारे

१९७३ च्या गुढी पाडव्याला प. पू. बाबा पार्ल्याला आले. खूप गर्दी झाली. समारंभ छान झाला. त्यावेळी प. पू. ताईंना म्हणाले,

"तुला त्रास झाला. पण मला तुझा पुरुषार्थ बघायचा होता." बाबांना पराक्रम फार आवडतो. आपल्या भाषणातही त्यांनी प. पू. ताईंचा खूप गौरव केला. खूप प्रशंसा केली.

प. पू. ताईंचा षष्ठ्यब्दपूर्ति समारंभ गणेशपुरीस मोठ्या थाटात साजरा केला प. पू. बाबांनी. या गुरूंचा भजनाचा कार्यक्रम चालू असता एक बड्या ऑफिसरची पत्नी भजन म्हणण्याच्या तयारीने अनाहूतपणे पुढे आली. प. पू. ताईंनी त्यांना नजरेच्या इशाऱ्यानेच परत पाठविले. शिस्तीत सर्व झाले पाहिजे हा तर ताईंचा कटाक्ष. प. पू. बाबांनी हे हेरले, ताईंच्या या कृतीचे मोठे कौतुक वाटले त्यांना. "ताईंनी बड्या ऑफिसरच्या बायकांनाही काय धाकात ठेवले आहे!" या शब्दात एका मिनिस्टरजवळ कौतुक व्यक्त केले.

प. पू. ताईंच्या या शिस्तप्रियतेचा नि त्यांच्या या शिस्तबद्धग्रूपचा सर्वत्र दबदबा आहे. सोलापूरला झालेल्या शिबिराच्यावेळी प्रतिष्ठित नागरिकांच्या ध्यानात विशेष राहिली ती हीच शिस्त! "श्री कुसुमेश्वरीबरोबर आलेले सर्व लोक त्यांच्या अगदी नजरेच्या धाकात वावरत होते. त्यांच्या डोळ्यांच्या इशाऱ्याकडे सर्वांचे लक्ष असे. आश्चर्य आहे. जबरदस्त सामर्थ्य आहे हेच खरं." असं बोलूनही दाखविले कित्येकांनी. नागपूर, नाशिक सर्वत्र तोच अनुभव. मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांनी तर स्पष्टच शब्दांत सांगितले, "आर. एस. एस. च्याही वर ताण करणारी आहे ही शिस्त!"

प. पू. ताईंचे साधुत्व तर सर्वमान्यच आहे. सोलापूरच्या लोकांनी तर त्यांचा संत कुसुमेश्वरी म्हणून गौरव केला. पण प्रत्यक्ष त्यांच्या गुरुदेवांनाही (प. पू. बाबांना) त्यांचे हे साधुत्व प्रगट, व्यक्त करावे लागले नागपूरकरांच्या खोडसाळपणामुळे!

नागपूर शिबिराचे यश प. पू. ताईंच्या काही हितशत्रूंना सहन झाले नाही. ताईंच्यावर केलेल्या खोट्या नाट्या आरोपांनी भरलेली आठ पत्रे त्यांनी गणेशपुरीला पाठविली. त्याचवेळी प. पू. ताई आपल्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे गणेशपुरीला गेल्या आपल्या गुरुदेवांच्या दर्शनाला. गुरुदेव गुरुचौकात बसले होते. आधी बरेच बोलून झाल्यावर "ती पत्रे दाखव हिला!" अम्मांना आज्ञा झाली. माननीय अम्मांनी पत्रे दिली. अम्मांना नागपूरशिबिराचे फोटो नी वृत्तांत, आलेली शिबिराचे गोडवे गाणारी पत्रे, सर्व साहित्य दिले. त्यांनी ते पाहून प. पू. बाबांना सादर केले. प. पू. बाबांनी योगीश्रेष्ठ जनार्दन स्वामींचा फोटो हातात घेतला. त्यांच्यासमोर फोटोत हात जोडून विनम्रभावाने आपल्या आसनावर बसलेली ताईंची मूर्ति पाहिली. मागे गुरु परंपरेचे फोटो नि पुढे गुरुचरण सर्व स्पष्ट होते. "मी यांना (जनार्दन स्वामींना) चांगले ओळखतो. असं म्हणून अम्मांच्यासमोर फोटो धरून जोरात ओरडले. "आता कोठे राहिली तुझ्या पत्रातील सत्यता?" प. पू. ताईंच्याकडे वळून मोठ्या ममतेने, हळुवारपणे म्हणाले, "पत्रातील सत्यता पटविण्यासाठी नाही मी तुला पत्रे दाखविली, तर आपल्या (पत्रे असत्य, बनावट असल्याचे सर्वज्ञ बाबांना का माहित नव्हते. पण सर्वच नाटक.) मागे काय चालते हे तुला कळावे. समोर 'उदो उदो!' गजर होतो. मागे काय होते तेही कळले पाहिजे. साधूला सर्व सहन करावे लागते. अंगावर विष्ठा फेकली तरीही सहन करावे." मोठ्याने बोलत होते. प. पू. ताईंचे साधुत्व तर सर्वांना जाहीर केलेच पण ताईंनाहि जाणीव करून दिली त्यांच्या ठिकाणी वसत असलेल्या साधुत्वाची. त्याचबरोबर "तुला याहीपेक्षा अधिक सहन करावे लागेल तुझे साधुत्व जसजसे प्रगट होईल तसे, तयारी ठेव." ही सावधानतेची सूचनाही दिली! "तू खूप खूप मोठी होणार आहेस." हा आशीर्वादच दिला या मिषाने. पुढे म्हणाले, "तुझे फार चांगले करून देणार आहे. अम्मा फार फार चांगले होणार आहे हिचे! फार चांगले, फार चांगले" असं म्हणत म्हणतच उठले नि 'फार चांगले होणार आहे. फार चांगले' असं म्हणत म्हणतच खोलीत शिरले.

माननीय अम्मा प. पू. ताईंना दारापर्यंत निरोप देण्यास आल्या. बोलता बोलता सहज म्हणाल्या, "सर्व साधुसंतांना असा त्रास सहन करावा लागतो. तेजोद्वेष आहे हा." परम पूज्य ताईंचे वाढते तेज माननीय अम्मांनाही अखेर मान्य करावे लागले.

असाच एक प्रसंग. परत येण्यास फार ऊन होते. शिवाय मंदिरात कार्यक्रम म्हणून परम पूज्य ताई गणेशपुरीस प्रसादास सहसा थांबत नसत. या माहेरवाशिणीने प्रसादाशिवाय परत जाणे परम पूज्य बाबांना अर्थातच पसंत नव्हते. त्या दिवशी 'प्रसाद घेऊन जाईन' असे ताईंनी स्वतःच सांगितले. परम पूज्य बाबा खूष. पण जेवण होईपर्यंत बरेच ऊन झाले. आपल्या ताईला आता उन्हातून जावे लागणार या विचाराने ते वत्सल हृदय व्याकूळ झाले नि मग घाई सुरू झाली. "जा, लवकर जा फार धूप आहे." एरव्ही 'थांब थांब', म्हणणारे बाबा आज 'लवकर जा म्हणत होते.' गुरुचे आचरण कळत नाही हेच खरं. किती जपतात बाबा ताईंना.

असाच एक दिवस परम पूज्य ताई गणेशपुरीस गेल्या नेहमीप्रमाणे. इन्टेन्सिव्ह चालू होते त्या दिवशी. दर्शनानंतर परम पूज्य बाबांच्या सांगण्यानुसार ताई तुर्यामंदिराकडे निघाल्या. गुरुचौकाच्या बागेकडे जाणाऱ्या गेटजवळ पोंचल्या असतील इतक्यात बाबा आपल्या आसनावरूनच मोठ्याने ओरडले हात उंचावून. "ताई तू जा, तुला कोणी अडवले तर मी येत आहे मागून" मागेही एकदा म्हणाले होते, "माझ्यासारखा पाठीराखा असतांना तुला काळजी करण्याचे कारण नाही." शिबिरे घे अशी आज्ञा केली तेव्हाही म्हणाले, "गुरुकृपा सर्व ठीक करेल." सोसायटी त्रास देत होती. तेव्हाही म्हणाले, "गुरु सर्व ठीक करेल." खरं आहे. परम पूज्य बाबांचे दोन कृपाबाहू (ताईंना चतुर्भुजा बनविणारे)

पाठीशी असताना काळजी कसली? कोण आवडणार ताईंना! परम पूज्य ताईंच्या कार्यांची घोडदौड चालू आहे. सर्वत्र यशश्री वरत आहे. नवनवी दालने नादाकान्त केली जात आहेत.

परम पूज्य ताईंचे आकर्षे हे चतुरस्त्र नि विविधप्रकारचे कार्य परम पूज्य बाबांच्या अंतर्चक्षूंने दशावर्षापूर्वीच हेरले असावे आणि म्हणूनच की काय ते आपल्या एका भक्ताबद्दल मोठ्या कौतुकाने म्हणाले, "काय काय करून दाखविणार आहे रे ती?" नि येथील सर्व अद्यावत वृत्त फोनवर ऐकून तितक्याच कौतुकाने म्हणाले आपल्या त्या भक्ताला "बघ, काय काय करून राहिली आहे ती!"

## जनमानसाचा कानोसा

परम पूज्य बाबांना परम पूज्य ताईंच्या लोकोत्तर अद्वितीयत्वाविषयी हा आदर, ही जाणीव, हे कौतुक तर इतर जाणकारांना काय वाटत असेल परम पूज्य ताईंच्याविषयी?

त्यांच्याच शब्दात सांगणे उचित—

माननीय अम्मा म्हणतात, "ताईंच्या रूपाने बाबांना सुवर्णपात्र मिळाले शक्ति ओतण्यास."

परम पूज्य ताईंचे सर्व ग्रंथ पाहून अमेरिकेहून लिहिलेल्या पत्रात म्हणतात, "आपके मुखसे सरस्वती निकल रही है।"

ऑफिस कामाबाबत अनुभवी सल्यासाठी काही कार्यकर्ते परम पूज्य ताईंचे ज्येष्ठ नि श्रेष्ठ गुरुबंधू जस्टिस वैद्य यांच्याकडे गेले असता बोलण्याच्या ओघात त्यांनी परम पूज्य ताईंच्याविषयी काढलेले गौरवोद्गार मोठे मननीय आणि लौकिक जगाला ताईंचा अलौकिक परिचय करून देणारे आहेत. त्यावेळी ते जवळ जवळ मृत्युशय्येवरच होते. त्यांची दृष्टीही दिव्यलोकांचा शोध घेणारी नि मोठी वेधक बनली होती. मृत्यूपूर्वी काही द्विव्यात्म्यांना अशी दिव्य दृष्टी येते म्हणतात. ते म्हणाले, "ताई अस्सल सोनं आहे. त्यांची भूमिका सर्वसामान्य वकीलांना कळणे कठीण! लौकिकार्थाने त्यांची केस मांडणे योग्य होणार नाही. त्यांचे सर्व कार्य दुःख निवारणार्थ। पादकणिका स्वीकारण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. त्यांनी आपणास मिळणारी पै नि पै दुसऱ्यासाठी खर्च केली आहे. हे सत्य आहे. सर्व कागदपत्र त्या इन्कमटॅक्स कमिशनरपुढे टाका. त्यांना ताईंचे सर्व ग्रंथ द्या आणि म्हणा, "हे ग्रंथ वाचा. हे स्पिरीटेड ग्रंथ लिहिणारी व्यक्ती मानवी आहे काय?" परम पूज्य ताईंच्या ज्ञानेश्वरीवरील प्रवचनांविषयी बोलताना ते म्हणाले, "ताई, म्हणजे ज्ञानेश्वरीमाऊलीच।"

परम पूज्य ताईंच्या ज्ञानेश्वरीवरील अधिकाराबद्दल समाधिस्थ आर्वीकर महाराज आपल्या एका भक्ताला म्हणतात की, "अधिकारी व्यक्तींकडूनच तुम्ही ज्ञानेश्वरी ऐकत आहात. ती सोज्वळ, सात्त्विकतेची मूर्ति आहे. तिला सोडू नका.

ठाण्याचे श्री० पटेकर व्यक्ती पाहतांच भविष्य जाणणारे, परम पूज्य ताईंना पाहतांच एकदम म्हणाले, "खूप मजा आहे बुवा तुमची."

भिलवडीचे एक सिद्धी-प्राप्त नेहमी आमच्याकडे येणाऱ्या आपल्या मावशीला सांगतात. "सोडू नको त्यांना. यांच्याकडून फार महान कार्य होणार आहे."

पोलीस अधिकाऱ्याला गुरुस्थानी असलेले एक गुजराथी महाराज म्हणतात, "ही तर साक्षात माऊली आहे. शंकराची यांच्यावर जन्मापासूनच कृपा आहे. यांची मागच्या जन्मीच संन्यास दीक्षा घेऊन झाली आहे."

सोलापूरचे रामकवी म्हणतात, "फारच निराळं आहे हे. मी इतक्या संतांच्या सहवासात आलो पण असे हे दैवी तेज येथेच पाहिले. अगदी आगळं नि वेगळं तेज आहे हे. काहीतरी निराळंच गफलतं आहे श्री. कुसुमेश्वरींना. कळत नाही!

चोपड्याचे "आजोबा" म्हणाले, "ताईंना प्रामाणिकपणाने नमस्कार करा. बोट धरून परमेश्वरापर्यंत नेण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे."

हैद्राबादचे श्री आगाशे—या मार्गातील एक जाणकार व्यक्ति पाहताच भूतभविष्य जाणण्याची सिद्धी मिळविलेले आणि अनेकांना गुरुस्थानी असलेले म्हणतात "साक्षात् परब्रह्म आहे हे। आचरण करू नका. परत परत नमस्कार करा. चरण धरा."

*

साध्यसाधन एक झालं की मार्गाची धाव व साध्याची हाव संपते.

*

कर्माचा कायदा कोणी टाळू शकत नाही. प्रारब्ध हे भोगावेच लागते पण गुरुचा आधार घेतला तर प्रारब्ध हलकं होते.

*

गुरुगृही विरक्त, वैराग्य – विवेकशील सदाचारी व सद्विचारी लोकांनाच राहणं जमेल.

*

Low diet आणि High Thinking हे ब्रीद असावे.

* *

# श्री उमानंद चरित्र बोधेश्वरी

अनवरत आनंदाची बरसात करणारे स्वामी उमानंद म्हणजे नियतीची योजनाबद्ध कलाकृती आहे की गुरुकृपेची देण आहे, का दोन्हींचा मिलाफ आहे कळे ना, पण ते एक जबरदस्त दैवीसामर्थ्याने, यौगिकबळाने आणि आत्मतेजाने नटलेले अलौकिक व्यक्तिमत्व आहे खरे। या दिव्य चरित्राचा नि चारित्र्याचा अभ्यास ही एक साधनाच आहे साधकाची.

कुसुम नव्हे, काही जन्मास आली तीच मुळी आनंदाची बरसात करीत. दोन मुलांवर झालेली ही सुलक्षणी, सुकुमार गौरवर्णी, लोभस, दिव्य कन्यका पाहून—बापूमाईंना—काशीच्या मातापित्यांना किती आनंद झाला असेल! नुसत्या आनंदसकल्लोळी बुडाले असेल ते ठोसर कुटुंब २१ डिसेंबर १९१६ च्या रम्य प्रभाती! तिच्या बाळलीलांनी त्यांना किती सुखावले असेल! आणि अशा या गुणी, लोभस बाळलीलांनी सुखावणाऱ्या, मनाला मोहविणाऱ्या लहानग्या काशीच्या रूपाने पूर्वजन्मीच्या अनंत पुण्याईचे फळ त्या बाळविचा मावशीच्या ओटीत विनासायास अकल्पित येऊन पडले तेव्हा ती भाग्यवान मावशी तर आनंदाने बेहोषच झाली असेल। दैवाने लाभलेले हे अनमोल रत्न मावशीने जपून बघ्यालि आपल्या घरी नेले. सर्व घर सुखाने उजळले, आनंदाने भरले. आईच्या उबदार सुखदायक मायेला दुरावलेली लहानगी काशी नव्हे आता मावशीची कुसुम मनात हिरमुसली, बावरली, तरीही मावशीच्या घरात आनंदाचा वर्षाव करीत राहिली.

पुढे विद्यार्थीदशेतही शाळेपासून कॉलेजपर्यंत कुसुम आपल्या बुद्धीतेजाने, विनम्रभावाने, परोपकारीवृत्तीने सर्वांनाच हवीहवीशी झाली. तिचा सहवास सर्वांनाच सुखावू लागला.

विवाहानंतर प्रो. शर्मांच्या या गृहदेवतेने सोन्याच्या पाऊलानेच गृहप्रवेश केला. गृहिणी, सचिव, सखी सर्व प्रकारच्या भूमिका मोठ्या चातुर्याने उत्तम वठवून आपल्याघराचे नंदनवन बनविले. तीन्ही मुलांना आदर्श शिक्षण देऊन या आनंदयोगिनीने त्यांना सुखी जीवनाची गुरुकिल्ली दिली. आज तिन्ही मुले आनंदात संसार करीत आहेत. मातेचा वसा पुढे चालवीत आहेत. श्रीकुसुमेश्वरी बनून त्यांनी भक्तांच्या कुसुमकोमल मनाच्या कळ्या फुलविल्या, विकसित केल्या. त्यांचे कष्टाचे, दुःखाचे संसार सुखी-आनंदी बनविण्याचे सामर्थ्य त्यांना दिले नि आता तर काय उमानंद 'आनंदे भरेन विश्वसारे' अशा जिद्दीने ब्रह्मज्ञानाचे अमृतकुंभ घेऊन पुढे सरसावल्या आहेत.

लोकांची जीवनें सुखी, आनंदी बनविण्यासाठी अंगी पाहिजे कर्तृत्व, दातृत्व, नेतृत्व, परोपकारी वृत्ती. हेही गुण बाळपणापासूनच ताईंची सोबत करीत आहेत. खेळण्यात कुसुम आघाडीवर, विद्यार्थीदशेत वर्गनेतृत्व कुसुमकडेच, कुसुमताई शर्मा आपल्या बरोबरीच्या लोकांना, भोवतालच्या साधकांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यास पुढे, ऑफिसरीण बनल्यावर सोशल लाइफ जगण्याचे शास्त्र नवख्या ऑफिसरणींना शिकविण्यास पुढे सरसावल्या त्या ताईच.

नेतृत्व उगाच मिळत नाही. मार्गदर्शकाच्या, नेत्याच्या अंगी अपार सहनशीलता, क्षमाशीलता असावी लागते. ज्याचे दोष दाखवावयाचे त्याचे दोष सुधारण्याचे सामर्थ्य, चतुर शहाणपणही पाहिजे. क्षमा करण्यास मनाची विशालता नि अंतःकरणाची उदारताही पाहिजे. गुरूच्या भूमिकेतून ताई परखडपणे दोष दाखवितात, शास्त्याच्या भूमिकेतून कडक शासनही करतात पण चुकल्या माकल्या भक्ताला आईच्या मायेने पोटाशीही घेतात. सर्वांगांनी, सर्वकलांनी परिपूर्ण आहेत ताई! ताईंची पूर्णतेकडील वाटचाल एकदा सुरू झाली ती झालीच. ताईंची झेप विलक्षण, वेग असीम, हाती घेतले ते तडीस नेण्याची नव्हे तर कळसास नेण्याची जिद्दही तशीच. प. पू. बाबा भेटल्यापासून अवघ्या ११ वर्षात ताई सामान्य गृहिणीच्या स्वामी उमानंद बनल्या। त्यांचे एक ज्येष्ठ नि श्रेष्ठ गुरुबंधू श्री भाऊ यंदे आपल्या लेखात म्हणतात. "अनेक अडचणी आल्या. कोणत्याही अडचणींना ताई अडखळल्या नाहीत, थांबल्या नाहीत. गुरुकृपेवर चालणारे त्यांचे "स्पेशल बोईंग कधी not going म्हणालेच नाही." नि अगदी खरं आहे ते. गुरु करणं म्हणजे गुरु सांगेल ते करणं. हे नित्यानंदबाबांनी मुक्तानंदबाबांना सांगितलेले गुरुभक्तियोगाचे गुह्य मुक्तानंदबाबांनी उमानंदापर्यंत पोचविले. 'बाबा वाक्यं प्रमाणम्' म्हणून ताईंनी म्हणजेच उमानंदानी ते कर्णसंपुटात साठविले, अंतःकरणात कोरले नि आचरणात आणले. बाबा म्हणाले, 'आश्रमात राहून तीन दिवस पाण्याचा थेंबही न घेता उपास कर." उपास केले. सूचना आली 'ध्यानक्रम सुरू कर.' ध्यानक्रम सुरु केली. "शिबिरे घे" शिबिरे घेतली. 'चितशक्तिविलासाचा मराठी अनुवाद कर. मुक्तेश्वरीचे काव्यमय भाषांतर कर.' आज्ञा झाली. आज्ञा कृतीत उतरली. 'गणेशपुरीला भंडारा दे' सांगताच प. पू. बाबा गणेशपुरीला असोत, नसोत वर्षातून दोन भंडारे देण्याची प्रथा सुरू केली नि आपल्या मुलांनाही बजावले, "मी कोठेहि असले तरी हे दोन भंडारे गणेशपुरीला पोचलेच पाहिजेत. त्यातच तुमची बरकत आहे." स्वतःच्या हक्काचे स्थान झाले पण सोसायटीच्या विरोधामुळे येथे कार्यक्रम घेणे अशक्य झाले. वाढत्या भक्तसंख्येमुळे सध्याची जागाही अपुरी! म्हणून सर्वानुमते (विशेषतः भक्तगणांच्या आग्रहास्तव) स्वतंत्र, प्रशस्त जागा घेण्याचे निश्चित झाले. भराभर इमारतनिधी गोळा होऊ लागला. 'उद्या आता कागदोपत्री करार होणार' नि आदल्या दिवशी निरोप आला. 'व्यवहार थांबव. कायद्याच्या कचाट्यात सापडशील.' झाले. दुसरे दिवशी प. पू. ताई समक्ष दर्शनास गेल्या गणेशपुरीस, प. पू. बाबांनी त्यांना बरंच सुनावलं, नि बजावलं कोठे जातेस! आहे तिथेच रहा." गुरुपदी पोचलेल्या ताईंनी आज्ञाधारक शिष्याच्या भूमिकेतून

सर्व शांतपणे ऐकून घेतले. आणि नम्रपणे सांगितले "बाबा, कोठे जाणार नाही इथेच राहीन." मोठा बाका प्रसंग होता तो! नवीन मोठं स्थान मिळणार म्हणून साधकात उत्साह संचारला होता. अनेक लोकांचे हितसंबंध गुंतले होते. अशा वेळी हा निर्णय जाहीर केला तर होणाऱ्या परिणामाची ताईंना का कल्पना नव्हती? अनेक लोक दुरावतील, गैर-समज करतील, पण गुरुआज्ञेपुढे ताईंना लोकेषणेची तमा नव्हती. प. पू. बाबांच्या आज्ञेनुसार त्यांनी या योजनेवर पाणी सोडले. मोठ्या आज्ञाच त्यांनी पाळल्या असं नाही तर बारीकसारीक आज्ञांचेही चुकून उल्लंघन केले नाही. 'अळणी' जेवणास सुरुवात केली. 'कारलं असू दे रोज भोजनात' सांगताच दररोज कडू कारल्यांचा खुराक सुरू झाला. 'गच्चीवर फीर रोज एक तास' सूचना मिळताच भल्या पहाटे केव्हा उठणे घेऊनही गच्चीवर फिरणं सुरू झालं. थोडक्यात गुरु सांगेल ते करणे हा ताईंचा धर्मच झाला. वेदिकमच्या अभ्यास, सिद्धयोग ट्रेनिंग क्लासेस आणि चालू असलेला ज्ञानेश्वरीचा इंग्रजी अनुवाद. ह्या सर्व व्यापाचे मूळ गुरुआज्ञेतच. आज सिद्धगुरुपदावर आरूढ झालेल्या ताई सांगतात की, आमचे आध्यात्मिक यश मिळविण्यास मी काय केले? तर निव्वळ गुरुआज्ञा पाळून. गुरु आज्ञा करतो तेव्हा त्यात आपले सामर्थ्य आणि कृपा पण ओततो. आपण काहीच करायचे नाही, फक्त समर्पण, गुरुशरणागती. देहमनबुद्धी एकाच दिशेने कार्यान्वित झाले तरच आज्ञा पाळण्यात उत्तम यश मिळते; सुखही लाभते. सिद्धयोग म्हणजे गुरुशिष्य सामरस्य योग आहे हा.

प. पू. ताईंचा शिस्तीवर कटाक्ष फार! त्या म्हणतात निसर्गात सर्वत्र शिस्त आहे; नियमबद्धता आहे. चंद्रसूर्य वेळेवर उगवतात, मावळतात. ऋतुचक्र, कालचक्र ठरल्यावेळीच नियमाप्रमाणे फिरणार, पक्षी आकाशात उडताना विशेष शिस्तीतच उडतात. निसर्गात प्रत्येक गोष्ट ठरल्यावेळी, ठरल्याप्रमाणे घडते तर बुद्धिमान अशा, मानवाच्या जीवनात शिस्त व नियमबद्धता कां असू नये? त्यांच्या प्रत्येक कृतीला विशिष्ट शिस्त आहे, बोलण्यात, वागण्यात, लिहिण्या-वाचण्यातच नव्हे तर जेवणातही शिस्तच! पदार्थांचे प्रमाण ठरलेले, खाण्याचा क्रमही ठरलेला! २४ तासांचे वेळा-पत्रक मिनिट टु मिनिट ठरलेले! पहाटे तीन वाजता उठणे चुकलं नाही कधी की ३॥ ची आंघोळ टळली नाही. आज कित्येक वर्षे हा नित्यनेम चालू आहे. प्रवचन कितीही ओघात असले तरी सायंकाळी चारला सुरू झालेले प्रवचन ५॥ ला संपलेच पाहिजे. १॥ तासाची मात्रा! प्रत्येक गोष्ट, कृती मात्राबद्ध. नित्य नेमाने सातत्याने केलेल्या कृतीला सिद्धी प्राप्त होते. एकप्रकारचे सामर्थ्य मिळते. गुरुभक्तिगंगेचे शिस्त व संयम हे दोन किनारे. गुरुकृपासागराला मिळायचे असेल, साधनेत वेग घ्यायचा असेल तर या दोन किनाऱ्यांतूनच वाहणे आवश्यक तिला, हा त्यांचा सिद्धांत. संयमाला तर विशिष्ट स्थान आहे त्यांच्या जीवनामध्ये. जिभेवर संयम, झोपेवर संयम म्हणूनच क्षणाक्षणाने नि कणाकणाने जीवन जगल्या त्या. "प्रत्येक क्षणाचा हिशेब आहे माझ्याजवळ. एकहि क्षण निष्क्रियतेत घालविला नाही मी!" अभिमानाने सांगतात त्या कधी कधी. या गुणांच्या बळावरच साधनासोपान भराभर चढून इतक्या अल्पकाळात अध्यात्मशिखर गाठले त्यांनी!

आपल्याजवळ असलेल्या निसर्गदत्त देणग्या लोकांसाठी वापरायच्या, कोणत्याही क्षेत्रात प्रयत्नांची पराकाष्ठा करायची ही प. पू. ताईंची विचा-रांची बैठक, तीच पराकाष्ठा त्यांनी या आध्यात्मिक क्षेत्रातही केली. नि 'देही ब्रह्ममय बनला.

प. पू. ताईंच्या जीवनाचा, चारित्र्याचा पैलू नि पैलू तेजस्वी आहे. प्रकाशित आहे. प्रत्येक पैलूत सामान्य जीवन प्रकाशित करण्याचे सामर्थ्य आहे. त्यांचे बालवत् शुद्ध, पवित्र, निर्मळ अंतःकरण नि नियत, संयत नि ऋषितुल्य जीवन बघून प्रत्यक्ष बाबाहि प्रभावित झाले. प. पू. ताईंच्या वैराग्याला तर तोड नाही. शुद्धाचेच वैराग्य ते! नुसते वैराग्य नाही तर वैराग्य महापावक आहे तो कलियुगाची सावळवली गुम्फ! संसारकर्दमात लोळत पडलेल्या, अज्ञानी जडलेल्या जिवाचा उद्धार करणारी व्यक्ती तितकीच प्रभावी नि सामर्थ्यशाली पाहिजे. गुरुत्व, पातिव्रत्य आणि मातृत्व प्रत्येकही अत्यंत पॉवरफुल, सामर्थ्यशाली! प. पू. ताईंच्या ठायी तर ही तिन्ही तत्त्वे एकत्र आली आहेत मग किती अफाट नि अपार सामर्थ्य एकवटले असेल ताईंच्या ठिकाणी!? आताच ऑगस्ट महिन्याची आश्रमपत्रिका हाती आली त्यांतील 'अवतारोंका युग' हा लेख वाचला नि काय आश्चर्य! कोड्याचे उत्तर सापडले. त्यात केलेले तिसऱ्या प्रकारच्या महापुरुषाचे वर्णन म्हणजे प. पू. स्वामी उमानंदांच्या महान-तेच्या अपार दैवी सामर्थ्याच्या कोड्याची उकलच होय.

प. पू. बाबा म्हणतात.

"तिसऱ्या प्रकारचे महापुरुष असे असतात की जे युगप्रवर्तनाच्या काळात अवतरतात. ते युगधर्म बदलून मानवांना सुलभ—सोप्या उपायांनी परमात्मपद प्राप्त करून देण्यास येतात. ते परमेश्वराच्या निर्मळ, सहज, सरळ नि स्वाभाविक नियमांचा अवलंब करून जीवांचा सहज उद्धार करतात, मुक्ति देतात. बद्ध जीवांना संसारपाशातून मुक्त करतात. ते स्वतः परिपूर्ण असतात. एखाद्या संप्रदायाचे कार्य, प्रसार करण्यासाठी त्यांचा अवतार नसतो. त्यांची व्याप्ती विशिष्ट सांप्रदायिक क्षेत्रापुरती मर्यादित नसते तर सर्वव्यापी असतात ते. त्यांचे जीवन सर्वजनहिताय, सर्वजनसुखाय असते. यांच्या कोणत्याही कार्यात कधीही कोणताही मोठा अडथळा येत नाही. लहान-सहान लौकिक विघ्ने अडचणीही त्यांच्या मार्गात टिकू शकत नाहीत."

प. पू. ताईंचे एकंदर जीवन-चारित्र्याचा अभ्यास केला तर हे सर्व प. पू. ताईंनाच उद्देशून लिहिले आहे प. पू. बाबांनी असे वाटू लागते. दुसऱ्या परदेशगमनेहून परत आल्यावर प. पू. बाबांनी ताईंना समक्ष पाहिल्यावर जे उद्गार काढले ते मोठे सूचक आहेत. "मला वाटले नव्हते मला कोणी अशी व्यक्ती मुंबईत मिळेल." याचाच अर्थ सर्वज्ञ बाबांनी ताईंना प्रथम भेटीतच ओळखले असावे. अवतार झाला आहे फक्त प्रगट करायचा हे त्यांनी जाणले नि कार्याला लागले. ताईंचे कार्य हे 'बहुजनहिताय, सर्वजनसुखाय' असल्याचे त्यांनी प. पू. ताईंच्या ग्रंथांना दिलेल्या आशिर्वादात सुचविलेच आहे. प. पू. बाबांनी परदेशा-हून परत आल्यावर ताईंना पाहून काढलेले उद्गार ['गुरुदेव मुक्तानंद म्हणे' पहा.—शंकरच आहे. महादेवासारखी दिसते.] त्यांच्या शिरेची बांधलेली पूजा, इतर काही भक्तांजवळ "तुमचे स्वामी फार महान आहेत. फार महान आहेत." असा ताईंच्या महानतेबद्दल केलेला उच्चार हे सर्व काय सुचविते? प. पू. ताई या 'महान' आहेत. महापुरुषाचा अवतार आहे हेच ना?

याच आश्रमपत्रिकेत प. पू. बाबा पुढे लिहितात. "हा महापुरुष मोठा मतवाला मस्त असतो. सदैव मस्तीत असतो. आत्मरंगी रंगलेला असतो. त्याच्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष संपर्कात आलेल्या व्यक्तीही विशेष मस्तीचाच अनुभव घेतात." हाच अनुभव प. पू. ताईंच्या बाबतीत

येतो सर्वांना. एकदा येथे आलेला येथेच राहतो. चिकटतोच. आज येथे येणाऱ्या ताईंच्या सर्व भक्त–साधका गेल्या दहा बारा वर्षे घरातील सर्व विरोध सहन करूनही येथे तग आहेत. चिकटल्या त्या चिकटल्याच. ताई आत्मरंगी रंगलेल्या तर सर्व ताईरंगी रंगलेल्या, असे जबरदस्त आकर्षण आहे स्वामींचे.

महापुरुषाला महापुरुषच ओळखणार आणि म्हणूनच बाबा फार मानतात ताईंना. ते एकेदिवशी म्हणाले देखील "ताई, तुमच्या सारखीचा पाठिंबा आहे म्हणून मला कसली काळजी वाटत नाही."

आणि ताईंचे ते हास्य—महापुरुषाचेच हास्य ते! तितकेच आकर्षक नि प्रभावी! वेड लावते जीवाला. श्रीकृष्णाच्या हास्याने सर्व गोकुळाला नाही का वेड लावले! शुद्ध-पवित्र, निर्मळ अंतःकरणाचे प्रतिबिंब असणाऱ्या या हास्यात विलक्षण आकर्षण शक्ती आहे; दुसऱ्याचे अश्रु पुसण्याचे अपार सामर्थ्य आहे. येथे येणारे मराठी अभाषिक लोक तर या हास्यानेच येथे खिळले आहेत. त्यांना ताईंची बोलभाषा समजत नाही. पण अंतःकरण उलगडविणारी ही हास्याची भाषा समजते. एक दाक्षिणात्य साधक म्हणतात, "गुरुचे हास्य माझ्याशी आतून बोलते. गुरुचे सांगणे मला समजते." "उत्तम ध्यान लागले आहे या साधकाला. आंगोपांगांनी ताईंचे जीवन असे बहरले आहे. संपन्न झाले आहे. खऱ्या अर्थाने परिपूर्ण आहे. या परिपूर्ण जीवनाच्या अभ्यास करून पूर्णतेकडील वाटचाल चालू ठेवणे हीच आपली साधना. पूर्णाचे ध्यान करता करता अपूर्णही एक दिवस पूर्ण होऊन जाईल.

**सद्‌गुरुनाथ महाराज की जय**

*

वर देणं व शासन करणं हे दोन्ही अधिकार गुरुला असतात.

*

संतांची क्षमा ही अत्यंत सामर्थ्यशाली असते. दया, क्षमा, शांती यांच्या सान्निध्यात शत्रूही मित्र होतात.

*

ज्ञेयापर्यंत पोचेपर्यंतच ज्ञान विज्ञान, ज्ञेय गवसलं की ज्ञानविज्ञान नाहीसे होतात.

*

सही दिली नाही की सहीसलामत सुटाल.

*

श्रद्धेचे पूर्णत्व परमेश्वराचे प्रगटण. श्रद्धा ते प्रेमभाव हा श्रद्धानदीचा प्रवास.

*

श्रद्धा हे असत्यपणाचे कुंपण.

*

मरण देहाचे नव्हे, देह तर काय विनाशीच! तो नाश पावणारच! मरण हे अहंकाराचे, मी देह या भावनेचे. देह हे वाहन आहे. देहभावना नाहीशी झाली की मग कितीही जन्म घ्या. जन्ममृत्यूचे सुखदुःख नाहीच मग!

*

लोकांचा त्रास कसा होणार? गुरुचे कार्यच आहे ते. रंजल्या गांजलेल्यांना पोटाशी धरणे, अभय देणे यासाठीच गुरुचा संचार असतो.

(स्वामी उमानंद)

*

॥ ॐ श्री गुरुदेव ॥

# प्रसिद्धी झाली अपरंपारु

प. पू. स्वामींच्या महान कार्याचे प्रतीक 'श्रीगुरुदेव ध्यान मंदिर' आज अंधेरीला मोठ्या डौलात उभे आहे. आत्मसाक्षात्कार हे ज्यांच्या जीवनाचे ध्येय आहे त्यांचे तर हे विसाव्याचे स्थान आहे, योगविद्यापीठ आहे, शक्तिकेंद्र आहे. पण त्याची सुरवात कितीतरी वर्षे अगोदर झाली होती. प. पू. बाबांनी प. पू. ताईंना स्वतःच्या घरी 'श्री गुरुदेव ध्यान मंदिर' स्थापन करण्यास सांगितले व त्याच्या उद्घाटनाला ते स्वतः आले. 'समसमा संयोग' झाल्यामुळे त्या ध्यानमंदिराचे कार्य दिवसेंदिवस वाढते वाढते होऊ लागले. अशा चढत्या वाढत्या उत्साहात हा हा म्हणता दुसरा वार्षिकोत्सव आला देखील! त्या निमित्त प. पू. बाबा गणेशपुरीहून मुद्दामहून पार्ल्याला आले होते. त्याप्रसंगी प. पू. बाबांनी प. पू. ताईंबद्दल कोणते गौरवोद्गार काढले, ध्यानाविषयी कशी उद्बोधक माहिती सांगितली, एकूण समारंभ कसा थाटात व भक्तिभावाने संपन्न झाला याचा 'आश्रम पत्रिकेत' फार चांगला वृत्तांत आला होता. आश्रम पत्रिका लिहिते.

"श्रीगुरुदेव ध्यान मंदिरका द्वितीय वार्षिकोत्सव"

पिछले वर्ष गुडी पाडवा के दिन श्रीगुरुदेवके करकमलोंद्वारा सौ. कुसुमताई शर्मा के यहाँ बम्बई मे 'श्री गुरुदेव ध्यान मंदिर' का उद्घाटन हुआ था। सौ. ताई के नेतृत्व मे यह ध्यानकेंद्र अच्छी प्रगती कर रहा है। अनेक भक्तजन ध्यान एवं संकीर्तन द्वारा श्रीगुरुदेव की शक्ती का अनुभव कर दिव्य आनंद प्राप्त कर रहे हैं। इस वर्ष अप्रैल ४ गुडी पाडवा के दिन इस केंद्र का दूसरा वार्षिकोत्सव मनाया गया। इस उपलक्ष्य मे केंद्र के 'ज्ञानेश्वर सत्संग मंडल' की ओर से विलेपार्ले मे श्रीगुरुदेव का भव्य स्वागत किया गया।

सप्ताह पूर्व से ही तैयारी आरम्भ हो गयी। सभी लोग अपने भावों और शक्ति के अनुरूप काम मे जुट गये। एक विशाल मंडप बना। पुष्प, तोरण और झण्डियों से उसे सजाया गया। बहनों ने शास्त्रीय पद्धती से सुगंधित पुष्पों से श्रीगुरुदेव का आसन सजाया। उनकी भीनी भीनी महक सबको मोहित कर रही थी। मुख्य द्वार की शोभा अनूठी थी।

दोपहरके ठीक ४ बजे 'सद्गुरुनाथ महाराज की जय' की उद्घोषणा के बीच श्रीगुरुदेव का आगमन हुआ। यह घोष वायुमण्डल में गूँजित हो उठा। प्रवेशद्वार पर बहनों ने श्रीगुरुदेव की आरती उतारी। भक्तों के भीड मे से चलकर श्रीगुरुदेव अपने आसन पर विराजित हुए। भीड इतनी अधिक थी कि सर्वत्र सिर ही सिर दिखायी दे रहे थे। बाल, वृद्ध, युवक युवतियाँ सभी श्रीगुरुदेव के दर्शन हेतु आगे बढने चले जा रहे थे। प्रत्येक भक्त फल, पुष्प, तुलसी लिये उनको प्रणाम करता और श्रीगुरुदेव की एक मुस्कराहट से अपने को धन्य समझता। दूसरी ओर प्रवेशद्वार पर पटाखे, फुलझडियाँ छोडी जा रही थीं।

श्रीगुरुदेव पुष्पों का मुकुट पहिने हुए सब का मन मोहित कर रहे थे। एक ओर छोटी बालाएँ 'श्रीगुरुपादुकापंचक' एवं श्रीगुरुगीता के श्लोक गा रही थीं। कुछ बहिनों ने अपनी सुरीली आवाज में भजन-कीर्तन गाये। दूसरी ओर श्रीगुरुदेव के दर्शन के लिये कतार-निरंतर चली जा रही थी। दो घण्टे हो चुके, भक्तों की कतारों का अंत होने नही दीखता था। अतः अपने अपने स्थानों में ही बैठकर भक्तगण श्रीगुरुदेव का दर्शन करते हुए अपने को कृतार्थ समझने लगे।

सौ. कुसुमताई ने काव्यमय ओवी छंदोंमें अपने भावपूर्ण शब्दों में श्रीगुरुदेव का स्वागत करते हुए भावकुसुमांजली' का प्रथम अंक उन्हें भेंट किया।

तदनन्तर सब का स्वागत करते हुए श्रीगुरुदेव ने "ध्यान का महत्त्व" इस विषयपर अपनी ओजस्वी वाणी में प्रवचन दिया। आप ने कहा—

"ध्यान सब मानव के लिए है। वह न किसी जाती, पंथ या देश का है। ध्यान सार्वभौम साधन है। ध्यान अपने में ही देव को बताता है। संसार में विचरते हुए भी हम ध्यान कर सकते हैं। किन्तु यह ध्यान बहुत सन्मानसे तथा मर्यादा से करना होगा। उसमे पवित्रता होनी चाहिये; शान्त बैठकर अन्दर में लक्ष्य लगाना चाहिये। परमात्मा का ध्यान नंगा नाच नहीं है। परमात्मा क्या नंगा है? भगवान को क्या नंगा भक्त पसन्द है? मानव शरीर बहुत महत्त्व का है। वह परमात्मा की उत्तम देन है, वह पापाचार करने के लिये नहीं है। पवित्र और स्वच्छ देह-मन से ध्यान करो। इसके लिये कुछ त्यागने की जरूरत नहीं है। संसारमे रहकर ध्यान करो। अर्थहीन त्याग का कोई प्रयोजन नहीं है। इसलिये कष्ट करो, कमाओ और दूसरे को दो। त्यागना हो तो अभिमान त्यागो और व्यक्तित्व त्यागो।

"मनुष्य की परिस्थिती ऐसी है कि वह संसार को नही भोगता है किन्तु संसार उसको भोगता है। मुझे एक कहानी याद आती है। एक आदमी पानी में तैर रहा था कि इतने में उसने पानी में एक कम्बल जैसा कुछ देखा और उसे पकड़ा। किनारे के लोग जोर से चिल्लाने लगे कि वह भालू है तुम उसे छोड दो। किन्तु उसने कहा कि भालू ने मुझे जोर से पकड रखा है फिर मैं कैसे छोडू। यही स्थिती मनुष्य की संसार मे है। वह संसार को पकड रखता है और कहता है कि संसार ने मुझे पकड़ा है। अतः आत्मनिष्ठा से ध्यान करो। सहज में संसार से तर जाओगे।

"गुरुजनों के साथ ध्यान करो। गुरुजन की शरण लो। उनका अनुग्रह प्राप्त करो। किन्तु मूर्ख गुरुओं से बचना। विवेकबुद्धी से गुरु करना। गुरु करने में जल्दी नहीं करना। अन्तर समझ से गुरु करना। कुछ गुरुजन

ऐसे होते हैं जो कृष्णगीता छोड़कर अपनी गीता कहने लगते है। इसलिये पानी पीना छान के, गुरु करना पहचान के।”

सौ. कुसुमताई ‘श्रीगुरुदेव ध्यान मंदिर’ को भली प्रकार चला रही है। छोटे बड़े, बालक-वृद्ध, सबको ध्यानमार्ग में लगा रही हैं। आप में उत्तम शिष्यत्व है। यह ध्यानकेंद्र आपोआप आगे बढ़ता रहा है और आगे भी बढ़ता रहेगा। उसे आशीर्वाद देना एक शिष्टाचार मात्र है। श्रीगुरुदेव की कृपा से वह स्वयं चल रहा है।”

श्रीगुरुदेव के प्रवचन के पश्चात् फिरसे भक्तजनों की कतारें बन गयी। असंख्य भक्तजनों ने इस उत्सव में हर्षोल्हास सहित भाग लिया। काफी देर हो रही थी। अतः भक्तजनों के अपार समूह के बीचमें से ही श्रीगुरुदेवने गणेशपुरी के लिये प्रस्थान किया।

संगीत की लय पूर्ववत् गूँज रही थी। मंगल गान गाये जा रहे थे। उन संगीत की लहरों के बीच में से ही श्रीगुरुदेव गुजर रहे थे। बिदाई बेला में भक्तजनों ने उनके मार्गपर भावपूर्ण पंखुड़ियाँ बिछा दीं।

**आश्रमपत्रिका**

एकदा गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने श्री. प्राणजीवन ठक्कर यांच्याकडे नामसंकीर्तन सप्ताह होता. त्याचे उद्घाटन करताना प. पू. ताईंनी आपल्या भाषणात प्रगट केलेले मौलिक विचार त्यांची अव्यभिचारी गुरुभक्ती, आपल्या गुरुंची महानता, गुरुकार्याची तळमळ, या महान कार्यासाठी नेमके काय करायला पाहिजे याबद्दलच्या बहुमोल सूचना इत्यादी स्पष्टपणे प्रगट करतात. स्वतःच्या महान गुरुकार्यासाठी त्यांनी या सूचनांचा अचूक उपयोग करून घेतला हे सारे पहिले म्हणजे प. पू. ताईंच्या तेजस्वी द्रष्टेपणाने मन स्तिमित होते!

आश्रम पत्रिकेत म्हटले होते “गुरुपूर्णिमा के उपलक्ष्य में सांताक्रुझ, बम्बई में श्री. प्राणजीवन ठक्कर के निवास स्थान पर दि. ३० जून १९७२ के दिन नामसंकीर्तन सप्ताह का उद्घाटन करते हुए परम गुरुभक्त सौ. कुसुमताई शर्मा ने कुछ मननीय विचार प्रकट किये। आपने कहा :

“बम्बई ऐसी भूमी है जिसमें भिन्न भाषाभिमानी, भिन्नजाति प्रेमी हैं। यह संगम है। जहाँ अनेक बातों का संगम होता है वहां एक नयी शक्ति, नया उत्साह, नयी उम्मीद, नया सामर्थ्य पैदा होता है। बम्बई में गुरुभक्तों की संख्या कम नहीं। निष्ठावंत भक्त भिन्न भिन्न स्थानों में सत्संग कर रहें हैं। गुरुभक्ती का प्रचार काफी हो रहा है। गुरुभक्त सूर्यकिरण जैसा है। अपने गुरु का शक्तिप्रसाद वह घर घर ले जाता है।

हम सब बम्बईवाले गुरुभक्त यदि ऐसे सामुदायिक सांघिक रूप से एकत्र होकर कार्यक्रम रखें, सामुदायिक साधना करें, तो गुरुभक्तियोग कितना प्रभावित होगा! गुरुभक्त की जाती...भक्ति, धर्म—गुरुभक्ती कार्य —गुरुकार्य, प्रेम—गुरुप्रेम, भाषा—मौन और बोल—जयगुरुदेव। गुरुभक्ती में किसी व्यक्ती को व्यक्तिगत महत्त्व नहीं; दर्जा, जाति, धर्म कर्तृत्वाभिमान, नर-नारी, नामरूप कुछ नहीं। सब गुरुदेव के पुजारी हैं। यथाशक्ति कार्यकुसुमोंसे पूजा करनेवाले हैं। सभी भक्तजन गुरुदेव का ही मंडल, कुटुम्ब, परिवार है। गुरुभक्त को स्वतंत्र अस्तित्व नहीं, महत्त्व बिलकुल नहीं। गुरुदेव का आदेश, आज्ञापालन करना इतना ही गुरुभक्त का जीवन होता है।

“मेरे ख्याल से आज हमें यह संदेश मिलता है। गुरुभक्तिसागर में गुरुकार्यरूप सभी वैयक्तिक नदियाँ विलीन करने हम इकट्ठे हो रहे हैं। वृक्ष की अनेक छोटी-बड़ी शाखाएँ होती हैं। लेकिन वृक्ष के मूल की— जड़ की तरफ से ही सब को जलरस प्राप्त होता है। वैसे ही श्रीगुरुदेव आश्रम के सत्संग केंद्रों के रूप में दुनियाभर शाखाएँ फैल रही हैं। एक गणेशपुरी से ही सबको गुरुकृपा का लाभ हो रहा है। यह सत्य स्मरण रखकर हमसब गुरुकार्य करेंगे तब वह सच्ची गुरुभक्ती होगी और हम अपने कर्तव्य से च्युत नहीं होंगे।

“जो नये हैं, कभी गणेशपुरी नहीं गये, गुरु के बारेमे अनभिज्ञ हैं उनके लिये मैं इतना बताना ही चाहती हूँ कि यह अनुभव लेने की बात है। अवर्णनीय होने के कारण शब्दों में कही नहीं जा सकती। एक बार आप गणेशपुरी जायेंगे तो बार बार जाकर आप आश्रम के स्थायी सदस्य बन जायेंगे इतना वहाँ का प्रभाव है।

“गणेशपुरी का श्रीगुरुदेव आश्रम अखिल जगत का सिद्धयोग विद्यापीठ हुआ है। भविष्य में एक ही गुरु, एक ही सिद्धयोग, एक ही श्रीगुरुदेव आश्रम रहेगा। श्री गुरुगीता की भविष्यवाणी है—सब पंथ, सब धर्म, सब योग, सब आचार्य, सब मार्गदर्शक, सब संप्रदाय, एक गुरुभक्तियोग में विसर्जित होनेवाले हैं। इसमे कोई सन्देह नहीं।

“हम सब गुरुभक्त कितने भाग्यवान हैं। हमें गुरुसेवाकार्य करने का मौका मिला है। इस सुवर्ण—योग का लाभ हमें लेना चाहिये। ‘छोटे मुँह बड़ी बात’ ऐसी अवस्था न हो तो मैं इस मंगल अवसर पर एक सूचना करना चाहती हूँ कि बम्बई में श्रीगुरुदेव मुक्तानंद के जितने भक्तगण हैं उनका कोई अधिकृत संघटन होना चाहिये; मेंबरशिप होनी चाहिये; गुरुस्नेह संमेलन महिने में एक बार होने से लोगों को सम्मीलित होने का अवसर प्राप्त होगा। जो जेष्ठ श्रेष्ठ अनुभवी गुरुभक्त कार्यकर्ता हैं वे इसका ज़रूर विचार करें ऐसी नम्र बिनंती करके मैं आपको धन्यवाद देती हूँ।”

प. पू. स्वामी उमानंद फारच भाग्यवान आहेत यात मुळीच शंका नाही. स्वतःची षष्ठ्यब्दीपूर्ती, गणेशपुरीला, आपल्या गुरुंच्या सान्निध्यात, गुरुदेवांच्या मंगल आशीर्वादाने साजरी व्हावी ही केवढी भाग्याची गोष्ट आहे! अंधेरीच्या श्रीगुरुदेवध्यान मंदिरातून आपल्या शेकडो भक्तांसह प. पू. स्वामी आपल्या गुरुदेवांचे आशीर्वाद घेण्यासाठी त्यावेळी गणेश-पुरीला गेले होते. त्याचे वर्णन आश्रमपत्रिकेत आले होते :—

“दिनांक २१ दिसंबर १९७३ को आश्रम में श्रीमती कुसुमताई शर्मा तथा कुसुमेश्वरी की साठवीं वर्षगाँठ बड़ी धूमधाम से मनायी गयी। कारों और बसों में आये हुए अपने शिष्य-शिष्याओं के साथ षष्ठिपूर्ती के दिन पूज्य गुरुदेव का आशीर्वाद पाकर वह कृतार्थ हुईं। आरम्भ में बहुत ही मधुर स्वरों में भक्तिगीतों का कार्यक्रम हुआ। तदुपरांत पूज्य गुरुदेवने आशीर्वादपर प्रवचन करते हुए श्री कुसुम- ताई के कार्य की भूरि भूरि प्रशंसा की।

**आश्रमपत्रिका**

१९७४ मध्ये प. पू. बाबांनी अमेरिकेला जातांना ‘शिबिरे घे’ हा दिलेला संदेश शिरोधार्य मानून प. पू. ताईंनी ठिकठिकाणी ध्यानशिबिरे यशस्वी रीतीने घेतली त्याविषयी आश्रमपत्रिकेने गौरवाचे उद्गार काढून म्हटले होते—

“गुरुदेव के आदेश से योगिनी श्रीमती कुसुमताई शर्मा तथा कुसुमेश्वरी स्थान स्थान पर ध्यानशिबिरों व्याख्यान प्रवचनों, भजन-कीर्तनों के

आयोजनों द्वारा गुरुदेव के कार्य में सराहनीय योग दे रही है। केवल शिबिरों में कई लोगों को गुरुदेव की कृपा प्राप्त हुई है और सर्वत्र भगवान नित्यानंद और गुरुदेव स्वामी मुक्तानंद की जयजयकार हो रही है।"

**आश्रमपत्रिका**

अंधेरीला प. पू. स्वामी स्वतःच्या 'श्रीगुरुदेव ध्यान मंदिरा'त वास्तव्य करू लागल्या. त्यांच्या मंगळ वात्सल्याने सारी भूमी पावन झाली व त्यांच्या कार्याला विलक्षण वेग, गती आणि उत्साह आला. आता उत्साही कार्यकर्त्यांचे सहकार्यही जोडीला होते. कारण साऱ्यांसाठी आता स्थान तयार झाले होते. १९७६ च्या मार्चमध्ये मोठ्या उत्साहात नाशिकला 'सिद्धयोग ध्यान शिबिर घेतले. आश्रमातून या शिबिरासाठी १०० गुरुभक्त गेले होते. नाशिककरांनी बहुसंख्येने या शिबिरास उपस्थित राहून चांगले सहकार्य दिले. प. पू. स्वामींच्या तेजस्वी व्यक्तिमत्वाची व दैवी शक्तीची छाप तेथील लोकांवर कशी पडली, त्यांनी नाशिककरांना कोणता संदेश दिला, शिबिरात काय काय कार्यक्रम असत याचे वर्णन तेथील स्थानिक वृत्तपत्रातून ('गावकरी', देशदूत 'पंचवटी एक्स्प्रेस' इ०) झळकत असे. 'पंचवटी एक्स्प्रेस'मध्ये असे लिहिले होते—

"गणेशपुरीचे महान योगी मुक्तानंद परमहंस यांच्या शिष्या ध्यान-योगिनी प. पू. कुसुमेश्वरी या दि. १८ मार्च (१९७६) ला नाशिकला येत आहेत हे नाशिककरांचे महद्भाग्य होय. 'दुर्गामंगल कार्यालया'त १८ ते २१ मार्चपर्यंत 'सिद्धयोग ध्यान शिबिर' त्या घेणार आहेत. ध्यानप्रेमी साधकांना ही एक अपूर्व सुवर्णसंधी आहे.

"एकनिष्ठ गुरुभक्तीनेच कुंडलिनी जागृती होते व ती ऊर्ध्वगमन करू लागते. त्यामुळे ध्यानात प्रगती होते. दिव्य अनुभव येतात व जिवाचा शिव होतो. मानव पूर्ण दुःखमुक्त होतो असे त्यांच्या शिकवणुकीचे थोडक्यात सार आहे. ध्यानक्रांती करून नाशिककरांना सुखाचा मार्ग दाखविण्यासाठीच जणू काय त्या येथे येत आहेत.'

**पंचवटी एक्स्प्रेस**

"गावकरी"ने लिहिले होते—"ध्यान शिबिर सुरू"

"प. पू. ध्यानयोगिनी श्रीकुसुमेश्वरी यांचे "सिद्धयोग ध्यान शिबिर काल्यापासून 'दुर्गा मंगल कार्यालयात' उत्साहाने सुरू झाले. २१ मार्च-पर्यंत दररोज ध्यान, प्रवचन, प्रश्नोत्तरी, पारायण, भेट, भजने वगैरे कार्यक्रम चालू आहेत.

शिबिराचे उद्घाटन करतांना त्या म्हणाल्या, 'प्रत्येकात दिव्यत्व, प्रकाश आहेच. फक्त शक्तिपातकुशल गुरुच त्याचा अनुभव आणून देतो. म्हणून गुरुभक्ती हीच कलियुगाची युक्ती आहे. पहाटे ध्यानाच्या कार्यक्रमाच्या वेळी अनेक साधकांना कुसुमेश्वरींच्या हस्ते दिव्य दीक्षा प्राप्त झाली.'

**"गांवकरी"**

"स्थानिक कार्यक्रमात" या शिबिराविषयी अशी माहिती होती—

"प. पू. कुसुमेश्वरींचा कार्यक्रम- आज व संध्या पहाटे ५ ते ७ ध्यान, श्रीगुरुगीता, धून, आरती व प्रसाद. दुपारी ११ ते १२ हरे राम हरे कृष्ण धून, दुपारी २ ते ३ 'मुक्तेश्वरी पारायण' सायंकाळी ६ ते ७॥ प्रवचन व प्रश्नोत्तरी. रात्री ८ ते ९ श्रीमहिम्नेश्वरी पाठ. भेटण्याची वेळ सकाळी ८॥ ते १० व दुपारी ३–३० ते ५

**'देशदूत'**

त्यापुढील शिबिर गुलबर्गा येथे झाले. त्यावेळी प. पू. स्वामींनी आपल्या भक्तांसह गाणगापूरचीही यात्रा केली.

त्यावेळी 'सोलापूर समाचार' या वृत्तपत्राने प. पू. स्वामींच्या उज्वल चरित्राची, महान कार्याची आणि तेथे संपन्न होणाऱ्या ध्यानयोगशिबिराची फार चांगली ओळख करून देतांना म्हटले होते—

"ध्यानयोगिनी कुसुमेश्वरी यांचे गुलबर्गा येथे अध्यात्मिक शिबिर"

ध्यानयोगिनी कुसुमेश्वरी यांनी दि. २२ एप्रिल ते २५ एप्रिल पर्यंत कलामंडळ (टाऊन हॉलसमोर) स्टेशन रोड, गुलबर्गा येथे सिद्धयोग ध्यानशिबिर आयोजित केले आहे.

त्याग आणि संन्यासमार्ग हा मुळातच अवघड आणि खडतर मार्ग आहे. विशेषतः सर्व प्रकारची गृहस्थाश्रमाची सुखे आणि वैभव पायाशी लोळण घेत असतांनाही त्यातून मुक्त होऊन संन्यास आणि विश्वकल्याणाच्या मार्गाकडे वळण्यास फार मोठी तपश्चर्या, साधना, मानसिक बळ व पुण्याई लागते. परंतु अशी खडतर वाटचाल करून दिव्यत्वाची प्रचीती आणून देणाऱ्यात ध्यानयोगिनी कुसुमेश्वरी यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. अध्यात्मिक शिबिरे हाच त्यांचा आता संसार आहे. त्यांचा भक्तगणही मोठा आहे. प. पू. ताईंच्या नुसत्या दर्शनेही शक्तिपात झाल्याचा अनेकांना अनुभव आहे. आपल्या साधकांना साधनेमध्ये सहाय्य होईल अशी विपुल अध्यात्मिक ग्रंथरचना त्यांनी केली आहे. इंग्रजी, मराठी व हिन्दी या तीन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे.

नाशिक नंतर शिबिरासाठी त्यांचे आगमन दि. २१ एप्रिलला गुलबर्गा येथे होत आहे.

**सोलापूर समाचार**

'विश्वसमाचारने' ही अशीच उद्बोधक माहिती देऊन रोजच्या सविस्तर कार्यक्रमाबद्दल लिहिले होते. शिवाय 'क्रांति कन्नड डेली' 'कन्नड बंधू डेली' इत्यादि कन्नड वृत्तपत्रात गुलबर्गा शिबिराच्या माहितीला अग्रक्रम देऊन प. पू. ताईंबद्दल आदरभाव व्यक्त केला होता.

त्यानंतर मे (१९७७) मध्ये श्रीवर्धन येथे झालेल्या ध्यानशिबिराविषयी 'कोंकण वैभव' या वृत्तपत्राने लिहिले होते.

**श्रीवर्धन येथे प. पू. कुसुमेश्वरींचे अध्यात्मिक शिबिर**

"श्री नित्यानंद महाराज, स्वामी मुक्तानंद परमहंस यांच्या परंपरेतील ध्यानयोगिनी कुसुमेश्वरी यांनी शुक्रवार दि. ३ जून ते ६ जून १९७७ पर्यंत 'पेशवे स्मारक हॉल' श्रीवर्धन येथे अध्यात्मिक शिबिर आयोजित केले आहे व यात खालीलप्रमाणे कार्यक्रम होतील—

शुक्रवार दि. ३ जून रोजी सायंकाळी ६ वाजता प्रवचनाने शिबिराची सुरुवात होईल.

यापूर्वीची यशस्वी शिबिरे नासिक व गुलबर्गा येथे आयोजित केली गेली होती."

**कोंकण–वैभव**

डिसेंबर २३ ते २५ हैद्राबाद येथे असेच 'सिद्धयोग ध्यान शिबिर' घेतले. बहुभाषिक असलेल्या हैद्राबादने या शिबिराला चांगला प्रतिसाद देऊन हे शिबिर यशस्वी केले. तेथील स्थानिक वृत्तपत्राने त्याबद्दलची माहिती देतांना म्हटले होते—

Hydrabad Dec. 22

SIDDHA YOGA DHYANA DIKSHA SHIBIR

Dyana Yogini Shree Kusumeshwari of Bombay is holding a Siddha Yoga Dhyan Diksha Shibir at Gobhuj Samaj, Sultan Bazaar here, from Dec. 23 to 25.

Dhyan Yogini Sri Kusumeshwari is an eminent disciple of Gurudeo Swami Muktananda Paramahansa of Ganeshpuri, Bombay. Blessed by her Guru, Dhyan Yogini Sri Kusumeshwari is holding such Shibirs.

There will be spiritual discourse at 6 p.m. from Dec. 23 to 25.

'Nagpur Times'

१९७८ च्या जानेवारीत नागपूरला झालेल्या शिबिराने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला! हजारो लोकांनी प. पू. स्वामींच्या प्रवचन, दर्शनाचा लाभ घेतला. शेकडो उच्चशिक्षित व्यक्तींनी त्यांच्याकडून ध्यानदीक्षा घेऊन स्वतःला पावन करून घेतले.

'तरुण भारत' या नागपूरच्या लोकप्रिय वृत्तपत्राने आपल्या वृत्तपत्रात अग्रक्रम देऊन म्हटले होते.

सिद्धयोग ध्यान शिबिर
ध्यानयोगिनी श्रीकुसुमेश्वरी येणार

"गुरुकृपा आणि अखंड साधना यांच्या योगाने गृहिणीपदावरून गुरुपदावर पोचलेल्या ध्यानयोगिनी श्रीकुसुमेश्वरी नागपूरला २७ ता.ला येणार आहेत.

नागपूरला होणारे अशा प्रकारचे हे पहिलेच शिबिर असून यापूर्वी नाशिक, गुलबर्गा, श्रीवर्धन, पुणे, हैद्राबाद इ. ठिकाणी अशी शिबिरे झाली होती व या शिबिरांना उत्तम प्रतिसाद मिळाला होता. 'आम्ही सुखी झालो, तुम्ही पण सुखी व्हा' हे शिबिराचे घोषवाक्य असते असे स्थानिक संयोजक श्री. फाटक यांनी सांगितले.

प्रथम पासूनच चिंतनशील असलेल्या कुसुमेश्वरींना स्वामी चिन्मयानंदांचे प्रवचन ऐकण्याचा योग मुंबईला आला आणि त्यांचे जीवन बदलले. पुढे कुसुमेश्वरी गणेशपुरी येथे स्वामी मुक्तानंद यांच्या दर्शनास गेल्या व ध्यानदीक्षा घेऊन सिद्धयोगाचा पंथ आक्रमू लागल्या. गुरुकृपा व साधना यांच्या जोरावर कुसुमेश्वरी गुरुपदी पोचल्या."

तरुण भारत–नागपूर

तेथील दै. 'लोकमत' ने ही आपल्या वृत्तपत्रात शिबिराच्या सर्व कार्यक्रमाची माहिती आपुलकीने छापली होती.

नागपूरच्या शिबिराच्या यशाची पावती तेथल्या तेथेच मिळाली व तावडतोब तेथे श्री. फाटक यांच्या घरी ध्यानकेंद्र सुरू करण्यात आले. हे ध्यानकेंद्र पुढे इतके लोकप्रिय झाले की अशा प्रकारची ५ केंद्रे स्थापन करण्यास प. पू. स्वामींनी परवानगी दिली. त्याची माहिती वेळोवेळी तेथील 'तरुण भारत' व 'Nagpur Times' मध्ये छापली आहे. उदाहरणार्थ—

"स्वामी उमानंद सरस्वती—श्रीगुरुदेव ध्यानमंदिर—ध्यानकेंद्राचे उद्घाटन—अॅड. य. वा. फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली—सौ. तारा जोशी, कॉर्टर्स नं. सी १४/१ रविनगर, यांचे घरी, सायंकाळी ६ वाजता"

तरुण भारत

Swami Umanand Saraswati, Shri Gurudev Dhyan Kendra. Opening ceremony of Meditation Centre by Rajabhau Mandhare, at Adv. W. N. Pimparkar, 32, New Cotton Market Layout, Opp. New S.T. Stand at 6 p.m.

—*Nagpur Times*

१९७८ च्या मे महिन्यात प. पू. गुरुदेवांना त्यांच्या गुरुदेवांकडून संन्यासदीक्षा प्राप्त झाली. व प. पू. स्वामी उमानंद सरस्वती हे नवीन नाम प्राप्त झाले. संन्यासदीक्षा मिळाल्यावर मात्र प. पू. स्वामींनी आपल्या गुरुदेवांच्या आज्ञेप्रमाणे ध्यान शिबिरे घेणे स्थगित केले व त्यांचे वास्तव्य मुंबईत होऊ लागले. अनेक नवे जुने साधक कार्यकर्ते प. पू. स्वामींच्या हाताशी येऊ लागले. त्यांना हाताशी धरून त्यांनी मुंबईत ८ नवीन सिद्धयोग ध्यानदीक्षाकेंद्रे सुरू केली व ती अद्यापही सुरू आहेत. त्याबद्दलची बातमी देताना 'लोकसत्ता' लिहिले होते—

स्वामी उमानंद सरस्वती यांची
सिद्धयोग ध्यानदीक्षा केंद्रे

गणेशपुरीचे स्वामी मुक्तानंद परमहंस यांच्या शिष्या ध्यानयोगिनी उमानंद सरस्वती (पूर्वाश्रमीच्या सौ. कुसुम शर्मा) ह्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्ट तर्फे मुंबईच्या विविध भागात एकूण आठ सिद्धयोग ध्यानदीक्षा केंद्रे चालू करण्यात आली आहेत.

[वेळ संध्याकाळी ६–३० ते ७–३०]

शिवानंदनगर (अंधेरी पूर्व) येथील श्रीगुरुदेव ध्यानमंदिरात प्रत्येक रविवारी सकाळी ८ वाजता सिद्धयोग ध्यानदीक्षा हा कार्यक्रम होतो व दुपारी ४ वा. स्वामी उमानंद सरस्वती यांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन होत असते.

पश्चिम अंधेरीत दोन व विलेपार्ले (पूर्व) येथे दोन केंद्रे असून बाकीची कांदिवली (पूर्व) माहीम, महालक्ष्मी व गिरगाव येथे आहेत.

लोकसत्ता, सोमवार ९–१०–७८

"स्वामी उमानंद सरस्वती यांची नवी ध्यान–केंद्रे."

स्वामी उमानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्ट (अंधेरी पूर्व) यांच्या वतीने डॉ. पुरंदरे सभागृह, साहित्यसंघ गिरगाव येथे २४ जानेवारीपासून सिद्धयोग ध्यानदीक्षा केंद्र सुरू होईल.

सदर केंद्र दर महिन्याच्या चौथ्या बुधवारी (संध्या० ६॥ ते ७॥) चालविण्यात येईल. अशाच प्रकारचे दुसरे केंद्र श्रीज्ञानेश्वर मंदिर, दादर येथे ४ फेब्रुवारीपासून दर महिन्याच्या पहिल्या रविवारी (दुपारी ४ ते ५) चालविण्यात येईल."

(लोकसत्ता मंगळवार दि. २३-१-७९)

आपल्या गुरुदेवांच्या आदेशानुसार प. पू. स्वामींनी मार्चमध्ये साधकांसाठी मंदिरात अत्यंत सखोल असे सिद्धयोगाचे अभ्यास वर्ग सुरू केले, व आपले श्रीगुरुदेव ध्यान मंदिर हे सिद्धविद्यापीठ आहे याची जणू पूर्वसूचनाच दिली! ही १५ प्रवचने म्हणजे ब्रह्मविद्येच्या गळ्यातील बहुमोल रत्नहारच होय! ज्या साधकांना ही प्रवचने श्रवण करावयास मिळाली ते खरोखरच भाग्यवान होत! 'लोकसत्ता' असे म्हटले होते—

"प. पू. स्वामी उमानंदांचे सिद्धयोग-अभ्यास-वर्ग"

"पूर्व अंधेरीच्या चकाला येथील 'श्रीगुरुदेव ध्यान मंदिर' ट्रस्टच्या वतीने खास लोकाग्रहास्तव, प. पू. स्वामी उमानंदांच्या मार्गदर्शनाखाली, दि. ११ मार्च १९७९ पासून दर रविवारी संध्याकाळी ६ ते ७॥ सिद्ध-योगाची ध्यानदीक्षा घेतलेल्यांसाठी, सिद्धयोगाच्या अभ्यासाचे वर्ग सुरू करण्यात येत आहेत. तरी सर्व साधक बंधूभगिनींनी ह्या संधीचा जरूर फायदा घ्यावा व आपली नावे आपआपल्या केंद्रात वा श्रीगुरुदेव ध्यान मंदिरात नोंदवावीत. मासिक फी फक्त १५ रु.- कॉलेजस्टूडंटस्साठी १० रु. फी."

(लोकसत्ता-शनिवार ३-३-१९७९)

मंदिरात वेळोवेळी होणाऱ्या अध्यात्मिक कार्यक्रमांची माहिती 'लोकसत्ते'तून प्रसिद्ध होते. कधी कधी 'महाराष्ट्र टाईम्स' 'इंडियन एक्सप्रेस' 'फ्री प्रेस जर्नल', 'नवाकाळ' इत्यादि महत्वाच्या वृत्तपत्रातूनही ह्या बातम्या प्रसिद्ध होतात. १९७७ च्या विजयादशमीला प. पू. बाबांच्या पूर्णाकृतिमूर्तीची मंदिरात मोठ्या थाटाने प्रतिष्ठापना करण्यात आली. त्याची माहिती सान्या वृत्तपत्रांनी दिली होती. उदा०

STATUE INSTALLED

A life-size statue of Gurudev Swami Muktananda Paramahansa of Ganeshpuri was installed at a function in Gurudev Dhyan Mandir, on Friday. The statue has been made by Prof. V. V. Manjrekar.

— *Free Press Journal*, 23-10-1977

गावकरी, देशदूत, भक्तिसंगम या वृत्तपत्रांनी 'श्रीगुरुदेव स्वामी मुक्तानंद यांच्या 'पुतळ्याचे अनावरण' मुक्तानंद स्वामींचा पुतळा स्थापन, 'मुक्तानंद स्वामींचा पूर्णाकृती पुतळा' असे मथळे देऊन ही बातमी दिली होती.

मे महिन्यात प. पू. स्वामींच्या संन्यासदीक्षा-वर्धापन दिनानिमित्त साधकांसाठी एक यशस्वी तपस्या-सप्ताह आयोजित करण्यात आला होता. त्यात दिवसभर कोणकोणते कार्यक्रम असत याची सविस्तर माहिती लोकसत्तेने दिली होती तपस्या सप्ताहाची माहिती अशी प्रसिद्ध केली होती.

## स्वामी उमानंदांच्या मार्गदर्शनाखाली "तपस्या सप्ताह"

प. पू. स्वामी उमानंद सरस्वती यांच्या १५ मे रोजी येणाऱ्या संन्यासदीक्षा वर्धापन दिनानिमित्त श्रीगुरुदेव ध्यान मंदिर ट्रस्टच्या वतीने ९ मे १९७९ ते १५ मे १९७९ असा एक 'तपस्या सप्ताह' पाळला जाणार आहे. ही पर्वणी साधण्यासाठी बाहेरगावचे साधक बहुसंख्येने उपस्थित रहाणार आहेत. सर्व कार्यक्रम ट्रस्टच्या मालकीच्या जागेतच होतील.

पहाटे ४॥ ते ६—सिद्धयोग-ध्यानदीक्षा व श्रीगुरुगीता व आरती

६ ते ८—श्रीगुरुचरित्राचे पारायण

८ ते ८।—रुद्रपाठ

८॥ ते १०—दर्शन, प्रदक्षिणा, श्रीगुरुगीतापाठ १० ते १२—प्रसाद, विश्रांती.

दुपारी १२ ते २—श्री गुरुचरणेश्वरी अर्थात गुरुदेव मुक्तानंद पादुका अर्चना, सिद्धयोगी श्रीनित्यानंद व श्रीगुरुदेव मुक्तानंद लीलालहरी, श्रीमुक्तेश्वरी, श्रीगुरुमहिमानेश्वरी आणि श्रीगुरुमानसपूजनेश्वरी यापैकी एका ग्रंथाचे रोज पारायण होईल व आरती.

दुपारी २ ते ३—गुरुभजने

३ ते ४—धून. (१) हरेराम हरेकृष्ण (२) ॐ नमः शिवाय (३) ॐ नमो भगवते नित्यानंदाय मुक्तानंदाय ४ ते ५॥—स्वामी उमानंदांची श्रीज्ञानेश्वरीवर प्रवचने, आरती

जयजयकार.

संध्याकाळी ६॥ ते ७॥—दर्शन, प्रदक्षिणा, श्रीगुरुगीता.

विशेष कार्यक्रम—रविवार ता. १३ रोजी दुपारी ४ ते ५॥

श्रीगुरुगीतापारायण, मंत्रेश्वरी व स्वामी उमानंदांचे शिवयोगावर प्रवचन.

मंगळवार ता. १५ मे रोजी दुपारी ४ ते ५॥ स्वामी उमानंदांचे 'संन्यास सुखी सोपारी' या विषयावर प्रवचन :

तो कसा पार पडला हेही नंतर दिले होते. त्यावेळी लोकसत्तेत असे वृत्त प्रसिद्ध झाले होते.

## स्वामी उमानंद सरस्वती यांचा तपस्या सप्ताह

स्वामी उमानंद सरस्वती यांच्या संन्यासदीक्षा वर्धापन दिनानिमित्त अंधेरी येथील श्रीगुरुदेव ध्यान मंदिरात दि. ९ ते १५ मे हा तपस्यासप्ताह असंख्य साधकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

गुरुचरित्र पारायण, धून, रुद्रपठण, व सकाळ संध्याकाळ सत्संग आणि स्वामींची सिद्धयोग प्रवचने अशा कार्यक्रमात भाग घेण्यासाठी नागपूर, नाशिक, पुणे इत्यादि भागातूनही साधक आले होते.

संकल्पित १०८ गुरुचरित्र पारायणातील ६४ वे सामुदायिक पारायण या सप्ताहात ६४ संस्कारित ब्राह्मणांनी (यात अनेक ब्राह्मणेतरांचाही समावेश आहे.) केले. स्वामी उमानंद सरस्वतींनी ज्ञानेश्वरी निरूपण केले. "संन्यास सुखी सोपारी।" या ज्ञानेश्वरीतील ओवीच्या आधारे त्यांनी गृहस्थाश्रमातच चारही आश्रम पूर्ण कसे करता येतील याचे विवेचन केले.

गुरुपौर्णिमेच्या निमित्तानेही असाच एक तपस्या-सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

(लोकसत्ता दि. २३-५-७९)

गुरुपौर्णिमेच्या उत्सवाची व १५ ऑगस्टच्या 'दिव्य दीक्षा दिना'च्या कार्यक्रमाची माहिती लोकसत्तेने अशी प्रसिद्ध केली होती—

"स्वामी उमानंद ह्यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुपौर्णिमेचा महोत्सव"

अंधेरीच्या श्रीगुरुदेव ध्यान मंदिरात दिनांक ९ जुलै रोजी, गुरुपौर्णिमे-निमित्त खालील कार्यक्रम होतील.

१) पहाटे ४॥ ते ५ सिद्धयोग-ध्यान-दीक्षा.

पहाटे ५ ते संध्याकाळी ५ पर्यंत श्रीगुरुचरित्रांतर्गत संस्कृत गुरुगीतेचे अखंड पठण.

२) संध्याकाळी ५ ते ६-श्रीगुरुचरित्र योगेश्वरीच्या द्वितीय खंडाचे प्रकाशन.

३) स्वामी उमानंद विरचित, 'गीत मुक्तानंदेश्वरीचे' गुरुदेव ध्यान-मंदिराच्या रेडिओ फेम गायिकांकडून भावपूर्ण गायन.

४) भगवान नित्यानंद व गुरुदेव मुक्तानंद ह्यांची आरती, जयजयकार, प्रसाद.

सर्व गुरुभक्त साधकांचा विनामूल्य प्रवेश. बाहेर गावच्या साधकांनी २० जूनपर्यंत, येण्याचे कळवावे.

(लोकसत्ता ९–६–१९७९)

## स्वामी उमानंद ह्यांच्या मार्गदर्शनाखाली

"दिनांक १५ ऑगस्टला गुरुदेव स्वामी मुक्तानंद परमहंस ह्यांच्या दिव्यदीक्षा–दिनानिमित्त श्रीगुरुदेव ध्यान मंदिर, चकाला, पूर्व अंधेरी येथे खालील कार्यक्रम होतील.

१) पहाटे ४॥ ते ६—सिद्धयोग–ध्यान–दीक्षा व श्रीगुरुगीतापठण.

२) सकाळी ६ ते संध्याकाळी ६—'हरे राम हरे कृष्ण' अखंड धून. गुरुदेवांची आरती, जयजयकार.

३) संध्याकाळी ६ ते ७—गोकुळाष्टमीचा सोहळा–पाळणा, दहीहंडी; गोपाळकाला. सर्व नव्या जुन्या गुरुभक्तांनी यावे.

नागपूर, पुणे, नाशिक, खोपोली, श्रीवर्धन आदि केंद्रातूनही हाच कार्यक्रम राहील."

(लोकसत्ता—१–८–१९७९)

प. पू. स्वामींची ग्रंथसंपदा विपुल, गुरुभक्तिरसाने रसाळ व गुरुप्रासादिक आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'श्रीगुरुचरित्र बोधेश्वरी' या ग्रंथाविषयी लोकसत्तेने अशी माहिती दिली होती—

"श्रीगुरुचरित्र बोधेश्वरी" प. पू. स्वामी उमानंद सरस्वती लिखित.

खंड १ किं. २१ रु.

खंड २ किं. १५ रु.

दोन्ही खंड एकत्र घेणाऱ्यास खास सवलत. सर्व गुरुभक्त दत्तभक्तास अपूर्व संधी.

प. पू. स्वामी उमानंद सरस्वती (पूर्वाश्रमीच्या श्रीकुसुमेश्वरी) लिखित सार्थ श्रीगुरुचरित्र अर्थात श्रीगुरुचरित्र बोधेश्वरीच्या प्रथम खंडाचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत झाले.

दुसरा खंड येत्या गुरुपौर्णिमेस खास लोकाग्रहास्तव प्रसिद्ध होत आहे. दैवी शक्तीने भारलेल्या, त्वरित फलदायी अशा या सिद्ध-ग्रंथाचे अत्यंत रसाळ सुबोध नि सार्थ विवेचन करणाऱ्या गुरुप्रासादिक 'श्रीगुरुचरित्र-बोधेश्वरी'चे हे दोन्ही खंड फक्त २८ रु. त गुरुपौर्णिमेपासून (९ जुलै १९७९) दसरा (१ ऑक्टो.) पर्यंतच ही खास सवलत.

द्वारा–श्रीगुरुदेव ध्यान मंदिर.

(लोकसत्ता ३०–५–७९)

'श्रीकुसुमेश्वरींचे सर्वोपयोगी व सांप्रदायिक धर्म साहित्य' या नावाचा 'सदानंद' या लेखकाने लिहिलेला एक विस्तृत लेखही गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने लोकसत्तेने छापला होता.

त्यात प्रारंभी असे लिहिले होते—

"गणेशपुरीचे सिद्ध गुरु स्वामी मुक्तानंद यांच्या शिष्या स्वामी उमानंद सरस्वती यांचे श्रीकुसुमेश्वरी प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झालेले सर्व ग्रंथ हे खास करून सिद्धयोगाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरावेत ह्या दृष्टीने लिहिलेले आहेत. सिद्धयोगाचा गाभा गुरुभक्तियोग. सिद्ध विद्यार्थी हा गुरुभक्त असणारच. मग त्याला गुरुविषयी ज्ञान व्हायला पाहिजे, अव्यभिचारी गुरुभक्ती जमायला पाहिजे. त्यासाठी मार्गदर्शन करणारे हे गुरुप्रासादिक ग्रंथ आहेत."

'श्रीगुरुगीतार्थेश्वरी' म्हणजे मूळ संस्कृत गुरुगीतेतील १८१ श्लोकांचा सटीक, सुबोध आणि प्रासादिक मराठी अनुवाद आहे. श्रीगुरुअष्टका किंवा 'ब्रह्मानंदं परमसुखदम्' यासारखे नित्य परिचयाचे सद्गुरुस्तवनाचे श्लोक या गुरुगीतेतीलच आहेत.

'चित्‌शक्तिविलास' ह्या श्रीमुक्तानंदांच्या मूळ ग्रंथाच्या अनुवादात सिद्धयोगाचे प्रतिपादन करण्यात आले आहे. ह्याशिवाय कुंडलिनीचा परिचय करून देणारा 'कुंडलेश्वरीचा विवाह', स्वाध्यायासाठी स्मरणेश्वरी, गुरुमहिमानेश्वरी, गुरुमानसपूजनेश्वरी, गुरु ॐ मंत्रेश्वरी, सिद्धांतेश्वरी इ. छोट्या मोठ्या पुस्तिकाही आहेत. श्रीकुसुमेश्वरी विशेषांकही श्रीकुसुमेश्वरींच्या आबालवृद्धभक्तांना वाचनीय ठरावा. 'श्रीगुरुचरित्र बोधेश्वरी' चे ही दोन खंड प्रसिद्ध झालेले आहेत.

| | रु. पैसे |
|---|---|
| १) श्रीगुरुगीता अर्थेश्वरी (मराठी) | १५–०० |
| २) श्रीगुरुगीतार्थेश्वरी (इंग्लिश) | २५–०० |
| ३) श्रीगुरुगीता पठणेश्वरी | ३–०० |
| ४) श्रीगुरुचरित्र बोधेश्वरी (खंड १) | २१–०० |
| ५) श्रीगुरुचरित्र बोधेश्वरी (खंड २) | १५–०० |
| ६) श्रीमुक्तेश्वरी | १०–०० |
| ७) चित्‌शक्तीविलास (मराठी) | २०–०० |
| ८) श्रीकुसुमेश्वरी विशेषांक (मराठी) | १२–०० |
| ९) श्रीकुसुमेश्वरी विशेषांक (इंग्लिश) | १२–०० |
| १०) सिद्धान्तेश्वरी | ५–०० |
| ११) श्रीनित्यानंद मुक्तानंद लीलालहरी | ६–०० |
| १२) श्रीगुरुस्मरणेश्वरी | ४–०० |
| १३) श्रीगुरुमहिमानेश्वरी व मानसपूजनेश्वरी . | ३–०० |
| १४) श्रीकुंडलेश्वरीचा विवाह | ४–०० |
| १५) नित्यमुक्त कुसुमांजली | १–०० |
| १६) गुरु ओम् मंत्रेश्वरी | –२० |
| १७) आरती द्वय | –४० |

(लोकसत्ता ९-८-७९)

श्रीकुसुमेश्वरी प्रकाशन, द्वारा श्रीगुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्ट, १० अ शिवानंद सोसायटी, कॅलिको इंडस्ट्रीजसमोर, चकाला रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९३

प. पू. स्वामींचा कीर्तिसुगंध सारीकडे दरवळू लागला. साधकगण निष्ठेने साधनेसाठी गोळा होऊ लागला. प. पू. स्वामींचे अलौकिक व्यक्तिमत्व आणि त्यांच्यातील दिव्य शक्ती यामुळे प्रभावित होऊन Free press Journel या प्रसिद्ध वृत्तपत्राने त्यांची विस्तृत माहिती २४ नोव्हें. १९७७ च्या अंकात प्रसिद्ध केली होती. त्यात असे लिहिले होते.

## EXALTED EVE

Dhyanyogini Kusumeshwari, a disciple of Swami Muktananda has been holding what are known as Siddha Yoga Dhyan Deeksha Shibirs or Meditation classes at Andheri East and similar gatherings elsewhere also. She is the wife of a former Addl. Chief Secretary of Maharashtra

Government, Mr. G. A. Sharma. With disarming candour Kusumeshwari admits that while moving in high society as this top Government Executive's wife, she had full experience of the life and ways of a socialite. But once she came under the influence of Swami Muktananda of Ganeshpuri, religion caught up with her with tremendous fource. It was at Muktananda Baba's instance that she has now set up a Gurudev Dhyan Mandir at 10A Swami Shivanand Society, Chakala Road, Andheri (East) for the benefit of seekers of Truth in Bombay. The Mandir has already got 800 members and at least 150 to 200 men, women and children regularly attend Kusumeshwari's intensive meditation classes on Saturdays and Sundays. A special feature of her recent Shibir was that she 'awakened' hidden spiritual power in the seekers by "Sprsha Deeksha" or touching on the forehead, which is the traditional Hindu means of transmitting spiritual energy from the teacher to the disciple. Dhyanyogini Kusumeshwari is to visit Hyderabad in December to hold similar meditation class there.

—*Free Press Journal* 24-11-1977

सोलापूर शिबिराच्या वेळी 'सोलापूर समाचार' या वृत्तपत्राने 'संत कुसुमेश्वरी' हा विस्तृत लेख आपल्या वृत्तपत्रात छापून प. पू. ताईंच्या महान कार्याची ओळख करून दिली होती. बी. एस. कुलकर्णी यांनी लिहिलेल्या या लेखात म्हटले होते—

"अध्यात्म हा माझा अभ्यासाचा विषय. संत कुसुमेश्वरी सोलापूरला आल्याचे कळले. म्हणून सर्वसामान्यांना त्यांचा परिचय घडविण्यासाठी त्यांची मुलाखत घ्यावी या हेतूने पाणे बंगल्यातील त्यांच्या निवासस्थानाकडे मोर्चा वळविला.

जेव्हा संत कुसुमेश्वरींबरोबर संवाद सुरू झाला तेव्हा त्यांचा अध्यात्म अभ्यास परिपक्व असल्याचे आढळले. साहजिकच या विचारांना सर्वांपुढे ठेवावे असे वाटू लागले.

"भक्तीयोग हा कर्माची कटकट नको असे सांगतो का ?" या माझ्या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, "जीवनात मिंधेपणा व पळपुटेपणा कोठल्याच क्षेत्रात यश न देणारा आहे. प्रयत्नवाद सर्वत्र आवश्यक आहे. सक्रियपणा नसेल तर परमार्थ देखील साध्य होणार नाही. साधना ही जिवंत वृत्ती आहे. म्हणून निवृत्तिपर काही नसून कर्म आवश्यक आहे."

२) "आपण सांगत असलेल्या साधनेत व इतरांच्या दीक्षाविधीत काही फरक आहे का ?" असा प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या, "दीक्षा हा बाहेरून करावयाचा विधी नव्हे. आतूनच सर्व आपोआप घडते म्हणूनच त्याला सहजयोग म्हणतात. ते गुरुकृपेनेच घडते. शक्तिपातात ऊर्ध्व हा उच्चदर्जाचा शक्तिपात असून गौण शक्तिपातात मनुष्य देहाच्या पातळीवरच राहतो." त्यांच्या प्रश्नोत्तरीच्या कार्यक्रमाबद्दल मी त्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी उत्तर दिले, "प्रश्नोत्तरामुळे सर्वसामान्यांच्या अंतःकरणातील भावना, अडचणी समजतात व त्यांच्याशी अधिक जवळचा संपर्क साधता येतो. शक्तिपाताच्या दीक्षेसाठी गुरुभाव वाढवावा लागतो. जितकी गुरुनिष्ठा श्रेष्ठ दर्जाची तितकी अनुभूती निकटच्या रूपात मिळू शकेल. गीतेच्या ४ थ्या अध्यायात" श्रद्धावान् लभते ज्ञानम् ।" असे म्हटले आहे. शेवटी सर्व कार्यांचे पर्यवसान ज्ञानात होते, हेच सांगायचे; नवीन काही नाही, 'नो कंडिशन' असेच ज्ञानप्राप्तीचे हे सहज साधन आहे.

## खरा धर्म संतांनी शोधला

संतांनी जीवनात सुखाचा मूलमंत्र शोधला. त्यात तुमच्या हातून घडणाऱ्या चुका देखील वाईट मानायला संत तयार नाहीत. तुकाराम तर 'विषयचि जाणा नारायण' म्हणतात. हे पाप नसून लाॅलीपॉप आहे असे मी मानते.

आजच्या विज्ञानयुगात मानवाला धर्माची आवश्यकता आहे का ? या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, "कर्मप्रधान संस्कृतीत ध्येयवाद व त्याच्या जोडीला तत्त्वज्ञान हवे. आज आपण केवळ पोटार्थी झालो म्हणून तत्त्वाला अविश्वात फाटा द्यावा हा अविचार झाला. त्याकरिता गीतेत निष्काम कर्मयोग सांगितला आहे. आचरणात किमान त्याग नसेल तर ते जीवन निष्फळच. आजच्या समाजात मनाचा तोल ढळला आहे याचे कारण आपण केवळ स्वार्थच साधीत राहिलो. वैयक्तिक विचारात 'मी' विसरून जो पुढे जातो त्यालाच खरेखुरे जीवन जगता येते व अशी अनेक माणसे सामाजिक न्याय आणतील तर त्यापेक्षा धर्म निराळा कोणता असणार ? धर्म म्हणजे धारणा करणे. धर्म म्हणजे माणुसकी. माणुसकी काढली म्हणजे शून्य. साधुसंत हे साधन नाही तर साध्य ठरू लागले आहेत. दुःखितांना आश्वासित करतो, त्यांना खात्रीने समाधान देऊ शकतो तोच खरा संत व सद्गुरु. आज देवाचा विचार कमी, तत्त्वज्ञानाची चर्चा जास्ती झाली आहे. विचार कमी झाल्यावर अविचार वाढणारच. विचारातून नवीन कळत जाते, आचार पक्के होतात. देव अथवा धर्म यांना विचार आणि आचारांनीच जवळ करता येईल. धर्म सनातन आहे तर यात झालेले बदल काय सुचवितात ? या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या,

"कर्मासंबंधी आधी सांगितल्याप्रमाणे आचरणात बदल होतो. मूल्य बदलत नाही. बाह्य आवरण बदलले तरी अंतरंग बदलत नाही. साखरेचे अनेक पदार्थ केले तरी साखरेच्या गोडीत बदल होत नाही. तद्वत् धर्माचे रूप बदलले तरी समाजाची धारणा व्हावी हा धर्माचा मूळ हेतू कधीही लोप पावणार नाही. धर्माबद्दल तरुण पिढीचा राग लक्षात घेऊन विचारावेसे वाटते, जर सगळेच खोटे आहे तर आपण तरी खरे आहोत काय ? केवळ बाह्य गोष्टींवरूनच काही ठरत नाही."

वंदनीय स्त्री, पुरुषाला सर्व अर्पण करायचे ही सर्वोत्तम आणि सर्वमान्य पद्धत म्हणावी का ? व ही योग्य आहे का ?

त्या म्हणाल्या, "कोठलाही विषय आपोआप समजत नाही. त्यात अध्यात्माचे तर मार्ग भिन्न आहेत. अशा ठिकाणाची माहिती हवी असेल. तर तिथे जाणकार हवा. सद्गुरु हाच पूर्ण पुरुष जो स्वतः तिथल्या मुक्कामाची माहिती असल्याने आपल्याला बरोबर अशी कृती, कर्तव्य पार पाडण्यास तो सहाय्य करतो. चिरंतन मूल्ये शिकवून अंतिम सत्य व शाश्वत अनुभव देणारा गुरु श्रेष्ठ म्हणावा.

ज्याला साधना करायची आहे त्याला गुरु देखील भेटतोच. नम्रतेने गुरुबोध घेता येतो. ज्याला ईश्वराचा प्रत्यय आला तोच गुरु म्हणावा. त्याच्या सहवासानेच खरा मनोनिग्रह आला पाहिजे, परिवर्तन घडले

पाहिजे, निर्मळ आनंद झाला पाहिजे, शांती मिळाली पाहिजे, सद्गुरु व साधक यांचे नाते आईमुलासारखे ममतेचे असते" असे त्या म्हणाल्या.

नेहमीप्रमाणे हा देखील श्रीमंत लोकांचा स्वान्त सुखाय केलेला प्रयत्न असावा असा माझा गैरसमज झाला होता. शिवाय पूर्वाचार्यांनी अनेक विकल्प मनात पेरून ठेवल्यामुळे कारण नसताना काही विचार आले. फारसा भारून वगैरे न जाता मी भेट घेण्यास गेलो होतो. पण जेव्हा संत कुसुमेश्वरींबरोबर संवाद सुरू झाला तेव्हा माझी समजूत चुकीची असून त्यांचा अध्यात्म अभ्यास परिपक्व असल्याचे मला पूर्णपणे आढळून आले हे मला सर्वांना मुद्दाम सांगावेसे वाटते. त्यांनी दिलेल्या समाधानकारक उत्तरांवरून तर माझी पूर्णच खात्री झाली.

अशा रीतीने प. पू. स्वामींच्या कीर्तीचा आलेख उंचावत जाऊन त्यांची अपरंपार प्रसिद्धी झाली. आपल्या शिष्येच्या कीर्तीने प. पू. बाबानाही परम संतोष झाला व अंधेरीच्या श्रीगुरुदेवध्यानमंदिराला भेट देण्यासाठी ते १९७८ च्या मे महिन्यात तिथे येऊन गेले. प. पू. स्वामींचे महान कार्य पाहून बाबा फार खूष झाले. त्यावर्षी प्रसिद्ध झालेल्या 'गुरुदेववाणी'त Baba's Visits या सदरात ही बातमी मुद्दाम दिली होती. त्यात म्हटले होते—

BABA'S VISITS

At the request of Swami Umanand (Yogini Kusumeshwari) Baba spent two days at the end of May at her Shree Gurudev Dhyanmandir and blessed that centre.

(Shree Gurudev-Vani)

॥ ॐ श्रीगुरुदेव ॥

श्रीकुसुमेश्वरी प्रकाशनातर्फे, मौजेत छापून, दिनांक ३१ डिसेंबर १९७९, या शुभदिनी, प. पू. स्वामी उमानंद सरस्वती यांच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीगुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्टद्वारा. 'स्वामी उमानंद विशेषांक' [सचरित्र व सचित्र] आणि प. पू. स्वामी उमानंदलिखित. खालील ग्रंथांचे प्रकाशन होईल.

१) श्री गुरुचरित्र बोधेश्वरी, एकत्रित खंड ३ व ४.

Sri Jnaneshwari as understood — Volume 1.

First six chapters, explained and interpreted verse by verse, with beautiful thoughts, so finely and lucidly expressed, in such a liquid style which has a brilliant flow! A must, for every student of Jnaneshwari.

खालील पत्त्यावर अधिक माहिती मिळेल.

श्रीगुरुदेव ध्यानमंदिर ट्रस्ट, १० अ–शिवानंद सोसायटी, चकालारोड, अंधेरी. (पूर्व) मुं. न. ६९. फोन नंबर ५९२२१४

लोकसत्ता, सोमवार. दि. २२–१०–१९७९.

ही प्रसिद्धी आहे दिनांक २२–१०–७९ च्या लोकसत्तेने केलेली परमपूज्य स्वामींच्या आगामी प्रकाशनांची. एकाच दिवशी, एकाचवेळी एकाच लेखकाच्या तीन ग्रंथांचे प्रकाशन म्हणजे या लौकिक जगातील एक चमत्कारच! गुरुपौर्णिमेला श्रीगुरुचरित्र बोधेश्वरीचा २ रा खंड प्रसिद्ध झाला. नि त्यानंतर अवघ्या ६ महिन्याच्या अल्पावधीत हे तीन ग्रंथ प्रकाशित होणार. स्वामींचे यापूर्वीचे ग्रंथ आता महाराष्ट्रात दूरवर पोचले आहेत. घरोघरी त्या ग्रंथांचे मोठ्या श्रद्धेने भक्तिभावाने वाचन होत आहे. लोकांना अलौकिक अनुभवही येत आहेत, त्यामुळेच हे ग्रंथ ३१ डिसेंबरला प्रसिद्ध होणार, तत्पूर्वीच ही जाहिरात वाचून ग्रंथांच्या रिझर्वेशनसाठी चोहोकडून पत्रे येऊ लागली. आहेत. ग्रंथाबरोबर अशा अलौकिक ग्रंथांच्या कर्त्यांच्या (प. पू. स्वामींच्या) दर्शनसुखाची लागलेली तळमळही अनेक पत्रांतून व्यक्त झाली आहे. परमपूज्य स्वामींच्या प्रसिद्धीच्या आलेखाची कमान ही अशी चढतीवाढती आहे. खरं गुरुत्व तेथे प्रसिद्धी मिळणारच. पण स्वामींच्याच शब्दांत "ही सारी गुरुकृपा."

*

लौकिक व्यावहारिक हिशेब आणि गुरुभक्तींचा हिशेब वेगळा. एका भक्तासाठी देखील गुरुला त्या गावी जावे लागते. श्रीकृष्णाने नाही का एका अर्जुनासाठी गीता सांगितली?

*

गुरुभक्ती हा पंचमपुरुषार्थ! त्यात चारी मुक्ती आल्या.

*

आत्मशक्ती आचरणात आणली तरच संसार सुखी. सुखाची गुरुकिल्ली ध्यान!

*

भारत नावाप्रमाणे भारत (तेजामध्ये रत) बनला पाहिजे. आपले कल्चर परत आले पाहिजे. परकीयांना येऊ दे भारतात शिकायला. आपण स्वाभिमान कायम ठेवला पाहिजे.

*

ॐ श्रीगुरुदेव

# पत्रसंकलन

सिद्धयोग ध्यान-शिबिराच्या निमित्ताने प. पू. स्वामींचा (त्या वेळी श्रीकुसुमेश्वरी) संचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात झाला. इतकेच नव्हे तर गुजराथमध्येही गुरुभक्तीचा डंका पिटला गेला. हजारो साधकांनी या ध्यानशिबिरांना हजर राहून प. पू. स्वामींकडून ध्यानदीक्षा घेतली व आपले जीवन कृतार्थ करून घेतले. अनेक जन्मींची पुण्याई फळाला आली व असा सिद्धगुरू त्यांना भेटला. ही पवित्र गंगा जिथे जिथे गेली तिथे तिथे साऱ्यांना पावन केले व आपल्यात सामावून घेतले.

गुरु हा कल्पतरु, कामधेनू, चिंतामणी असा सहज अनुभव साऱ्यांना आणून दिला. ज्याचा जसा अधिकार, ज्याची जशी पुण्याई ते ते त्याला गुरुकृपेने प्राप्त झाले. तीन दिवसांचे छोटे शिबिर पण परिणाम केवढा मोठा! तो पहाटेचा ध्यानदीक्षेचा दिव्य सोहळा, ती चित्‌शक्तीची जागृत स्पंदने, ती हरेराम हरेकृष्ण ची स्फूर्तिदायक धून, मुक्त कंठांनी गाइलेली 'ज्योतसे ज्योत' ही आरती, महाप्रसाद, मुक्तेश्वरीच्या पारायणाच्या दिव्य लहरी, प. पू. स्वामींच्या प्रवचनांना लोटलेली अफाट गर्दी, जिज्ञासु साधकांच्या प्रश्नांना दिलेली समर्पक उत्तरे, आरती, धून, जयजयकार, प्रसाद, रात्री महिमानेश्वरी वाचन! सारे कार्यक्रम कसे प्रसन्न, शिस्तबद्ध, रोकडा अनुभव आणून देणारे, परतत्त्वाचा स्पर्श झालेले, गुरुभक्तीच्या दिव्यानंदात डुंबायला लावणारे! कोणताच साधक प. पू. स्वामींना विसरू शकत नाही. कारण स्वामींच्या प्रेमाचा स्पर्शच तसा दिव्य आहे. साधकाचा पुनर्जन्मच होतो जणू! ध्यान, गुरुगीता, गुरु ॐ मंत्रजप या गुरु-दर्शित मार्गाने वाटचाल सुरू होते त्याची! दिव्य अनुभव येऊ लागतात, कधीकधी साधनेत विघ्नेही येतात, कधी-कधी 'भेटीलागी जीवा लागलीसे आस' अशी आर्तता निर्माण होते, कधी प्रश्न निर्माण होतात, कधी प्रवचनातले शब्द न् शब्द आठवतात, कधी स्वामींचे दिव्य प्रेम आठवून ऊर भरून येतो, कधी गुरुऋण फेडण्यासाठी मन तळमळू लागते, कधी गुरुमाउलीच्या प्रेमळ पंखाखाली विसाव्याला यावेसे वाटते! कुठे नवीन केंद्रे सुरू होतात, गुरुमाउलीच्या परवानगीने धुमधडाक्यात कार्यक्रम पार पाडले जातात. स्वामींचे ग्रंथ, गुरुगीता, टाईप, यांची जोरात मागणी केली जाते. ज्याला त्याला मनातून वाटते मला स्वामींनी आपले म्हणावे! हे सारे व्यक्त करायला साधकाजवळ एकच माध्यम असते व ते म्हणजे पत्रलेखन! अशी शेकडो पत्रे परगावच्या साधकांनी प. पू. स्वामींना लिहून आपला भाव व्यक्त केला आहे. या साऱ्या पत्रात साधकांचे सारे भावविश्वच गुंफले गेले आहे! प. पू. स्वामींची थोरवी, त्यांच्याबद्दल वाटणारी अपार कृतज्ञता, आपल्याला लाभलेली महान गुरुपरंपरा, स्वामी साक्षात परब्रह्म आहेत ही पूर्ण जाणीव, ध्यानातील दिव्य अनुभवाबद्दल वाटणारे औत्सुक्य, साधकांच्या हातून घडणाऱ्या चुका व प. पू. स्वामींजवळ त्याची दिलखुलास कबुली, गुरुसेवेची, साधनेची संधी मिळाल्यामुळे झालेला आनंद, प. पू. स्वामींची पुस्तके व विशेषांक यांच्या द्वारा लाभलेले मार्गदर्शन व प्रेरणा, गुरुशरणागती, गुरुप्रसन्नता व गुरुसेवा याबद्दल सच्च्या साधकाची तळमळ, स्वामीवचनांवरील चिंतन इत्यादि मधुर भाव या पत्रांतून व्यक्त झालेले दिसतात. ही पत्रे साधी पत्रे नसून ती गुरुभक्तीयोगाची एक साधनाच झाली आहे.

नागपूरची भूमी अध्यात्मिक दृष्ट्या फार सुपीक आहे. तिथल्या साधकांची मनोभूमी अगोदरच तयार होती. त्यात फक्त बीज पडायचाच अवकाश होता. मग अंकुर फुटायला काय अवकाश? अशा या अनुकूल भूमीत प. पू. स्वामींचे सिद्धयोग ध्यानशिबिर अत्यंत उत्साहाने पार पडले. शेकडो साधकांनी ध्यानदीक्षा घेतली. अनुकूल भूमीत उत्तम बीज पेरले गेले, ते अंकुरले व त्याला धुमारेही फुटले. तेथे तावडतोब ध्यान-केंद्रही मोठ्या उपस्थितीत सुरू झाले. अनेक साधकांना उत्तम ध्यान लागू लागले. त्यातील एक विद्यार्थिनी पत्रात लिहिते—

"अभ्यास करताना पुस्तकांवर, वहीवर, प्रकाशाचे बिंदू पांढरे, लाल, निळ्या रंगाचे दिसतात. मध्ये एकदा रात्री ध्यानात कृष्णवर्ण व त्यात लाल रंगाची ज्योत दिसली. परवादेखील एक सेकंद निळ्या रंगाची ज्योत दिसली"

**स्मिता**

आता या दोन लहान मुलींचे ध्यानाचे अनुभव त्यांच्या आईच्या शब्दात व्यक्त झाले आहेत.

"पहिल्या दिवशी चि. प्रगती ध्यानास बसली. ध्यानात तिला खूप तेजःपुंज प्रकाश दिसला व त्यानंतर प. पू. ताई पूर्ण पांढऱ्या वेषात दिसल्या. चि. उन्नतीला पहिल्याच दिवशी ध्यानात प. पू. ताई मोग-ऱ्याच्या फुलात दिसल्या. त्यांचे अनुभव ऐकून आम्हाला फार आश्चर्य वाटले व धन्यही वाटले!"

आदेश व कु मनीषा बिलेकर या लहान बहीणभावंडांचे ध्यानाचे अनुभवही असेच आश्चर्यकारक आहेत. त्यांची आई लिहिते—

"प्रथमच चि. आदेश ध्यानाला बसला असताना त्याला प. पू. ताईंनी पांढऱ्या वेषात दर्शन दिले. दुसरे दिवशी गुरुदेवांच्या हातून त्याला हिऱ्याचा प्रसाद मिळाला. तिसऱ्या दिवशी पांढऱ्या निळ्या चांदण्या दिसल्या. चौथ्या दिवशी प. पू. ताईंनी त्याच्याबरोबर पेटी वाजविली. एक दिवस पंख्याच्या टोकावर चांदणी पडताना दिसली नंतर एक सोन्याची काडी दिसली व ती पोटात गेली. याचा अर्थ काय बरे असावा?" तसेच चि. मनीषाने ५-७-७९ ला ध्यानात सहजस्फूर्त पूजानृत्य केले. नंतर खाली वाकून एका नवजात गोड बाळाला उचलून एका पाळण्यात घातले. नंतर त्याच्या समोर नृत्य केले व खाली बसून धून गाताना प० पू० ताई

तिला कमळामध्ये भगव्या वेषात दिसल्या असे ती आपले अनुभव सांगते."

देशील सर्वच लहानमोठ्या साधकांना चांगले ध्यान लागते. पण त्याचे सारे श्रेय ते प. पू. स्वामींना देऊन मोकळे होतात. म्हणूनच त्यांच्या हातून चढती वाढती गुरुभक्ती होत राहते. एकाच्याऐवजी पाच ध्यानकेंद्रे चालविण्याचा मान नागपूरकरांनी मिळवला आहे. एका स्त्रीसाधकांनी आपले अनुभव या शब्दात मांडले आहेत.

"प्रतिदिनी ध्यानात अनेक मूर्तीचे दर्शन होते. सर्व देवदेवता अलंकारमंडित दिसतात. त्यांच्या डोळ्यांत धवलप्रकाश दिसतो. तसेच रक्त, श्वेत, कृष्ण प्रकाशही दिसतो. नील नक्षत्रही दिसते. कधीकधी उग्र मूर्तीचे दर्शन होते. कधी अथांग निळे पाणी व त्यात काळे पांढरे सर्प वळवळ करतात. मधूनच गुरुमाउलींचे रमणीय दर्शन होते व त्यांच्या नेत्रातून धवल प्रकाशाचे शीतल्या स्रोत माझ्यावर फेकले जातात."

**सौ. मांढरे**

ध्यानाविषयी एक साधक मार्गदर्शन इच्छितात. ते लिहितात—

"ध्यानाचे शेवटी निरनिराळे प्रकाश दिसतात. प्रामुख्याने निळा प्रकाश दिसतो व नंतर गाढ झोप लागते. तरी याविषयी कृपया मार्गदर्शन व्हावे."

**श्री. मांढरे**

नासिक, पुणे, हैद्राबाद, गुलबर्गा, गाणगापूर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, वाई, किर्लोस्करवाडी, वगैरे ठिकाणीही यशस्वी शिबिरे झाली. नासिक, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, पुणे, किर्लोस्करवाडी इ. ठिकाणी ध्यानकेंद्रेही स्थापन झाली. ही ध्यानकेंद्रेही चांगली चालली आहेत. तेथेही साधकांना ध्यानाचे चांगले अनुभव येत आहेत. नासिकहून एक साधिका आपले ध्यानाचे अनुभव प. पू. स्वामींना सांगताना लिहिते—

"दि. १५ को आप पूज्य बाबा के रूप में आये और मुझे संदेश दिया। दूसरे दिन वही दर्शन। गुरुदेव, आपकी लीलाका पार नहीं। अनेक रूपोंमें आकर मुझे दर्शन देते रहते है। सचमुच आप बहुरूपिया हैं। आप बाबा के रूपमें आये और इस प्रकार संदेश दिया।" "ताईकी बहुत सेवा करो। उनकी गुरुभक्ती से मैं बहुत प्रसन्न हूं। गुरुसेवा बहुत करो। गुरु, सेवासे प्रसन्न होता है। ताईकी जितनी भी मराठी भाषामें किताबें हैं, सबका अनुवाद करना।"

**कल्पना**

तीच साधिका आपला शुद्ध भाव मराठीत व्यक्त करताना लिहिते "आई, आजचा दिवस माझ्या जीवनातला महान भाग्याचा दिवस आहे. आई, काल रात्री तू ध्यानात आली आणि सांगितले, "मी तुझ्याकडे येणार. शिऱ्याचा नैवेद्य कर. सगळं घर स्वच्छ कर. आई, तू माझी झोपडी पावन केलीस. खरोखर मी फार भाग्यवान आहे. तू नैवेद्याचा शिरा पण ग्रहण केलास. आई, तुझे गुणानुवादन मी कसे करू? काल ध्यानातली ती भरजरी साडी, झगझगणारे अलंकार, हातात गदा, ते वाहन! काय ते सौंदर्य! मी चकितच झाले."

जिने नुकतीच ध्यानदीक्षा घेतली आहे अशी एक कॉलेज कन्या पत्रात लिहिते, "आजकाल ध्यानात श्वासोच्छ्वास जोरात चालतो. तो चालू असतांना व संपल्यावर शरीर हलके वाटते. शरीराजवळच्या हवेत सुखद गारवा वाटतो. जळून गेलेल्या उदबत्तीचा विरून गेलेला सुगंध पुन्हा तीव्रतेने नाकाला जाणवतो. एकंदरीत फार छान वाटते. दगडाधोंड्यातून पण सुरेख गार पाण्यातून चालल्यासारखे वाटते."

**कु. जोत्स्ना**

याप्रमाणे लहानमोठ्या सर्व साधकांना ध्यानाच्या वेळी प. पू. स्वामींच्या दिव्य शक्तीचा अनुभव येत असतो.

कधीकधी परगावचे साधक साधनेसाठी आश्रमात थोड्या दिवसासाठी येऊन राहतात. आश्रमातल्या वास्तव्यामधल्या गोड आठवणी बरोबर घेऊन घरी जातात व प. पू. स्वामींना पत्र पाठवून त्याच गोड आठवणींची उजळणी करतात. प. पू. स्वामींची प्रवचने म्हणजे ब्रह्मरसाची मेजवानीच! त्यांची ती अमृतमय वाणी कानात पुनःपुन्हा गुंजते. अशीच परगावची एक साधिका त्याबद्दल लिहिते. "शिवयोग खूप आवडला. सर्व सारांचे सार आम्हाला आमच्या गुरुमाउलींनी दिल्यावर दुसरे काही कळण्याची आवश्यकताच वाटत नाही. एक 'गुरुक्षम' कळला की झाले."

**सौ. निर्मला कुंदे**

आश्रमातून घरी गेल्यावर प. पू. स्वामींच्या प्रवचनांची वही उघडली तरी, किती तरी गोष्टींचा उलगडा होतो. एक साधिका लिहिते, "आज प्रवचनांची वही उघडली मात्र! काय आश्चर्य! माझ्या शंकांचे निरसन करायला साक्षात् गुरुमाउली आली की काय असे मला क्षणभर वाटले."

प. पू. स्वामींपासून दूर राहत असल्याने वारंवार श्रवण घडत नाही याचे काही साधकांना वाईट वाटते. एक साधक लिहितात, "आपल्या प्रवचनांचे श्रवण घडायला हवे असे फार फार वाटते. त्याशिवाय प्रगती होणार नाही. वृत्ती वासनांकडून आपल्या चरणी लागली पाहिजे. ती फार थोडा वेळ टिकते."

प. पू. स्वामींची ज्ञानेश्वरीवरील रसाळ व स्वानुभवपूर्ण प्रवचने ऐकून सारेच श्रोते प्रभावित होतात. एका रविवारी ज्ञानेश्वरीच्या प्रवचनाने मंत्रमुग्ध झालेल्या एक साधिका लिहितात, "गेल्या रविवारी ज्ञानेश्वरीच्या प्रवचनाच्या वेळी प. पू. गुरुमाउली प्रत्यक्ष ज्ञानेश्वरमहाराजच झाल्या आहेत की काय असा भास होत होता. षट्चक्रांचा निनाद वर्णन करताना खरा बहर आला होता. योगसुखाचे सोहळे किती आल्हाद-दायक! आमच्या गुरुमाउलीच्या मुखातून ज्ञानेश्वरी श्रवण करतांना ती प्रत्यक्ष अनुभवता येते."

**सौ. निर्मला कुंदे**

"नासिकहून एक साधिका लिहितात"

"प. पू. गुरुदेवांची वाणी म्हणजे साक्षात् परमेश्वराचीच वाणी. त्यांची प्रवचने मनाला सरोवर चटका लावतात. दुसरे कोणतेही प्रवचन त्यांच्या दैवी प्रवचनांपुढे फिके वाटते"

**सौ. पाटेकर**

"गुरु दोषांच्या सनदा फाडितो।" हा स्वतःच्या बाबतीत आलेला अनुभव एका साधिकेने मनमोकळेपणाने आपल्या पत्रात प. पू. गुरुदेवां-जवळ व्यक्त केला आहे. त्या पत्र लिहिताना म्हणतात" मेरे गुरु महान।

याचा खराखुरा अनुभव मला आला. काही काही प्रसंग आपणच घडवून आणलेत. माझ्या मनातील तिरस्कार, राग हे अतिशय वाईट दोष आपणच बाळवून टाकलेत. आणि काल पहाटेपासून प्रत्येक वस्तु व व्यक्ती यात गुरुदेवांचाच अंश आहे, तेव्हा त्यांचा अपमान माझ्याकडून न व्हावा याची खबरदारी मी घेतली पाहिजे असे माझ्या लक्षात आले."

**सौ. किर्लोस्कर**

आश्रमातील आपले वास्तव्य कसे मंगलप्रद व साधनेला पोषक झाले, प. पू. गुरुदेवांच्या अलौकिक गुणांचा ठसा अंतःकरणावर कसा उमटला, आश्रमातील शिस्त व प्रेम कसे अनुभवास आले याचे वर्णन काही बोलकी पत्रे आहेत. एक साधक लिहितात, "श्रीगुरुदेव ध्यान-मंदिरातील मंगल व पवित्र वातावरणात गुरुकृपेने वास्तव्य करण्याचा जो सुयोग प्राप्त झाला त्याचे पुण्यस्मरण हा आमच्या जीवनातील एक अमोल ठेवा म्हणूनच जतन करून ठेवू."

**श्री. भागवत**

'तपस्या सप्ताहाला' हजर असलेल्या एक साधिका मनमोकळेपणाने लिहितात,

"आमच्या उमानंद सरस्वती आहेत कशा ! शिडी न वापरता येथे सारे सहज सिद्ध होते ! सर्व आश्रमबंधूभगिनी कामात तत्पर आहेत त्याचे कारण आपली शिस्त, आदरयुक्त वाटणारी ओढ, काम करून घेण्याची हातोटी. त्यामुळे कुठेही गडबड न होता पहाटेपासून रात्रीपर्यंत सारे कार्यक्रम पटापट, शिस्तीत व हसत खेळत होतात. प्रत्येकाचे योग्य मूल्यमापन आपल्या दरबारात होते. तो किती पगाराचा या केवढ्या हुद्याचा हा विचार तेथे न होता त्याच्या अंतःकरणाची संपत्ती किती आहे यावर होते. आपण त्याला खरेखुरे प्रेम देता. आपल्या दाराशी येणारा अगतिक होऊन येतो पण परत जाताना सुखसंपन्न होऊन जातो."

**सौ. शशिकला**

प. पू. स्वामींकडून ध्यानदीक्षा तर घेतली. पण त्यांना वारंवार भेटता येणे शक्य नसते. मग प. पू. स्वामींचे सारे अध्यात्मिक ग्रंथ व श्रीकुसुमेश्वरी विशेषांक साधकाच्या मदतीला येतात. साऱ्या प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळतात. आत्मानंदाची अनुभूती आणून देणारे हे सारे ग्रंथ (गुरुगीतार्थेश्वरी, स्मरणेश्वरी, महिमानेश्वरी, बोधेश्वरी इ०) सिद्धयोगाच्या साधकाचे जिव्हाळ्याचे सोबती आहेत. त्याबद्दलची खालील पत्रे साधकांच्या अंतःकरणाचा भाव प्रगट करतात.

"श्रीकुसुमेश्वरी विशेषांक इतका आवडला की अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचले ! प. पू. श्रीमुक्तानंदांचा शुभाशीर्वाद, आपले नम्र निवेदन, प्रत्येक पानाखाली बोधवचने, श्रीमुक्तानंदेश्वरी हे आपले गोड काव्य, इतर भक्तांची मनोगते, ध्यानाचे अनुभव, लेख, रंगी फटाके वगैरे सर्वच उत्तम आहे. आपले कितीही कौतुक केले तरी समाधान वाटत नाही."

**सौ. जोगळेकर**

"Reading the book श्रीकुसुमेश्वरी विशेषांक" is a blissful satsang, a fine walk on Guru Path, the first as well as the last step to Shiv Path

Your own words and writng reflect the mystic and vibrating divinity of Jnaneshwari, your mastery of which was often highly appreciated before me by Paramhans Swami Muktanand"

**Justice, Shri G. N. Vaidya**

ठिकठिकाणी स्थापन केलेल्या ध्यानकेंद्रांचे कार्य कसे चालते याविषयी आलेले हे सविस्तरपत्र आपणांस प. पू. स्वामींच्या महान कार्याची सहज ओळख करून देते.

(श्री. भागवतांचे पत्र)

ॐ श्रीगुरुदेव

॥ स्वामी उमानंद सरस्वती प्रसन्न ॥

श्रीगुरुदेव ध्यान मंदिर—नागपूर शाखा.
दिनांक २२–८–७९

प० पू० श्रीगुरुदेवांच्या चरणकमळी

सप्रेम, साष्टांग, सविनय दंडवत—

आपले कृपापत्र पावले. अपार आनंद झाला. केंद्रातील उपस्थित सर्व साधकांना ते वाचून दाखविले. दि. १ ऑगस्टच्या लोकसत्तेत आलेली जाहीर घोषणा व लगोलग आश्रमातून आलेले आपले (गुरुभगिनी प्रिय जीजींचे) पत्र पाहताच अगदी तंतोतंत तसाच कार्यक्रम आपल्या आज्ञेनुसार नागपूर केंद्रात संपन्न झाला. सर्व केंद्रांचा एकाच ठिकाणी श्री फाटक यांच्या घरी असलेल्या मुख्य केंद्रातच हा कार्यक्रम घेतला.

घेतलेल्या कार्यक्रमाची सूचि—

१. पहाटे ५ ते ६—ध्यान, श्रीगुरुगीतापठण.

२. प्रातः ६ ते सायं. ६ 'हरे राम हरे कृष्ण' ही अखण्ड धून, श्रीगुरुदेवांच्या नेहमीप्रमाणे आरत्या–जयजयकार.

३. संध्याकाळी ६ ते ७ गोकुळाष्टमी सोहळा–बाळकृष्णाचा पाळणा, दहीहंडी व गोपाळकाला–वितरण.

१४ ऑगस्टपासूनच आपापले व्यवसाय–कामे सांभाळून कार्यक्रमाची तयारी करण्यासाठी सर्वश्री वाडेकर, देसाई, फाटक, मांढरे, लोपकर, जोशी व भागवत परिवार मुख्य केंद्रात एकत्रित झाले. श्रीगुरु परंपरेतील प्रतिमांची (फोटोंची) सुयोग्य–आकर्षक मांडणी–सजावट–फुलांचे हार करणे इ. कार्य रात्रीच झोपण्यापूर्वी पूर्ण केले. वरीलपैकी काही परिवारांनी (वाडेकर + देसाई + भागवत) रात्रीच मुख्यकेंद्रातच मुक्काम केला. इतर साधक परिवार दुसरे दिवशी (१५ ऑ.) पहाटेपासूनच कार्यक्रमात भाग घेण्यासाठी ४–३० पासून आले.

सकाळी ठीक ४–३० पासून मुख्य केंद्रातील सर्व साधक गुरुभक्तमंडळी स्नानादि आटोपून ध्यानास बसले. श्री. वाडेकर यांनी पीतांबर नेसून श्री गुरुदेवांच्या प्रतिमांचे पूजन केले–आरती झाली. सकाळी ५ ते ६ पर्यंत ध्यानानंतर श्रीगुरुगीतापठण झाले. या कार्यक्रमास लहानमोठे मिळून तीस एक साधकबंधूभगिनी उपस्थित होते. अगदी ६ वाजता 'हरे राम–हरे कृष्ण' ही धून तबला–पेटी–तंबोरा–टाळ यांच्या संगीतवाद्यांच्या साथीसह सुरू झाली. चि विजय फाटक, अमृत, श्री. देसाई, श्री. फडणीस यांनी आळीपाळीने अधूनमधून वाद्य वाजविण्यात भाग घेतला. धूनमध्ये भाग घेणाऱ्यांचा प्रत्येकी तीन तासास एक गट निश्चित

## साथीगृहिणी



(१) १९५८ (२) १९६२ (३) १९६८ (४) १९७०

गुरुकृपेने बने योगिनी



(१) १९७२ (२) १९७३ (३) १९७४ (४) १९७५

केला होता. या गटाशिवाय इतर साधकही आपापली कामे सांभाळून धून म्हणण्यास बसत असत.

प. पू. श्रीगुरुदेवांसाठी स्वतंत्र सोफाचेअरवर आसन सुशोभित करून त्यावर ते स्थानापन्न झाले होते. नागपुरातील सर्व पाच केंद्रातील केंद्रचालक, त्यांचे परिवार व त्या त्या केंद्रांत येणाऱ्या अन्य नव्या-जुन्या साधक गुरुभक्त बंधुभगिनींनी अखंड धूनमध्ये मोठ्या उत्साहाने भाग घेतला. जसजसा माध्यान्हीनंतर घड्याळाचा काटा पुढे पुढे सरकू लागला तसतसा अखंड रामकृष्ण धूनमध्ये अखंड रंग नादब्रह्मानंदात भरू लागला. म्हणणारे सारे जणु शब्दनादब्रह्मात (नंदात) स्वतःला विसरून गेले.

दुपारी तीननंतर साधक भक्तिकांची गर्दी वाढू लागली मोठ्याबरोबर बाळ साधकही बरेच आले होते. दुपारी चार वाजून पाच मि. नी. अखंड धून सुरू असतानाच चि. मनिषा बेलेकर हिला ध्यानक्रिया सुरू झाल्या. विशेष म्हणजे हिने दीक्षा घेतली नसताना केवळ दीक्षा घेतलेल्या साधक गुरुबंधुभगिनींबरोबर साधनेला बसून ही ध्यान प्रक्रिया सुरू झाली. श्री. लोपकर यांची ही भाची. त्यांच्याच घरी आईबरोबर ही भावंडे स्वाध्याय-सत्संगासाठी जात असतात. त्याचाच हा सुपरिणाम. ध्यानातच तिने उभे राहून शास्त्रीय कथ्थक नृत्य सुरू केले. नृत्याभिनयातच या बालसाधिकेने (वय वर्षे १५, धंदा १२ वीत आहे.) प०पू० श्रीगुरुदेवांची संपूर्ण पूजा मूक पूजा–नृत्यात केली. चरणांवर नतमस्तक होऊन आरतीच्या नृत्याभिनयानंतर तिने नाग–नृत्य, महिषासूर मर्दिनी, तांडव इत्यादि विविध नृत्य प्रकार ध्यानात असतानाच साकार केले. तिच्या सर्व actions अतिशय रेखीव sharp व soft मृदुमधूर आकर्षक प्रतीत होत होत्या. तिची अर्धोन्मिलीत तर कधी–क्रुद्ध (तांडव इ०) दृष्टी व नृत्यातील अत्यंत कठीण मुद्राभिनय तिने अत्यंत सहजतेने व समर्थपणे प्रगट केले. उपस्थित सर्वजण साश्चर्य मंत्रमुग्ध होऊन एक टक पाहत होते. तिचे नृत्य सुरु असतांनाच अखंड धूनला अधिकच धार आली. व परिणामतः अनेक आबाल वृद्ध स्त्री–पुरुषांना ध्यानक्रिया सुरू झाल्या. त्यात विशेषतः गुरुभगिनी सौ. मांढरे, सौ. विजयाताई गडकरी (महाल केंद्र), सौ. वाडेकर, कु. चित्रा फाटक व चि. मनिषा बेलेकरची आई –त्यांच्या भस्त्रिका, हुंकार, डोलणे, टाळ्या वाजविणे इ० क्रिया होत असतानाच चि० चित्राचे ध्यान अनिवार झाले, व चि० आशीष बेलेकर (कु० मनिषाचा धाकटा भाऊ) अत्यंत सुमधुर स्वरात व सुरेल आवाजात गुरु ॐ मंत्र आलाप ताना घेऊन गाऊ लागला. त्याचे हे स्वर्गीय शास्त्रीय संगीत सुरु होताच सर्वांचे लक्ष तिकडे वेधले. सर्व उपस्थित गुरुभक्त साधक देहभान विसरून श्रीगुरुकृपेने (ब्रह्म) आनंदसागरात पोहत होते. बहिणीचे शास्त्रोक्त नृत्य, भावाचे शास्त्रीय संगीतातील गुरु ॐ गान सुरू असताच ध्यानातच मनिषाने आपल्या भावाजवळ जाऊन अत्यंत प्रेमभराने त्याला गोंजारले, लडिवाळपणे त्याच्या पाठीवरून, हात फिरवून त्याला सांत्वना देऊ लागली. इतक्यात चि. चित्रा (फाटक) च्या डोळ्यातून अश्रूपात सुरू होऊन ती जोरजोराने रडू लागली, वेणी सुटून तेही, वेगाने डोके हलवित असल्याने विसकटून केस सैरभैर होऊ लागले असता नृत्याचे दैवपाद पदन्यास करीत ही मनिषा तिच्याजवळ (चित्रा) जाऊन तिचे डोळे पुसून सांत्वन करू लागली असतांनाचे दृश्य तर अत्यंत हृदय हलवून सोडणारे होते. अनेकांचे उर भरून आले. कंठ दाटून आले. हुंदके ऐकू येऊ लागले. आनंदाश्रूंना अनेकांनी वाट मोकळी करून दिली. गुरुभक्तिभावाचे उमाळे भरभरून येत असतांना दिसत होते. गुरु ॐ चे रागदारीतील आलाप ताना सुरूच होत्या. अनेकजण आणखी ध्यानावस्थेत जाऊ लागले. काहींना विविध अनिवार क्रिया होऊ लागल्या. काही जमिनीवर लोळण घेऊ लागले. क्षणभर आम्हाला काही सुचेना. सारखा मनातून श्रीगुरुदेवांचा धावा सुरू होता. मध्येच कुणीतरी शंखनाद सुरू केला. शेवटी प. पू. श्री गुरुदेवांच्या फोटोवरील व चरणावरील गुलाब पुष्पे अनिवार ध्यान लागलेल्यांना हुंगण्यास दिले व मग हळूहळू सर्व Normal वर आले. श्रीगुरुदेवांच्या जयजयकारात कार्यक्रमाच्या पुढील चरणास आरंभ झाला.

गुरुबंधु श्री. वाडेकर यांनी चित्‌शक्तिविलासमधील प. पू. बाबांना आलेले त्यांच्या दिव्य–दीक्षा–दिनाच्या सोहळ्या संबंधीचे अनुभव उपस्थितांपुढे वाचून दाखविले. त्यानंतर श्री. लोपकरांचा भाचा चि. स्वप्नील झाला श्री. बाळकृष्णाची भूमिका देऊन तो त्याच्या धोड्या मोठ्या भावाच्या–चि. अक्षयच्या–(पेंद्याची भूमिका) पाठीवर उभे राहून वर टांगलेल्या हंडीचा वेध घेऊन त्याने फोडली व दहिहंडीचा कार्यक्रम संपन्न झाला. सर्वप्रथम जमलेल्या बाळगोपाळांच्या मुखात गोपालकाला घातला. लगेच सौ. शालिनीताई फाटकांनी गोपाळकृष्णाचा पाळणा गाइला. श्रीगुरुदेवांच्या आरत्या झाल्या. सर्व उपस्थितांचे स्वागत–सम्मान करून या आनंदसोहळ्यात सहकार्य दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. श्रीगुरुदेवांच्या अनुज्ञेने नागपुरात कार्यरत असणाऱ्या ध्यानकेंद्र तसेच केन्द्रचालकांविषयी माहिती दिली. प. पू. गुरुदेवांच्या दिव्य लेखणीतून उतरलेल्या व नुकत्याच प्रकाशित झालेल्या श्रीगुरुचरित्र चोवेश्वरी भाग १/२ या ग्रंथाविषयी माहिती देऊन ग्रंथ विक्रीसाठी ठेवलेली सवलतीची योजनाही समजाऊन सांगण्यात आली.

वृत्तपत्रातून या व इतर कार्यक्रमांची माहिती वेळोवेळी देऊन त्याची कात्रणे व्यवस्थित ठेवण्यात येतात. या पत्रासोबत आपल्या माहितीसाठी सादर करीत आहे. कार्यक्रम वृत्तपत्रात आल्यामुळे अनेक जिज्ञासू व नवीन भाविकही विशेषतः भगिनीवर्ग या कार्यक्रमाला उपस्थित होता. साधारण दोनशे साधक होते. कारण मुख्य हॉल भरून शिवाय त्याला लागून असलेल्या हॉलमध्येही लोक बसले होते. सर्वच कार्यक्रम पाहत-ऐकत अनुभवत असताना श्रोत्यांची काया रोमांचित, पुलकित झाली. गोपालकाला वाटल्यानंतर भारावलेल्या अंतःकरणाने सर्व आपापल्या घरी गेले. त्यातील काहीजण बऱ्याच वेळपर्यंत ध्यानमंदिरातच रेंगाळतांना दिसले. सर्व वातावरण श्री गुरुदेवांच्या कृपेने charge झाले होते. धून व आरतीच्यावेळी तर प्रचंड प्रमाणात vibrations जाणवत होत्या. ही सर्व आपलीच कृपा. श्री. फाटक यांचा हा गृहस्थ-आश्रम असला तरी यावेळी मात्र श्रीगुरुदेवाश्रमच झाला होता असा अनुभव अनेकांना आला.

प. पू. गुरुदेवांनी ही अखंड धूनची साधना नागपूर साधकाकडून करवून घेऊन एक प्रकारचे तापसत्र घडविले. अन्यथा इतकी मोठी seating होणे नाही. आपल्याकडूनच सतत शक्ती पुरवठा होत असल्यामुळेच हे सर्व शक्य होऊ शकले—व शकते—त्यामुळे श्रीगुरुकृपेवर आम्हा सर्वांचा आत्मविश्वास व श्रीगुरुचरणी दृढविश्वास आणखीनच वाढला. नागपूर साधकावर आपली कृपादृष्टी अखंड असू द्यावी. यावर्षी व यापूर्वी येथे सुरु झालेल्या ध्यानकेंद्रातील श्रीगुरुकार्य वाढतेवाढते होण्यास श्रीगुरुदेवांनी शक्ती, प्रेरणा अखंड देत रहावी. येथील साधकांनी सिद्धयोगध्यान–मार्गाला लागून त्यांचे ध्यान उत्तरोत्तर विकसित व्हावे—श्रीगुरुदेवांची सेवा नेहमी आमच्या हातून होत रहावी ही

आपल्या पवित्र पदकमली विनम्र प्रार्थना. आपले कृपाशीर्वाद आमच्या पाठीशी नेहमी राहावे. आमच्या हातून अनावधानपणे—जाणता अजाणता होणाऱ्या उणिवा—चुका अपराध पोटात घालून आम्हाला क्षमा करावी हीच आपल्या चरणी अति नम्र प्रार्थना आहे. मधून-मधून मार्गदर्शनपर पत्राने आम्हाला अधिक उत्तेजन प्रोत्साहन मिळते ते येत राहीलच हा दृढविश्वास आहे. तत्रस्थ सर्व गुरुबंधुभगिनींस सप्रेम श्रीगुरुस्मरणम्। शेष गुरुकृपा.

श्रीगुरुचरणांकित सेवक
भागवत

Swami Chinmayanand who is a great teacher of Vedanta and is well known for his brilliant discourses on the Bhagwad Geeta, played an important role in shaping the spiritual life of Swami Umanand Saraswati. Even in those early years of her spiritual life, Swami Chinmayanand found in Mrs. Kusum Sharma (as Swami Umanand was then called) great potentialities. He always encouraged her in her spiritual pursuits.

Fifteen years ago, i.e. in 1964, Swami Umanand first started a class for the study of Vedanta. About this, Shri Ram Batra, Gen. Secretary of the Chinmaya Mission, writes in his letter dated 30-9-1964:

"Respected Swamiji also went through your letter dated 8th September 1964 and was very pleased with the good work that you are doing and suggested that you should continue the same and as such your Centre will be recognised as a Mission Centre for the classes that you are conducting."

Swami Umanand translated the discourses of Swami Chinmayanand on the 18th Chapter of the Geeta into Marathi and sent the translation to Swamiji for his approval. About this, Swamiji wrote —

"Met the man who looked into the Marathi Manuscript on Geeta. His opinion is that it is very good, has caught the spirit.

"She may be allowed to get it printed if she wants."

Swamiji encouraged Swami Umanand to translate the discourses on the other chapters of the Geeta into Marathi and she actually did so.

Swamiji was all praise for her mastery over the English and Marathi languages. He has expressed his admiration in many of his letters. In his letter dated 15-2-65, Swamiji writes:

"You are indeed a good writer in Marathi but you have taken the wind away from me when I realised that you are a fluent poet even in English. It is perfct and beautiful. I am publishing it in Tapovan Prasad."

And here is an extract from Swamiji's letter dated 2-12-65:

"How sweet of you to have written and how divinely noble your heart is to write what you wrote! Beautiful thoughts so finely expressed in such a liquid style which has a brilliant flow."

Everybody who reads the books of Swami Umanand is struck by the force and fervour of her writing. Swami Chinmayanand writes in his letter dated 21-12-67:

"Your letter of the 14th and it is, as usual, masterly written with a dash and fervour. I like reading your letters. They are my friends."

Even in those early years (1964, 1965), Swami Umanand had mastered the philosophy of the Geeta. Swamiji writes in his letter of 23-9-65:

"Your kind letter dated 17-9-65 gives me a clear picture of your mind that is choked with the knowledge of the Geeta. Now make this knowledge a subjective realization. Hear the Geeta truths from within. Live the Geeta ideals in your own emotional and intellectual life. The rest of the transformations will take place of their own accord."

Swami Chinmayanand encouraged Swami Umanand in the study of Vedanta but always stressed that the ultimate goal should be Self Realisation. In his letter dated 17-2-67, Swamiji writes:

"Always remember all study, all prayers, reflections, discussions, thinking, nay even meditations are all attempts—means to reach the Goal: actual first-hand intimate experience: the Becoming Itself. Stop not till the Goal is reached."

As we know Swami Umanand reached the Goal by her single minded devotion for her Guru, unceasing Guru Seva and severe Tapasya. Swami Chinmayanand writes in his letter of 12-3-68:

"That is it. You have got it. Now nurture it and nourish it. Get established in it through what you call Guru Karma."

When Swamiji came to know from Swami Umananda that she had been initiated by Swami Muktananda Paramahansa, in Siddha Yoga, he said to her, "You are really very fortunate! God is simply showering blessings on you."

इंग्लिश 'गुरुगीतार्थेश्वरी' वाचून हुबळीचे श्री. मणी यांनी मनात आलेले विचार मोठ्या मनमोकळेपणाने आपल्या १९-७-१९७५ च्या पत्रात प्रगट केलेले आहेत. गुरुगीतार्थेश्वरीचे हे एक भक्तिपूर्ण रसिकतेने केलेले सुंदर रसग्रहणच होय! आणि पत्राच्या शेवटी प. पू. ताईंची

अध्यात्मिक श्रेष्ठता व्यक्त करतांना Spiritual Mother असा मोठा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

From : K. S. Mani, B.A., B.L.,
C/o T. R. Pattabhiraman,
UBL 113, Kesavapur Road, Hubli.

10-7-75 Aum Hubli

Dear Mother

I enjoyed reading your translation of Shree Gurugeethartheshwaree. It is more than a mere translation. So I offer my affectionate regard and respect to your Divine personality peeping as spiritual light through many original passages of intuitive experiences beautifully expressed in most apt language. This adds to the value of proper and better understanding of the text.

Dear Mother, please remember me in your prayers to Our Mother.

Yours
Sd. K. S. Mani

*P. S.* : Words are not available to express the type of feeling one wants to express towards a spiritual Mother and so I have left it as . . .

Sd. K. S. Mani

After she met her Gurudev, Swami Muktananda Paramahansa, Swami Umananda started having divine experiences which she communicated to Swami Muktananda through **Amma. Amma** writes in her letter dated 29-3-72 :

". . . All your experiences are really wonderful and unique. Not only that but even supported by Scriptures."

"Our Gurudev says that you have received

अंतर क्षेत्र संन्यास दीक्षा

These words are self-explanatory. We are indeed very fortunate to be able to sit at the feet of such a Guru and have divine knowledge from her !

*

गुरुकृपेनेच सर्व साध्य होते. प्रारब्ध फक्त गुरुच मिटवू शकतो.

*

फलासक्ती म्हणजे भविष्यकालाची आसक्ती. गुरुकरता कार्य केले की कर्मफलाचे बंधन नाही. कर्माचा कायदा अति गहन. फक्त नियतीलाच माहीत. नियतीच्या कर्मफळात देखील रद्दलबदल होत असतो. 'दैव देते नि कर्म नेते."
कर्म तेच पण हेतू निराळा तर फळ भिन्न भिन्न !

*

मोठमोठ्यांचे देखील भ्रष्टचित्त होते. चित्ताला जपले पाहिजे. जडाशी जडलेला अहंकार नको.

*

गुरुभक्तीत अलगपणा नको. गुरुभक्तांच्या जीवनातील उणीव भरून काढतो. जसं पाणी खड्डा भरून पुढे प्रवाहित होते.

*

गुरुभक्तीत प्रत्येक घटनेला अर्थ असतो. गुरुला सर्वांचीच काळजी. दुष्टांचाही उद्धारच करावयाचा. विंचवाची नांगी विष ओकीत राहून ती निर्विष झाली पाहिजे. मगच त्याचा उद्धार होईल. दुर्जनांची शुद्धी होईल केव्हा? सर्व निचरा झाल्याशिवाय नाही.

*

# सत्संगीच्या डायरीतील काही पाने

"नागपूरकरांची पत्रे दाखवून परम पूज्य बाबा परम पूज्य ताईंना म्हणाले की 'समोर उभी उदो ! गजर होतो, पण मागे काय होते, काय बोलतात, तेही तुला कळले पाहिजे. साधूला सर्व सहन करावे लागते. चिठ्ठी फेकली तरीही." हा मजकूर एका डायरीत वाचला. कुतूहल निर्माण झाले. अनेक डायऱ्या चाळल्या. त्यात समाजाकडून परम पूज्य ताईंच्या झालेल्या छळाचे, अपमानाचे, उपेक्षेचे इतकेच नव्हे तर ज्यांच्यावर त्यांनी आपली विशेष कृपा ओतली, शक्ती खर्ची घातली अशा काही साधक भक्तांच्या कृतघ्नतेचे प्रसंग–घटना वाचण्यात आल्या. परमपूज्य ताईंच्या जीवनाची, चरित्राची ही बाजू प्रकाशात आली तरच सर्वच भक्तांना, उत्सुक वाचकांना परम पूज्य ताईंच्या असामान्य भोळेपणाची, असाधारण उदार अंतःकरणाची नि अलौकिकत्वाची खरी ओळख पटेल. म्हणून ही डायरीतील काही पाने.

परम पूज्य ताईंचा जितका उदो उदो झाला, होतो आहे, तितकाच त्यांना छळही सोसावा लागला आहे. कित्येकांनी त्यांच्या मार्गात मऊ मऊ रेशमी पायघड्या घातल्या तर काहींनी काटेही पसरले आहेत. अस्तनीतील निखारेही ठरले काही. या सर्व छळाला परम पूज्य ताईंनी कसं धैर्याने तोंड दिले, त्या सर्व अग्निदिव्यातून अधिक उजळून त्या कशा बाहेर पडल्या हाहि एक इतिहास आहे.

परम पूज्य ताईंच्या कार्याचा 'श्रीगणेशा' झाला 'यशोधन'मध्ये त्यांच्या छळाचीही सुरुवात तेथेच झाली, निनावी पत्रांनी. यशोधन म्हणजे ऑफिसर्स कार्टर्सच. या ऑफिसर्स जगतात ब्रिटिशसत्तेपासून चालत आलेल्या सोशल लाईफ नि प्रतिष्ठेच्या कल्पना रूढ. त्या विश्वाच्या इभ्रतीला नि प्रतिष्ठेला परम पूज्य ताईंचे मुक्तानंदबाबांच्याकडे जाणे मानवले नसावे. गुरुगुणगान, गुरूचा जयजयकार त्या नॉश वातावरणाची शान बिघडवू लागला. गुरु करणे म्हणजे बुवाबाजीला प्रोत्साहन देणे असे त्यांना अज्ञानामुळे नि अपुऱ्या माहितीमुळे वाटत असावे. काही ऑफिसर्सनी तर ताईंना स्पष्टच सांगितले, "तुमची ज्ञानेश्वरीवरील प्रवचने आवडतात. पण तुमचे हे गुरु, गुरु करणे आवडत नाही. बंद करा हे." पण ताईंनी हे 'गुरु व्रत' काही अंधतेने घेतले नव्हते. ज्या गुरुरायाची त्या आज अनेकवर्षे वाट पहात होत्या तो गुरुराया भेटल्यावर तर त्यांच्या जीवनाला नवा अर्थ आला. मग त्या या ऑफिसरणींच्या निरर्थक विरोधाला, सूचनांना दाद कशी देणार ! त्यांच्या अध्यात्माचा सूर बदलला तसा आभूषे चाही नूर बदलला. उंची रेशमी फुलपांखरी रंगांच्या साड्यांची जागा पांढऱ्या साडीने पटकावली. सोन्याभोत्यांच्या दागिन्या-ऐवजी गळ्यात, हातात रुद्राक्षाच्या माळा रुळू लागल्या. तारुणीच्या तामवर्णी विश्वात ही श्वेतकमला, रुद्राक्षभूषिता विरागिणी मीरा कशी काय शोभणार ! ही सात्त्विकतेची मूर्ती त्या राजस–तामस विश्वाला दिपवू लागली, खुपू लागली नि अखेर निनावी पत्रांचा आधार घेऊन ताईंच्यावर दुगे हल्ले सुरू झाले. मनातील मळ या पत्रात ओकले जाऊ लागले. वाटेल ते लिहिलेले असे "ढोंगे बुवाबाजी चालते, ढोंगीपणा आहे सर्व. कोणीही जाऊ नये." इ. इ. ताईंच्या शुद्ध चारित्र्यावरही शिंतोडे उडवायला कमी केले नाही या निनावी पत्रांनी. या निनावी पत्रांचा प्रवेशही चोरट्या मार्गानेच. दाराखालून सरकवलेली असायची ही पत्रे. ताईंना फार मानसिक ताण सहन करावा लागला. अतिशय त्रास झाला. परम पूज्य ताई ज्यावेळी चिन्मयानंदांचे स्टडीसर्कल चालवायच्या त्यावेळी मात्र नायकांनी त्यांचे कौतुक केले. त्या ठाईफला सोबेची शोभेची असावी ही ॲक्टिव्हिटी. शिवाय स्वामी चिन्मयानंद आंतरराष्ट्रीय कीर्तिचे, साहेबी विश्वात मान्यता पावलेले विद्वान. उद्देश भारतातून गेले तरी साहेबांच्या सावेने (इंग्रजी) नोकरशाहीवरीलच नव्हे तर भारतीय विद्याविभूषितांवरील आपला अंमल कायम ठेवला होता. त्यामुळेच ताईंचे Study circle यशोधनचे एक भूषण होते. या सर्व बायका मोठ्या आग्रहाने ज्ञानेश्वरीवरील प्रवचने ऐकण्यास येत असत. (फॅशन म्हणून असेल) पण परम पूज्य ताईंनी अध्यात्माचा अंगीकार एक फॅशन किंवा हॉबी म्हणून केला नव्हता तर ते जीवनच बनले होते त्यांचे. गुरूने आता या अध्यात्म विश्वाचा ताबा घेतला होता. गुरुचे वावडे असणाऱ्या यशोधन मधील सुधारक मुर्वांना ताईंचा हा गुरुमय अध्यात्म असह्य झाला. निनावी पत्रांचा मारा सुरू झाला. डिनर–डान्स–सोशल लाईफमधील ताईंच्या सायीदारिणी ताईंच्या आता कट्टर विरोधक बनल्या. किती त्रास झाला असेल ताईंना ! पण त्या आता संतकुळीच्या बनल्या होत्या. निनावी पत्रांना सर्व छळ त्यांनी संतांच्या शांततेनेच सहन केला. त्यांच्या सहनशीलतेचा कस लागला. परम पूज्य बाबांना, ताईंना पुढे होणाऱ्या त्रासाची आधीच कल्पना असणार म्हणून त्यांनी रफियामंझिलमध्ये तशी पूर्वसूचनाही दिली होती. ते ताईंना म्हणाले, "निनावी पत्रे येतात, वाटेल तो मजकूर लिहितात. सर्व सहन करावे लागते. मी तुला समजावून सांगतो."

जसजशी ताईंची गुरुभक्ती वाढू लागली तसतशी गुरूप्रसन्नताही त्यांच्याकडे सोनली जाऊ लागली. बाबांच्याकडे ज्या बाई ताईंना घेऊन जात त्यांना स्वाभाविकच ताईंचा मत्सर वाढू लागला. त्या ताईंबद्दल वाटेल ते बोलू लागल्या, नाही नाही ते पसरवायला सुरुवात केली. फार त्रास होऊ लागला ताईंना. परम पूज्य बाबांनी त्या बाईंकडे ध्यानरूम सुरू केली, त्या बाईंच्या समाधानासाठी, मत्सराच्या कचाट्यातून ताईंना सोडविण्या-साठी. पण ताईंना त्या बाईंच्या मत्सराचा फार त्रास झाला. फार ताण पडला. एकाच बिल्डींगमध्ये ही दुसरी ध्यानरूम का ! फार लागले ताईंच्या मनाला. चार महिने त्या गणेशपुरीस गेल्याच नाहीत. त्या बाईंच्या मत्सराग्नीत होरपळून निघालेल्या ताईंना गुरुदर्शनाचा लाहोदी

दुरावला. गुरुवचनामृत श्रवणाने मिळणारी मनःशांतीही मिळेनाशी झाली. पण हा सर्व त्रास, सर्व छळ मूकपणे सहन केला ताईंनी. बाबांना हे जाणवले. ते म्हणाले, "तिने (त्या बाईने) ताईंना फार त्रास दिला असता. तिला अडकविण्यासाठी तिच्या घरी ही ध्यानधून सुरू केली." ताईंना वाचविण्यासाठीच बाबांची ही योजना पण सरळ, भाबड्या ताईंना त्यावेळी हे आकलन न झाल्याने मानसिक त्रास सोसावा लागला.

हा सर्व विरोध, त्रास पचवूनही ताईंचे कार्य वाढत भरत होतं. प्रवचनांना गर्दी होऊं लागली. घर तोकडं पडू लागले म्हणून ताईंच्या भक्तांनी पार्लेश्वराच्या मंदिरात प्रवचनांची सोय केली. प्रवचने सुरू झाली. पण विश्वस्तमंडळ कर्मकांडी. ताईंचा हा साधकांचा ग्रूप त्यांच्या देवाला मंदिरात आलेला चालेना. "ताई येऊ देत, पण या सर्व साधका नको असं त्यांनी सांगितले. शिवाय अज्ञानामुळे यांचाही गुरु या संस्थेवर घुस्सा. 'ओम् नमः शिवायची धून' म्हणा. 'जयजयकार' नको या अटी. गुरुकार्याचा प्रसार-प्रचार करण्यासाठी गुरुच्या जयजयकारात उन्हापावसाची तमा न बाळगता कार्य करणारा हा ग्रूप या अटी कशा मान्य करणार? ताईंनी दुसरे देऊळ शोधा सांगितले. पार्लेश्वर सोडलं. झालं! पार्ल्यात ते. हितशत्रूंनी, 'ताईंना पार्लेश्वरातून हाकलून दिले.' असा प्रचार सुरू केला. या अपकीर्ती मोहिमेचा ताईंना त्रास होऊं लागला. कार्यावरही थोडाफार परिणाम झाला. साधकाच साधकांच्या शत्रू. या ग्रूपचे हे शिस्तबद्ध कार्य कित्येक साधकांना रुचेना. त्यांनीच अफवा पसरविण्यास, निंदेचा वारा उधळला. आपण येत ना नि येणाऱ्यांच्या मनातही किंतु निर्माण केल्याने काही साधका येण्याचे बंद झाले. कार्यकर्त्यांनी या टीकाखोरांचा समाचार घेऊं या का? विचारले, पण ताई म्हणाल्या, 'नको. शक्तीच कार्य करते. गुरु पाठीशी असताना काळजी कसली! ही तुमच्या भक्तीची कसोटी आहे. थोडासा त्रास सहन केलाच पाहिजे.' धन्य त्या ताईंची! इतका त्रास होऊनही त्या शांत. गुरुकृपेवर निर्भर राहून पुढे दौड चालूच. याच अनुभवाची पुनरावृत्ती इतर देवळांतही झाली. छिद्रान्वेषी पार्लेकर तर ताईंच्या अपकीर्तिचा डंका पिटण्यास सदा तत्परच! ताईंची गुरुकृपेवर दांडगी निष्ठा. "बाबाच काय ते करतील, त्यानांच काळजी." हा एकच मंत्र. ताई सर्व संतांच्या सोशिकतेनं सहन करत होत्या. टीकाकारही आले तरी त्याच प्रेमाने त्यांनाही आशीर्वाद मिळत होते. पुढचं पाऊल पुढंच पडत होते.

सर्वांत कहर केला विजयनगरने (पूर्व अंधेरीची एक कॉलनी) परमपूज्य ताईंच्या प्रवचनातील एका वाक्याचे भांडवल करून त्यांनी असं काही कुभांड रचलं अपप्रचारासाठी की बस्स! तोही किस्सा सांगण्यासारखा आहे. सज्जनांचा छळ, दुर्जन विनाकारण कसा करतात हेही कळेल.

त्याचं असं झालं. कार्यासाठी देवदेवळातून फिरणं, हॉलचा शोध घेणं, नित्यनूतन स्थान धुंडाळणं, आणि इतकी दगदग करून पदरात पडणार अपमान, अवहेलना, उपेक्षा या सर्व गोष्टींचा सर्वांना आला कंटाळा। हे दरवेशाचे जीवन कोठे तरी थांबवलंच पाहिजे. आपलं हक्काचं स्थान हवं. याबाबत सर्वांचेच एकमत! पण! हॉलसाठी लागणारा पैसा? ताईंचा हा प्रापंचिक साधकांचा ग्रूप. न मिळवत्या घरगुती साधकांचा। पैसा घरधन्यांच्या हातात (खिशात). या कार्याला प्रतिकूल असेच बहुसंख्य घरधनी. मग पैसा कसा उभारायचा?

अभक्तांच्या धनाला स्पर्श करायचा नाही हे तर ताईंचे ब्रीद! मग? परम पूज्य ताईंनी एका प्रवचनात सुचविले, "हे स्थान तुमच्यासाठी स्थान पाहिजे तर त्यागाची तयारी हवी. तुमच्या हातात पैसा नसला तरी स्त्रीधन तर तुमचे आहे ना? हातातील चार बांगड्यापैकी एक सोन्याची बांगडी देण्यास काय हरकत? झाले! सर्वं पाल्यातच धुमकां उठली की येथे सोनचांदी मागतात, लुबाडतात, भोळ्या भाबड्या साधकांना फसवतात. इ० इ० विजयनगरचे वातावरण या तथाकथित बातांमुळे आधीच दूषित बनले. त्यातच परम पूज्य ताईंचे भक्त आणि विजयनगरचे इतर काही रहिवासी यांच्यात वैयक्तिक वैमनस्य निर्माण झाले. आणि या सर्वांचा स्फोट झाला गोकुळाष्टमीच्या उत्सवानिमित्ताने. विरोधकांनी मुले हाताशी धरून उत्सव उधळून लावण्याचा प्रयत्न केला, उभारलेल्या मांडवावर पाण्याचा वर्षाव सुरू केला, आरडाओरड करून धूनमध्ये अडथळे आणले. पडदे फाडून आत घुसण्याचा प्रयत्न केला. सभ्य वसाहतीला न शोभणारी दांडगाई आरंभली. पण परम पूज्य ताई, नध्ये स्थिर उभ्या. आधारस्तंभच तो! धून चालू होती. मोवती फेर धरले होते. गुरुचा इतका भक्कम आधार असल्यावर भक्तगणही निर्भय, निश्चित असणारच. सेनापतीवरच सेनेचे धैर्य अवलंबून. सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. त्यामुळे विरोधक आणखीनच खवळले. परम पूज्य ताई टॅक्सीत बसेपर्यंत आरडाओरडा चालूच होता, आता त्यांचा संयम तुटला नि ताईंच्या टॅक्सीवर दगडफेक सुरू झाली. तरीही ताई नि ताईंचा ग्रूप शांत. दगडफेक होऊनही आमच्यापैकी कोणाला दुखापत न होता सर्व सुरक्षित घरोघरी पोचल्या. ही गुरुकृपाच.

दुसरे दिवशी त्याच कॉलनीत प्रवचन होते. काळचा डाव उधळला म्हणून विरोधक आता पिसाळलेच. नोटीस बोर्डाला चपलांचा हार काय घातला, प्रवचन चालू असता बाहेर आरडाओरडा सुरू काय ठेवला, खिडकीतून ताईंच्या वर दगडांचा मारा काय केला. पण ताई अविचल. अस्खलित वाणीत, हास्यविनोदाच्या मोकळ्या वातावरणात नेहमीप्रमाणे प्रवचन चालू होते. शेवटी विरोध थंडावला. सात्त्विकतेपुढे तामस राजसाचे बळ फिके पडले. पण ताईंनी मात्र परत त्या कॉलनीत न जाण्याचा निर्णय घेतला.

मानवाचा नर व नराचा नारायण बनविण्यासाठी ताईंचे अवतारकार्य! मग मानवातील दानव जागा करण्यात अर्थ काय! प्रस्त समंध शांतच केला पाहिजे. यासाठीच ताईंनी त्या कॉलनीत न जाण्याचा निर्णय घेतला. विरोधकांना भिऊन नाही. पण बोलणाऱ्यांच्या तोंडाला हात कोण लावणार! वाटेल त्या वावड्या उठू लागल्या. अपप्रचाराला भरती आली. त्यातूनच कोणीतरी 'भस्मेश्वरी' लेख लिहून गणेशोत्सवात विडंबनात्मक प्रहसन केले. धनुर्धारीत असाच प्रकारे लेख लिहून टीका केली. कोणी गणेशोत्सवात म्हराठी ड्रेसमध्ये ताईंची नक्कल केली. नानाप्रकारे अपप्रचार नि टीकांचा भडिमार होत होता. याच सुमारास कुसुम शर्मांना मिसाखाली अटक झाली. सुता हाती कोलीत सापडले. नामसाधर्म्यामुळे पार्ल्यात जिकडे तिकडे कुसुम शर्मा म्हणजे ताईंनाच अटक झाल्याची बातमी पसरली. विघ्नसंतोषी लोकांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या. कित्येक लोकांनी तर ताईंच्या भक्तांच्याकडे येऊन लोचटपणे चौकशीही केली. पण जेव्हा कळले कुसुम शर्मा–ती कम्युनिस्ट! ताईंचा या अटकेशी काहीही संबंध नाही. तेव्हा आंबट तोंडाने परत गेले. पण वावड्या उठतच होत्या.—शिमगा चालू होता. ताईंच्या कानापर्यंत हा सर्व गदारोळ येत होता. मिठ्या मारीत बातम्या सांगणारेही काही होतेच. ताईंना हा सर्व त्रास, छळ किती असह्य, तापदायक झाला असेल? एका

चांगल्या पवित्र कार्याचे असे विडंबन झालेले पाहून त्यांना काय वाटले असेल? तरीही हे शांतिमंत्र बहुलले नाही. उलट म्हणाल्या, दुर्जन झाले तरी ते गुरुचेच. सज्जनांचा छळ करूनच त्यांचा दुर्जनपणा, दुष्टपणा निवळेल. विंचवाने विष चावून चावूनच नाहीसे होते, संपते." परम पूज्य ताई शांत राहिल्या, तरी यतीचा अपमान शक्तीला कसा काय सहन होणार? नियतीने परम पूज्य ताईंचा छळ करणाऱ्यांना चांगलीच अद्दल घडविली. वर्तमानपत्रात त्यांच्या विरुद्ध लिहिणाऱ्यांच्या कुटुंबाची तर वाताहातच झाली. या छळविल्यातून ताई मात्र तावून सुलाखून बाहेर पडल्या. तेज अधिकच तेजाळले.

बाहेरगावच्या शिबिरांच्यावेळीही (सिद्धयोग ध्यान-शिबिरे हा लेख पहा) अशा लहान मोठ्या अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागले. अनंत अडी-अडचणीतून जावे लागले. कोठे बाथरूम नाही तर कोठे संडास नाही. कुठं जागा अगदी अपुरी तर कोठे अगदी गैरसोयीची. काही ठिकाणी निवास-स्थानापासून शिबिरस्थान लांब. जाण्यायेण्यास वाहन नाही. खाचखळग्यातून पदयात्राच. कित्येक ठिकाणी असहिष्णुतेची वागणूक. अति रुक्ष स्वागत. वापीच्या शिबिरानंतर तर प्रत्यक्ष बाबाच आपल्या एका ज्येष्ठ भक्ताला म्हणाले, "अशा ठिकाणी तिला पाठवत जाऊ नकोस." पण फक्त कार्यावर नजर असलेल्या या योगिनीने सर्व सहन केले. त्रास, अपमान यांच्या मोबदल्यात लोकांना आनंदरसकल्लोळी डुंबविले, विरोधकांचाही शाल, श्रीफळ देऊन सन्मान केला. म्हणून तर सोलापूरच्या "संचारने" संत कुसुमेश्वरी म्हणून सन्मान केला, गौरव केला ताईंना.

बाहेरील विरोध, छळाला तोंड देणे, सोसणे एक वेळ सुसह्य, सोपं. पण अंतर्गत विरोधाला, छुप्या छळाला सामोरं जाणे अत्यंत नाजुक काम. रेशमी गुंताच तो! चटकन सुटत नाही, कापून टाकणे जमत नाही. अवघड नि नाजुक दुखणे!

येथेच ताईंची खरी कसोटी लागली. रायकरांच्याकडे कऱ्हाडचा एक ज्योतीषी आला. त्याचे लक्ष तेथे बसलेल्या एका मुलीकडे गेले. या मुलीची काकू, आई सर्वच ताईंचे भक्त! त्या ज्योतिषाने "त्या मुलीचे भविष्य अति वाईट आहे, अनेक अनिष्ट ग्रह एकवटले आहेत." अशी भयानक भविष्यवाणी वर्तवली. ती मुलगी भ्रमिष्टासारखी वागतच असे. तिची काकू तर सांगते, "ताईंनी जर हाताशी धरले नसते तर ही मुलगी आमच्या हातातून गेली असती. मोठ्या अरिष्टांतून, संकटातून वाचविले ताईंनी आमच्या कुटुंबास." अशा या मुलीचे अदृष्ट, प्रारब्ध बदलण्याचाच संकल्प जणु सोडला ताईंनी. तिच्या काकूबरोबर त्या तिला रोज प्रसाद पाठवू लागल्या. पुढे गिरगावात शिबीर झाले. त्या घरातील मुलगा या मुलीला योग्य वर होईल हे गुरुमाऊलीने हेरले. त्याप्रमाणे तिच्या आईला सुचविले. हा सालस मुलगा तिच्या घरातील सर्वांनाच योग्य वाटला. व्याही भोजन झाले. मुलीच्या वडिलांनी मुलाचाही सत्कार केला घरी जेवणास बोलावून. विजयादशमीच्या मंगलमुहूर्तावर हे मंगलकार्य पार पडण्याचे ठरले. सर्व ठीक चालले होते. पण मुलीचे प्रारब्ध आड आले की, ताईंचे प्रभावी व्यक्तिमत्त्व अधिक तेजाळण्याची वेळ आली न कळे. कुठंतरी माशी शिंकली आणि एके दिवशी तिच्या आईची चिठ्ठी आली ताईंना, की "मुलीच्या मानलेल्या भावाला हे लग्न पसंत नाही. तो आपल्या पोलीस खात्याला घेऊन येणार आहे. हे लग्न होऊं देणार नाही तर काय करावे!" ही मुलीची आई म्हणजे ताईंची भक्तच. आपल्या या भक्ताला पाठीशी घालण्यासाठी, धीर देण्यासाठी ताईंनी उलट चिठ्ठी लिहीली. "सारी जबाबदारी मी घेतली आहे." घरातल्या या तंग वातावरणाचा सुगावा मुलीला लागला. तिच्या मनात तर तोच मुलगा भरला होता. लग्न करीन तर त्याच्याशीच, हा तिचा निर्धार होता. घरी राहिल्यास आपणास कोंडूनही ठेवतील. दसऱ्याचा मुहूर्त आपणास साधू देणार नाहीत, अशावेळी घरातून मुकाट्याने नाहीसे होणेच इष्ट, असा तिने विचार केली नी मुकाट्याने ती आपल्या बहिणीकडे जाऊन राहिली. इकडे मुलीची शोधाशोध सुरु झाली. मुलीचे वडील, ते मानलेले भाऊ, व काका परमपूज्य ताईंच्या घरी जाऊन थडकले. मुलीच्या शोधार्थ घरावर धाडच घातली म्हणाना. परम पूज्य ताई अवाकच झाल्या हा सर्व अनपेक्षीत हल्ला पाहून. "मुलगी कोठे आहे? बाहेर आणा." "मुलगी आमच्याकडे नाही. ती कोठे आहे मला माहीत नाही." असे प. पू. ताईंनी सांगूनही त्या लोकांना पटेना, "मी जबाबदारी घेतली आहे" हे चिठ्ठीतले शब्द त्यांच्या डोळ्यापुढे नाचू लागले. प. पू. ताईंनाच हा सर्व डाव आहे अशी त्यांची समजूत झाली. ते आपला हेका सोडीनात. योगायोगाने मिस्टर शर्मा त्या दिवशी घरी होते. परम पूज्य ताई म्हणतात, "गुरुकृपाच मला सांभाळते." सकाळच्या वेळी ते टेनिस खेळायला जात. पण त्या दिवशी पायाला ठेच लागून बोट दुखावल्याचे निमित्त झाले. ते घरीच राहिले. परम पूज्य ताईंना धीर आला. सर्व ओळखीच्या घरी फोन करून मुलीची चौकशी सुरु झाली फोनवर. गुरुकृपेने मुलगी सापडली. मुलगा व मुलगी दोघेही ताईंकडे आले. तेथून सर्वजण पार्ल्यास मुलीच्या काकाकडे येण्यास निघाले. निघतांना परम पूज्य ताईंनी मुलीच्या ओटीत नारळ टाकला संकल्पाचा. वाटेत मुलीच्या मानलेल्या भावाने वांद्र्याच्या पोलीस ठाण्याकडे मोटार वळविली. परम पूज्य ताईंना पोलीस ठाण्यावर नेण्याचा विचार होता त्याचा! काय हा जगाचा न्याय! चोराला सोडून संन्याशाला सुळी देणे होते हे! आईबापांना अनावर झालेली मुलगी सुस्थळी देऊन त्यांना काळजीमुक्त करण्याच्या भावनेतूनच परम पूज्य ताईंनी हा खटाटोप केला ना! त्या मुलीच्या आईचा (आपल्या भक्ताचा) छळ थांबविण्यासाठी सर्व जबाबदारी आपल्यावर ओढून घेतली ना! त्या बाईने नको होते का पुढे यायला परम पूज्य ताईंच्या मदतीला? पण छे! हीच का गुरुभक्ती! काय ही मानवी कृतघ्नता! परमपूज्य ताईंच्या असामान्य धैर्याची, समय-सूचकतेची नि सात्त्विकतेची कसोटीच होती ही! इतकं होऊनही परमपूज्य ताई शांत होत्या. पण गाफील नव्हत्या. त्या षड्यंत्राचा कुटिल डाव लक्षात येताच त्या सावध झाल्या. विलक्षण बळ संचारले त्यांच्या अंगात, त्या निर्भयपणे त्या मुलीच्या काकाला म्हणाल्या, "दादा, तुम्ही गणेशपुरीला जाता, धूनमध्ये भाग घेता. बाबांचे भक्त म्हणवता, हे वागणे शोभत का तुम्हाला? तुम्हाला बाबांची शपथ आहे. वळवा गाडी पार्ल्याला काकूकडे. नाहीतर उडी घेईन मी गाडीतून." परमपूज्य ताईंचा हा आवेशावतार बघून सर्वच चपापले, मुकाट्याने गाडी आणली काकूकडे. त्याठिकाणी ते पोलीस अधिकारीही उपस्थित होतेच. लग्न मोडण्यासाठीच हा सारा उपद्व्याप होता. मुलीचे मन वळविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न झाला. वडिलांचे तर तोंडच सुटले. पण जेव्हा मुला-मुलीनेच सांगितले "हे लग्न आम्ही स्वखुषीने ठरविले आहे. आमच्यामध्ये कोणी पडू नये हे उत्तम." वडिलांना भिणारी त्यांच्या समदमी अवताराला बावरून एरव्ही सशासारखी

कुशंकेखातर होणारी, भिऊन अंग चोरणारी मुलगी आज इतकी निर्भीड, धीट, निर्भय कशी बनली याचेच सर्वांना आश्चर्य वाटले. दोघेही मेजर, मग काय? मुलीच्या वडिलांनी आपल्या हुकुमाचा मोर्चा आता परम पूज्य ताईंकडे वळवला. वाटेल तसे, वाह्यातपणे बोलले, सभ्यतेच्या मर्यादा ओलांडल्या त्यांनी. परमपूज्य ताईंचे सर्व फोटो फाडले. त्यांचा जितका अपमान करता येईल तितका केला पण परमपूज्य ताईंची शांती ढळली नाही. मुलीच्या धीटपणाचे मात्र सर्वांनाच आश्चर्य वाटले. परमपूज्य ताई म्हणाल्या, "हा संकल्पाचा नारळ बोलला." एकंदर प्रकाराने मुलगा— मुलगी जरा अस्वस्थ झाले. पण परम पूज्य ताईंनीच त्यांना उलट धीर दिला. "असे अस्वस्थ होऊ नका, गुरुकृपा सर्व ठीक करेल." इतके सर्व प्रकरण होऊनही परम पूज्य ताई शांतपणे घरी गेल्या.

दुसऱ्या दिवशी, मुक्तेश्वरीच्या पारायणानंतर मुलाच्या आईबरोबर परम पूज्य ताई परत येत असतांना, घरी टॅक्सी पोचल्यानंतर मुलाच्या आईने सहज सांगितले की, "आज आमच्याकडे C. I. D. आले होते." "हे लक्षण काही ठीक नाही" परम पूज्य ताई म्हणाल्या, "पोलीस अधिकारी वाटेल तसा त्रास देतात, जबरीने पाहिजे ते जबाब घेतात." घाई नाही केली तर काय होईल हे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर तरळू लागले. त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखले. त्याही जिद्दीला पेटल्या. हे लग्न आजच्या आज झाले पाहिजे त्यांनी संकल्प सोडला. मुलीच्या काकूला फोन केला. "प्रसंग बाका आहे. त्वरा केली पाहिजे." झाले. भराभर चक्रे फिरू लागली. सर्वकडे फोन खणाणले. परमपूज्य ताईंचे दोन भक्त पुढे आले. सर्व मंडळी गिरगावात गेली रेडीमेड मंगल कार्यालयात. आणि विजयादशमीला होणारे मंगल कार्य त्याच सायंकाळी घाईघाईत वैदिक पद्धतीने पार पडले. अवघ्या ५ तासांच्या अल्पकालावधीत मुलगा- मुलगी पतिपत्नी बनून बाहेर पडले. बाहेरच्या लोकांनाहेखील फार काळजी वाटत होती एकंदर प्रकरणाची. सर्माधादेश म्हणाले, "होम् सेक्रेटरीला फोन करतो." परमपूज्य ताई म्हणाल्या, "नको." बाहेरच्या लोकांनी यात गुंतू नये. गुरु पाठीशी आहे. बाबा सर्व ठीक करतील" केवढी गुरुवरील निष्ठा! या निष्ठेच्या बळावरच त्यांनी एकटीच्या जबाबदारी- वर हा प्रसंग निभावून नेला. स्वतः विष पचवले नि वधूवरांना नवजीवन दिले, जन्माचे कल्याण केले. ज्यांनी परमपूज्य ताईंची वाटेल तशी अवहेलना केली, त्यांच्याच या मुलीला सासूबाच्या फचाट्यातून परमपूज्य ताईंनी मुक्त केले. इतकेच नव्हे तर, तिचे प्रारब्धच बदलून टाकले. ज्योतिषज्ञ खोटे पाडले.

ताईंना ही मुलगी भेटली तेव्हा तिच्या पत्रिकेत अनेक अनिष्ट ग्रह एकवटले होते, तर मागच्या महिन्यात एका ज्योतिषाने पत्रिका पाहून सांगितले "अपार गुरुकृपा आहे. फार सुरेख पत्रिका आहे. अनेक शुभ- ग्रहांचा मेळावा आहे तुमच्या पत्रिकेत. फार भाग्यवान आहात" आहे की नाही गंमत! हा चमत्कार की परम पूज्य ताईंच्या अदभुत दैवी सामर्थ्याचा आविष्कार? काहीही म्हणा, पण परपूज्य ताईंना फार ताण पडला या प्रसंगी हे मात्र खरे! त्यांच्या अलौकिक सामर्थ्याची नि दिव्यतेची प्रचीतीही आली. निर्णायक शक्ती, समयसूचकता, व्यवहार चातुर्य, रामदासांचा गनिमी कावा, निर्भयता, असीम धैर्य, एकदा ज्याचा अंगिकार केला त्याची संपूर्ण जबाबदारी घेण्याची तयारी, अनन्य गुरुनिष्ठा अशा अनेक अलौकिक गुणांची ओळख भोवतालच्या लोकांना पटली. एकप्रकारचा दबदबा निर्माण झाला. भक्तमंडळींचा आदर दुणावला. आपल्या ताईंच्यावर त्यांचा अधिकच विश्वास बसला. त्या त्यांच्या एकमेव आधार बनल्या. स्वाभाविकच भक्तिप्रेमही दुणावले. अनिष्टही इष्ट होते ते असे! विरोधकांनीही ताईंचे सामर्थ्य ओळखले. मैत्रेयी ताईंचा छळ करणा- ऱ्यांना नियतीने चांगलीच अद्दल घडविली. मुलीच्या त्या मानलेल्या भावाने यतीचा अपमान करून आपल्या हातानेच अरिष्टाची मालिका ओढवून घेतली.

यापुढे आहेत ते अरेचे अरेच! दुसरे आता यावविण्यास सुरवात केली. पहिला फ्लॅट घेतानाच परमपूज्य ताईंच्या प्रथमा नवरीने ठरले होते की, मंदिराचे कार्य वाढत आहे. हे चारी फ्लॅटस् लागणार. आता अडकवणे आवश्यक. म्हणून दूसरा जावेल तेव्हा फ्लॅटस् मोकळे करायचे या समजानेच तीन भक्तांना तीन फ्लॅटस् अडकविण्यास ताईंनी सांगितले. त्या- गुरुभक्तांनी हे आनंदाने मान्य केले. पण—प्रत्यक्ष सोडण्याची वेळ आली तेव्हा फार खळखळ केली दोघांनी, स्वार्थाने पछाडले त्यांना. विवेकच राहिला नाही वागताना. स्वार्थांध बनलेल्यांना विवेक कुठला? प्रवचनाला जागा फारच अपुरी म्हणून दोन फ्लॅटमधील भिंत पाडून मोठा हॉल करणे आवश्यक. त्या फ्लॅटमधील भक्ताला समोरच्या फ्लॅटमध्ये राहाण्यास सांगितले. राग आला त्यांना, ताळच सुटला. फार त्रास झाला ताईंना. ते जाण्यापूर्वी काही दिवस तर ताईंना स्वतःला खोलीतच कोंडून घ्यावे लागले. ताईंची सर्व देखभाल या कुटुंबाकडेच! स्वाभाविकच ताईंच्या खाण्या-पिण्याबाबतही अनास्था निर्माण झाली. शेवटी शेवटी तर उपवासच घडले ताईंना. पण तरीही ताईंची सहनशीलता ढळली नाही. सर्वात कमाल म्हणजे ताईंना एकटीला सोडून एके दिवशी रात्रीच्या रात्री हे कुटुंब निघून गेले. त्या प्रसंगाच्या साक्षीदारांनी ताईंचा हा छळ, मनाचा कोंडमारा प्रत्यक्ष पाहिला आहे. त्या प्रसंगाच्या स्मरणानेही या भक्तांचे जीव कासावीस होतात. काही वेळा संयम सुटून कडूही बोलतात. पण ताई! "ते होते म्हणून मला घर सोडता आले, खूप त्रास घेतला त्यांनी माझ्यासाठी! पुण्यक्षय झाला, मारच आड आले आणि म्हणून हात सुटला त्यांचा. पण केलेली सेवा वाया जाणार नाही." असं सौम्य शब्दांत सांगतात. बोलणाऱ्यांना शांत करतात. ते कुटुंब कृतघ्न बनले पण ताईंची कृतज्ञतेची जाणीव सदैव जागृत आहे.

एक कुटुंब सुखाने गेले. ताईंना त्यांनी कधीच सोडलं नाही. सर्वजण त्याच ओढीने आजही येतात. पण तिसऱ्या कुटुंबाने मात्र नुसता राग ओकला ताईंवर! जळजळीत अंगार! सर्वात अधिक कृपा कदाचित याच भक्त कुटुंबाच्या मापात ताईंनी घातली असावी तोपर्यंत. आईवडिलांच्या इच्छेने कामातून गेलेल्या बेताल मुलीस ताळ्यावर आणले. न शिकणारी मुलगी पदवीधर झाली. कॉलेजमध्ये आपल्या हुषारीने चमकली. आज लग्न होऊन सुस्थळी पडली. कुटुंबप्रमुखाच्या नोकरीत स्थैर्य तर आलेच पण सीनीऑरिटी डावलून गुरुकृपेने वरची पोस्टही मिळाली. (त्यांनीच हे सांगितले) पंगु मुलीच्या हातापायात जोर आला. आधाराशिवाय चालू लागली. वाचाशुद्धी झाली. कुंडलिनी लागत झाली. तिची प्रकृती सुधारली. पण! ही सर्व गुरुकृपा दिसली नाही. स्वार्थ दुखावताच सर्व उपकारांचा विसर पडला. अत्यंत्रासत्यक्ष त्रास दिला नि कायमचे वैर धरले. ही गुरुमाऊली मात्र त्या सर्वांचे सर्व अपराध पोटात घालून आनंदाच्या प्रसंगी, ज्या लोकांनी अडीअडचणीत साथ दिली ते अविचारीपणाने, गैरसमजाने सोडून गेले, आजच्या आनंदाला मुकले म्हणून स्मरण करीत असते. समयपर परत येतील असे म्हणून त्या प्रॉडिगल सन्सना कृपा

पाळीत असते. गुरुला वगाच नाही 'उदारे' म्हणत. कार्यावर नजर असलेल्या परमपूज्य ताईंनी या दोन कुटुंबाचा रोष पत्करला. त्यांनी वाकडे धरले तरी परम पूज्य ताईंनी पैशाने कोणाचीही गैरसोय केली नाही. जास्तच रकम दिली. या सर्व सौजन्याच्या मोबदल्यात परमपूज्य ताईंच्या पदरात पडला त्यांनी केलेला अपप्रचार. "ट्रस्टींना काढून टाकतात. गरज संपली की, दूर करतात. विश्वास ठेवू नका." इ. इ. प. पू. ताई सर्व ऐकून घेतात. 'अंतर्सभव नाही' या वाक्याने सर्वांना गप्प बसवतात. आपण कधीच कोणाबद्दल अनुदार उद्गार काढीत नाहीत. या औदार्याला सीमा नाही. सोसायटीनेही काही कमी त्रास दिला नाही. या सोसायटीने तीन लाखाच्यावर प्रॉपर्टी असलेल्या या ट्रस्टला अजूनही समासद करून घेतले नाही. "ही रेसिडेन्शियल वसाहत आहे. येथे आम्हांला तुमच्या पब्लिक अॅक्टिव्हिटीज नको. तुम्ही दुसरीकडे जागा पहा." हे त्यांचे सांगणे. पण ट्रस्टने बिल्डरकडून हे चार फ्लॅटस् कायदेशीर विकत घेतले त्यावेळी एकही सोसायटी मेंबर विरोध करण्यास हजर नव्हता. वर्षभर कार्यक्रम व्यवस्थित चालले, कोणाचीही तक्रार नाही. नि मग काय बिनसले न कळे. त्रास देण्यास सुरुवात केली. भायकांना अडवायचे, त्यांच्या मागोमाग गुरखे वर यायचे, गमून गमून मंदिरात डोकावून गुरखे उपस्थितांची नोंद करायचे. मंदिरात येणाऱ्यांच्या वाहनांना आंत येण्याची मनाई, एके दिवशी तर 'कसा होतो यांचा कार्यक्रम पाहूं!' या जिद्दीने गुरख्यांची संख्या दोनावरून १२/१४पर्यंत नेली. ते लाठीधारी गुरखे मारामारी करण्याच्या तयारीनेच सिद्ध होते. प्रसंगाचे गांभीर्य परमपूज्य ताईंनी तेव्हाच ओळखले. कोणताही अनावस्थाप्रसंग ओढवू नये, अनुचित काही घडू नये, आपल्या घरंदाज, कुलीन भायकांना असभ्य, अपमानकारक वागणूक मिळू नये, शांतता मिळविण्यासाठी येथे आलेल्या आपल्याकडून शांतताभंग होऊ नये, या विचाराने मोठ्या समयसूचकतेने नि चातुर्याने प्रसंग हाताळला. कार्यक्रम रद्दित केला. आपल्या लोकांना रस्त्यावरूनच परत केले. सोसायटीच्या एकंदर कुटिल डावातील हवाच काढून टाकली. हा डाव रचलेल्या सोसायटी समासदांना, आपल्या ट्रस्टला बदनाम करून यांची activity सोसायटीला कशी त्रासदायक आहे, यांच्याकडे येणाऱ्या पब्लिकमुळे येथील शांतता कशी भंग पावते हे सिद्ध करायचे होते. सर्व सोसायटी मेंबर्सना मंदिराविरुद्ध चिथावणी द्यायची होती. ट्रस्टला काढून टाकायचे होते. परंतु परमपूज्य ताईंच्या प्रसंगावधानाने, चातुर्यपूर्ण निर्णयाने, समयसूचकतेने त्यांचा हा कुटिल कट तर फसलाच पण त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. सोसायटीतील अनेक मेंबर्सची सहानुभूती या मंदिराच्या कार्याला मिळाली. परमपूज्य ताईंच्या या शांतता धोरणामुळे या निरुपद्रवी लोकांना आपल्या सोसायटीत त्रास का दिला जातो हाच कित्येकांना प्रश्न पडला. गुरूवर निर्भर राहून अविचल धैर्याने परमपूज्य ताई प्रसंगाला सामोऱ्या जातात. तावून सुलाखून बाहेर पडतात. परम पूज्य ताईंना गच्चीवर फिरण्यासाठी गच्चीची किल्ली न देणे, टॅक्सी येण्याच्या वेळी गेट बंद करणे, पाणी न सोडणे, असे बारीक सारीक त्रास काही कमी दिले नाही. पण या संतकुळीच्या राणीने नापसंतीचा "ब्र" काढला नाहीत, की कार्यकर्त्यांनाही, विरोध करू दिला नाही. उलट सोसायटी कार्यकारी मंडळाला प्रसादाला बोलावून त्यांचा सन्मानच केला. कार्यक्रम आधी कळवणे, सोसायटीने घातलेल्या सर्व अटीमध्येच कार्यक्रम रचविणे इत्यादी सर्व बारीक सारीक, कित्येक वेळा अपमानकारक, आपल्या व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या अनेक नियमांचे काटेकोर पालन करून सोसायटीचा विरोध बोथट केला. विरोधातील हवाच काढून टाकली.

विनाकारण दुरावलेल्याला काही भक्तांचा किस्साही वाचण्यासारखा आहे या डायऱ्यांतील. एक कौटुंबिक अडचणींनी कातावलेल्या, अक्षरशः रडकुंडीला आलेल्या भक्ताला आधार दिला. त्याच्या सर्व कुटुंबाला अगत्याने आश्रमात ठेवून घेतले. सर्व अडचणींचे निराकरण झाले. गृहस्थाला उत्तम ध्यान लागते म्हणून कौतुक केले. प्रत्येक वेळच्या शिबीर टीममध्ये समावेश करून ठिकठिकाणी लोकांसमोर त्यांचा आदर्श ठेवला नि त्याने एक दिवस कारण न देता अकस्मात येणे थांबवले. आपल्याबरोबर आलेल्या वारशिप मधील लोकांनाही आपल्याबरोबर नेले. बाहेर बोलतात, येथील कार्याला हानि पोचवतात, परंतु समोर बोलावले तर तोंड लपवतात. मानवालाच हा कृतघ्नपणा शोभतो. या गृहस्थाच्या मिशाच्या तर हृदयशूल थांबला. गृहस्थ आला त्या दिवशी घाम टाकीत आला होता. घामाधूम झाला, गुदमरला होता प्रथमदिनी पण— दुसऱ्याच वेळी सहज चार जिने चढून आला. सर्व अडचणीतून मुक्त झाला व 'फार सुखी आहे आता गुरुकृपेने.' हे त्याचेच शब्द. पण तिसरी मुलगीच झाली म्हणून नाराज. येथे यायच ते ध्यानासाठी की नवससायास फेडण्यासाठी? योग विद्यापीठ आहे हे. त्यातून गुरुकृपा खेचून घेणारी समर्थ दृढ भक्ती असली की, "जो जे वांछील तो ते लाही." असेही अनुभव येतात अनेकांना. आपली भक्ती कमी, दृढ निष्ठा नाही, समर्पण जमत नाही, शक्तीशी contact येतच नाही हे या लोकांना सांगूनही समजत नाही. गुरुमाउलीला शरण जाऊन सुखसमृद्धीचे धनी होण्याऐवजी वेडे गुरुमाउलीवर रुसतात, या स्थानाला दुरावतात, गुरुकृपेला वंचित होतात. आणखी एक गुणी गृहस्थ आहेत. त्यांना गुरुकृपेने अगणित अनुभव आले. मुलगा नशिबी नसतानाही मुलगा झाला, घर मिळाले, त्यांच्यातील कलेच्या विकासाला मंदिरात वाव दिला. त्यांनी मागील अंकांत प. पू. ताईंवर गुणगौरवात्मक उत्तम लेख लिहिला. आणि नंतर येणे थांबविले. का ते कळले नाही. यानांही "न येण्याची कारणे या मनात असतील ती, अगदी मोकळेपणाने. आम्ही ती या अंकांत छापू." असं परमपूज्य ताईंनी स्पष्ट कळविले आहे. कोणाचा अहंकार दुखावला म्हणून, कोणाचा स्वार्थ साधला नाही म्हणून, कोणाचा कार्यकर्त्यांनी अपमान केला म्हणून, अशा किरकोळ कारणांना बळी पडून या स्थानापासून दूर झाले, महानंदाला मुकले. या चुकलेल्या जीवांना परत कसं मार्गावर आणायचं हाच प्रश्न विचाराधीन आहे गुरुमाउलीच्या. त्यांच्यावर रागावण्याऐवजी, त्या म्हणतात "मी सर्वांकडे जीव म्हणून बघते. अमूक तमूक म्हणून बघत नाही. एक जीव कोंडला आहे त्याला सोडवायचे. हेच गुरुचे काम ना?"

या डायऱ्यांमध्येच ताईंची पराकोटीला पोचलेली निःस्पृहता, अपरिग्रहता प्रगट करणारेही काही तापदायक प्रसंग आहेत. अवघड जागीचे दुखणे पण परम पूज्य ताईंनी थोड्याशा कठोरतेनेच पण कसे सफाईदार ऑपरेशन केले हे पाहण्यासारखं आहे.

ते असे घडले. परम पूज्य बाबांना थैली अर्पण करावयाची होती. त्यासाठी एका बाईने गुप्तदान दिले. ते किती ते कोणालाच माहीत नाही. पण त्यांच्या यजमानांना पासबुकावरून या दानाचा पत्ता लागला. त्यांची परम पूज्य ताईंना, "माझ्या पत्नीने ५००० रु. भावनेच्या भरात गुरुभक्तीने प्रेरित होऊन दिले ते परत करावे." अशी चिठ्ठी आली.

आणि ती चिठ्ठी दिली कोणी ? तर त्या बाईनेच. परम पूज्य ताईंच्या हातात रायकरांच्याकडे प्रवचन संपल्यावर हसत हसत दिली. काय हा दैवदुर्विलास !! परम पूज्य ताई आश्रमात परत आल्या तो ५ चा सुमार. थोड्याच वेळांत वेळ करून सर्वांना बोलावले व सांगितले "किती रक्कम दिली कोणासच माहित नाही. पण ते गृहस्थ ५००० रु. म्हणतात ना ! देऊन टाकू. विष आहे ते. सर्व परत करा. आपणास काही कमी पडणार नाही बाबांच्या कृपेने. त्या गृहस्थांना फोन करा की तावडतोब येऊन रक्कम घेऊन जा आवश्यक आहे." सायंकाळी ६ ला फोन केला. रात्री ८॥ च्या सुमारास ते गृहस्थ आले. ५००० रु. सर्वांच्या समक्ष मोजून त्यांना दिले. अवघ्या १ तासात ५००० रु. तयार झाले. कसे ? गुरुकृपा नि नित्यानंद बाबांचा वारसा. आणखी काय ? रक्कम देताना त्यांना बजावले मात्र "रक्कम किती दिली माहीत नाही. गुप्तदान कोणाला कळत नाही पण तुम्ही म्हणता, सभ्य गृहस्थाच्या शब्दावर विश्वास ठेवून आम्ही ही रक्कम परत केली." अवाक् झाले गृहस्थ, प. पू. ताईंची ही बाणेदार निःस्पृहता बघून. "५००ची तरी देणगी घ्या". आग्रह करू लागले. पण त्यांना स्पष्ट सांगण्यात आले, "आता देणगी स्वीकारण्यात गोडी नाही" या गृहस्थाने आपल्या बायकोच्या या दानाचे भांडवल केले. सचिवालयात विशेषतः चॅरिटीकमिशनराच्या ऑफिसमध्ये खोटेनाटे वाटेल ते सांगून येथील कार्याबद्दल मत कलुषित केले. त्याचाहि बराच त्रास झाला, ट्रस्टच्या कार्यावरही थोडा–फार परिणाम झाला. चॅरिटी कमिशनरच्या ऑफिसमध्ये येथील साधक कार्यकर्त्यांना येथील आर्थिक व्यवहाराच्या सचोटीबद्दल वाटेल ते ऐकून घ्यावे लागले. पण सत्य ते सत्यच ! खरी गोष्ट कळलीच त्यांना. परवाच्या भेटीत म्हणाले, "तुमच्या कडील आर्थिक व्यवहाराबद्दल काही म्हणणे नाही आता." पण किती त्रास सहन करावा लागला कित्येक दिवस ! ती बाई या सर्व त्रासाचे मूळ, तिला शिक्षा म्हणून काही काळ मंदीर बंद केले पण कृपाळू, दयाळू, प्रेमाळू गुरुमाऊलीस काठिण्य धारण करणे किती काळ जमणार ! चुकल्या माकल्या शिष्यांना सन्मार्गाला लावणे हा तर गुरुधर्म. परत त्या बाईंची पूर्वीप्रमाणे ये–जा सुरु झाली.

दुसऱ्या एका भक्तप्रवर गृहस्थाने १००० रु.ची देणगी चांदीच्या मखर फंडाला दिली. पण मनात विकल्प ठेवून. परमपूज्य ताईंना तशा वेदना जाणवल्या. कार्यकर्त्यांना पाठवून रक्कम एकाएकी परत केली. त्या गृहस्थाला व त्याच्या सर्व कुटुंबियांना ही निःस्पृहता पाहून आश्चर्याचा धक्काच बसला. आपल्या मनातील किंतु मात्र त्यांनी प्रांजळपणे कबूल केला. ती रक्कम त्यांनी गुरुआज्ञा म्हणून ठेवून घेतली. दुसऱ्या दिवशी गुरूंच्या दरबारांत हजर झाले. क्षमा मागितली. पण परमपूज्य ताईंनी ते दान घेण्याचे नाकारले. "ते पैसे ओवळे झाले. मी त्याला स्पर्श करू शकत नाही." रामशास्त्र्याच्या निःस्पृहतेलाही मागे टाकणारी ही निःस्पृहता पाहून सर्वांच्याच माना आदराने खाली लवल्या.

हा तर झाला इतरेजनांकडून छळ ! पण स्वजनांनी प्रत्यक्ष ट्रस्टींनी केलेल्या छुप्या छळापुढे हा काहीच नाही. ज्यांच्यावर विश्वासून निर्धास्त राहावे त्या विश्वस्तांनीच आपल्या कार्यात रस न घेऊन अप्रत्यक्ष विश्वासघात केला. परम पूज्य ताईंच्या सहीशिवाय त्यांचा पुरुषी अहंपणा दुखवला गेला नि त्यांनी अडवणुकीचे धोरण स्वीकारले. हे सर्व एकापेक्षा एक बडे सरकारी अधिकारी. चांगल्या परिचयाचे म्हणूनच परमपूज्य ताई त्यांच्यावर पूर्ण विश्वासल्या नि चांगल्याच फसल्या. फ्लॅटची खरेदी झाली पण ते दुसऱ्या नावावर करून घेणे, सर्व हिशेब वेळच्या वेळी ऑडिटरला पाठविणे, इनकमटॅक्सचे प्रश्न सोडविणे, सर्वच बाबतीत दुर्लक्ष नि दिरंगाई. वेळेवर इनकमटॅक्स रिटर्न न भरल्याने परमपूज्य ताईंनाच त्रास झाला. सर्व नामानिराळे झाले. त्यांना काय हा मामला कन्सर्न नाही असे वाटले. ट्रस्टींच्या चुकीसाठी परम पूज्य ताईंना मात्र ३०–४० हजारांची आर्थिक झळ सोसावी लागली. मानसिक त्रास झाला तो निराळाच. शिवाय यांच्यापैकी काही ट्रस्टी शक्तीकृपा घेतात आपल्या पासून नि निष्ठा भक्ति देतात गणेशपुरीला असे परम पूज्य ताईंच्या निदर्शनास आले. त्याचाही फार त्रास झाला त्यांना. हा मानसिक छळ म्हणजे मुका मार ! अधिक त्रासदायक, तापदायक, लोकांना कळत नाही. ताई म्हणतात, 'जावे त्याच्या वंशा' कृतघ्न भक्त आणि हे विश्वासू विश्वस्त. पण आता विश्वस्त मंडळच बदलले आहे. त्यामुळे कार्यालाही गती आली. मानसिक शांतताही मिळाली. पण न संपणारे असे काही त्रास आहेत. साधुसंतांना फक्त लोककल्याणाचेच कार्य साधायचे असते पण येथे तर गुरुची भूमिका वठवायची आहे. योग—विद्यापीठाच्या प्रिन्सिपॉल—प्राचार्य आहेत त्या. विद्यार्थी तयार केले पाहिजेत, आपण गुरुकृपेने जतन केलेला हा ज्ञानसाठा कोणाच्या तरी स्वाधीन केला पाहिजे ही तळमळ. आणि याच तळमळीपोटीच विद्यार्थी विद्यार्थिनी आश्रमात ठेवतात, त्यांच्यासाठी आर्थिक झीज सोसतात. आपली शक्ती खर्च करतात. मुला–मुलींनाही परमपूज्य ताई अतीप्रिय, त्यांच्या सहवासात त्यांच्या मनाच्या कळ्या खुलतात, वृत्ती फुलतात, बाहेरच्या अस्थिर, मत्सरी जीवनातून, साधक मनाने आलेली ही मुले-मुली येथे स्थिरावतात, विसावतात. परमपूज्य ताईंची खिलाडूवृत्ती, आनंदी, निर्मळवृत्ती, त्यांचे संभाषणचातुर्य, नर्मविनोद, खोपरखळ्या, जीवनाकडे बघण्याचा आशावादी दृष्टिकोण आणि येथील प्रसन्न–प्रसादीक चितीमय वातावरण या तरुणमनाना भुरळ पाडतात. ती येथेच रमतात, खिळतात, त्यांचा सर्वांगीण विकास घडत असतो. बरच्या लोकानाही आपली उनाड अनावर मुले सुधारत आहेत, अभ्यास न करणारी, शिक्षणाचा कंटाळा असणारी, लौकिक दृष्ट्या मठ्ठ ठरलेली पोरे, शाळा कॉलेजमध्ये उल्लेखनीय प्रगती करत आहेत, मस्तीनेही टंच बनली आहेत, हे पाहून बरं वाटते नि तेही मुलांना परमपूज्य ताईंच्यावर सोपवून निर्भर होतात. परंतु किती दिवस ? शेवटी मुले शहाणी झाली की ती आईबापांची. मग कित्येक आईबापांचा विरोध सुरु होतो. मुलांना येथे येण्यास मनाई करतात. मुलांची कुचंबणा होते. कित्येक मुली तर ताईंच्या जवळ मनमोकळं करतात, रडतात. कनवाळू हृदय व्याकुळते, द्रवते, यातना होतात प. पूज्य ताईंना या मुलामुलींची मानसिक कुचंबणा पाहून. पण करणार काय ? लोकजागृती होत नाही, तोपर्यंत हे असेच चालायचेच. मुले शेवटी आईबापांची ! आपण कृपा ओतली, शक्ती खर्च केली आपल्या कार्याला वाहून घेतील म्हणून त्यांना सर्व दृष्टीने तयार केले, प्रेम दिले पण आपला त्यांच्यावर यत्किंचितही हक्क नाही, या विचाराने त्रास होतो त्यांना. कित्येक आईबापांना त्यांची मुले येथे येणे पसंत नसते. ते येथील कार्याचा अपप्रचार करतात. समाजात खोटेनाटे समज पसरवितात. परम पूज्य ताईंनाच वाटेल तशी दूषणे देतात. आपल्या मुलांना बिघडविले, नादी लावले या गैरसमजाने परम पूज्य ताईंवर वाटेल तसे आरोप करतात, रागावतात, पण हे कलियुग आहे. कलीचा खेळ आहे, लोकांचा अंतर्मन जागृत नाही, सात्त्विकतेचा विकास होत नाही तोपर्यंत हे असेच चालायचे, असा विचार करतात. कार्यावर लक्ष ठेवून परमपूज्य ताई सर्व सहन करतात. मुलीमुलींनाच आईबापांच्या इच्छे-

प्रमाणे वागण्याचा सल्ला देतात. "तुमची भक्ती खरी असेल तर तुम्ही आपल्या घरातील माणसांना येथे आणाल, त्यांची मने पालटाल." अशी समजूत घालतात. आणि काही वेळा अनुभव असाच येतो. मुलाविरुद्ध तक्रारी करण्यासाठी, तर कधी आपली मुले वागतात तरी कोठे हे पाहण्यासाठी आलेले पालकही हळूहळू येथील भक्त होतात. त्यांच्या पाठोपाठ त्यांचे अनेक नातेवाईकही येऊ लागतात. जे असे येतात, ते परम पूज्य ताईंच्या प्रसन्न, पावन दर्शनाने प्रभावित होतात, येथील कार्यांची माहिती करून घेतात. सत्संगास हजर राहतात. ध्यानास येतात. अनुभव येऊ लागले की तेही परमपूज्य ताईंचे एकनिष्ठ भक्त बनतात. पण जे लांब राहूनच काही माहिती करून न घेताच टीका करतात ते—अशा या अज्ञानांध टीकाखोरांचा फार त्रास होतो परमपूज्य ताईंना. आपल्याला बुद्धिमान समजणाऱ्या पुरुषवर्गाचाच भरणा अशा टीकाखोरात अधिक. हा अन्याय नाही का? अज्ञानामुळे, दुराग्रहामुळे होणारी ही टीकाही एकवेळ सुसह्य. पण ज्यांनी स्वतः कृपेचे अनुभव घेतले आहेत, येथील कार्यांची वारंवार प्रशंसा केली आहे नि आपली मुले येथे सुधारतील, सुखात राहतील या विचाराने प्रथम परम पूज्य ताईंच्या स्वाधीन स्वतःहून केली व नंतर आपला मुलगा येथे रमला, आपल्याला दुरावला असे पाहून परम पूज्य ताईंच्यावरच उलटले, त्यांच्याशीच वाकडे धरले, अशांना काय म्हणाल? जगाचा हा उलटा न्यायच ताईंना फार जाचक होतो. अगदी ताजं उदाहरण.

कोकणातील एक खेडं. तेथील बाईला येणाऱ्या फिट्स् परम पूज्य ताईंच्या कृपेने गेल्या. ती बाई परम पूज्य ताईंची भक्त बनली. आपली बायको सुधारली संसार सुखाचा झाला म्हणून गृहस्थही अप्रत्यक्ष भक्त झाला. या जोडप्याने आपली मुले शिक्षणासाठी शिक्षणाची सोय असलेल्या परगावच्या नातलगाकडे ठेवली. पण थोरला मुलगा नापास होऊ लागला. त्याचे शिक्षणात लक्षच नव्हते. शेवटी गुरुमाऊलीच काय तो मार्ग काढील, मुलाला हाताशी धरेल या विचाराने मुलगा परम पूज्य ताईंच्या स्वाधीन केला. मुलगाही ताईंना चिकटला. पहिल्याच इन्टेन्सिव्हला त्याला शांभवी दीक्षा मिळाली. त्याला शिक्षणात गोडी नव्हती. कॉलेजला बुट्टी मारणे सुरू झाले त्याचे. परीक्षेतही नापास. टाइपिंग किंवा इतर vocational कोर्सेस घेण्याचीही तयारी नाही, घरची सारखी पत्रे येऊ लागली परम पूज्य ताईंना. 'त्याला शिकवा नाहीतर घरी पाठवा' परम पूज्य ताईंनी शिकस्त (लौकिक दृष्ट्या) केली त्याची समजूत घालायची. पण त्याचे उत्तर एकच "अभ्यासाविषयी तुम्ही मला दुसरे काहीही सांगा." त्याचे आयुष्य वाया जाऊ नये, त्याला काही दैवी सामर्थ्य प्राप्त करून घावे या कळकळीच्या दृष्टीने परम पूज्य ताईंनी गुरुचरित्राची १०८ पारायणे त्याच्याकडून करवून घ्यायचे ठरवले, संकल्प सोडला. पारायणे सुरू झाली. त्याची शुद्धी होऊ लागली. तेज चढू लागले, हसीचे बळ येऊ लागले, तारुण्य सुलभ ऊर्मी फोफावल्या. तारुण्य सुलभ प्रमादही घडू लागले, तरीही परमपूज्य ताई क्षमाशील वृत्तीनेच त्याचे अपराध पोटात घालीत. त्याला ह्याची जाणीव होती. आपले कल्याण फक्त परम पूज्य ताईच करतील. आईबापांनी देखील आपली उपेक्षा केली, अवहेलना केली. एक वाया गेलेला मुलगा म्हणून नाद सोडला. पण ताईंनी मात्र पोटाशी धरले. बस्स! त्याने आपले जीवन मंदिराच्या कार्याला वाहून घेण्याचे ठरविले. बाहेर लौकिकदृष्ट्या निर्बुद्ध ठरलेल्या या मुलाला परम पूज्य ताईंची आज्ञा झाली की अशक्यही शक्य होई. फ्यूज काढणे, टेपरेकॉर्डर दुरुस्त करणे, मंदिरात वाटेल तेथे कौशल्याने वीज खेळवणे, इलेक्ट्रीकल डिप्लोमा घेतलेल्यांनाही कित्येक वेळा न जमणाऱ्या लहान सहान दुरुस्त्या तो सहज करी. कार्यात कौशल्य आले. कार्याला भरवाच वेग नि गति प्राप्त झाली. हां हां! म्हणता तो काम उरकी. गायन-वादन यातही प्रवेश झाला. पाककौशल्य संपादन केले. एक हरहुन्नरी मुलगा बनला तो. आणि आताच या बलशाली—तगड्यातगड्याची घरच्या शेतीला निकड भासू लागली: घरची पत्रावर पत्रे. परम पूज्य ताईंना वाटेल तशी सूचणे, पण हा दाद देईना. शेवटी वडील न्यायास आले. तमाशा नको मंदिरात म्हणून परम पूज्य ताईंच्या आज्ञेनुसार गेला, पण 'शिवाजीने आग्र्याहून पलायन केले मोठ्या हिकमतीने.' त्यातलं वडिलांना हुलकावणी देऊन निसटला. रात्री गेलेला मुलगा त्याच रात्री पहाटे मंदिरात डेरेदाखल झाला.

या मुलाचे सर्वांनाच कोण कौतुक. आईबापांना सोडून राहिलेला म्हणून परम पूज्य ताई जातीने काळजी घेत. हो मुलगाही तितकाच गुणी. सेवा करावी तर त्यानेच, याबाबत दुमत नाही. कचरा टाकण्यापासून ते पाकक्रियेपर्यंत, पंचापासून पूजेपर्यंत सर्वात तो तत्पर नि तरबेज. पण एकोऽहि दोषः गुणसन्निपाते। परत तीच आगळीक, तीच क्षमा, परमपूज्य ताईंनी "ब्र" काढला नाही की रागावल्याही नाही. उलट म्हणाल्या, "चुका सर्वांच्या हातून होतात, आपण सर्व माणसं आहोत. चूक परत न होऊ देण्याची मात्र खबरदारी घ्यावी." पण याचवेळी त्या मुलालाच वाटले आपण या पवित्र जागी राहण्यास लायक नाही की आपल्यावर अन्याय झाला न कळे. पण त्याच्या वृत्तीत निश्चित बदल जाणवू लागला. इतक्यात त्याच्या वडिलांचे परत पत्र. "मुलाला तातडतोब पाठवून द्या. शेती करायला कोणी नाही. माझा संसार बसायची वेळ आली आहे." इ०इ० परम पूज्य ताईंनी त्याला पाठविण्याचा निर्णय घेतला! आश्रमाचे वातावरणच जरा तंग झाले होते. तोही नेहमीसारखा वागेना. परम पूज्य ताईंनी बोलके करण्याचा प्रयत्न केला, पण छे! तेव्हा "मी घरी त्याच्यासाठी शक्ती खर्च केली असली तरी मुलगा आईबापांचा. हक्क त्यांचाच. कार्यावर माझे लक्ष. तो मुलगा चांगला तयार झाला असता, त्याला सिद्धी पण प्राप्त झाल्या असत्या, आणि कार्याला कायमचे वाहून घेतले असते त्याने तर—पण कार्यासाठी आई-बापांच्या इच्छेविरुद्ध जबरीने ठेवून घेणार नाही. १०८ पारायणांचा संकल्प आता पूर्ण झाला आहे. पारायणांची समाप्ती झाली की, तो येईल असा मी त्याच्या आईला शब्द दिला होता. आज मी त्या शब्दातून मोकळी होत आहे त्याला व्यवस्थित सांगून." हे परमपूज्य ताईंचे बोलणे ऐकून मन थक्क झाले. त्या पुढे म्हणाल्या, "त्याच्या अंगात हत्तीचे बळ आहे, ध्यान लागले आहे. उत्तम शेती करेल. शेतात मोती पिकवेल." त्याला सांगितले, 'घराचाच आश्रम बनव.' तुला बोलता येते, लिहिता येते, छान कार्य करशील. आपले सर्व ग्रंथ वाचून दाखव तेथील लोकांना. गुरुभक्ती शिकव. मधून मधून सवडीनुसार ये राहण्यास. आश्रम तुझाच आहे." काय हे मोठं मन! पण याला प्रतिसाद मिळाला का? अरेरे तुसडेपणे निरोप घेतला परम पूज्य ताईंचा त्याने. भोवतालच्या लोकांनाही जाणवले. मग त्याच्यासाठी आतापर्यंत त्याच्या आईबापांचा वाईटपणा घेतला, जो आजपर्यंत आपल्यावर अपार प्रेम करीत होता तोच का हा! काय वाटले असेल त्या माऊलीला. त्या अपमानाचा थांग कोणाला लागायचा! फक्त म्हणाल्या, "एक फाईल हातावेगळी झाली!"

त्यांचे गावी पोचल्याचे पत्र नाही की निरोप नाही. घाबरलेच धरचे त्या कुटुंबाने, म्हणतात ना ज्याचे करावे बरं...

परम पूज्य ताईंनी व्यक्त अव्यक्त असा हा अपार छळ सहन केला आहे. त्यामुळे परम पूज्य ताईंचे बळ वाढलेच आहे. महिमा दिगंत पोचला आहे. अपार गुरुकृपा पाठीशी असल्याने परम पूज्य ताई सर्व दिव्यातून तावून सुलाखून अधिकच तेजाळून बाहेर पडल्या आहेत. संतांच्या अदृष्टांतच असतो छळ. संत झाले की छळ थांबतो. हा सर्व छळ पचविल्यानंतरच तो संत सर्वांना पसंत पडतो, शिरोधार्य ठरतो. त्या सर्व गुरु भक्तांनाही सांगतात, "गुरुभक्तालाही छळ सोसाया लागतो. संघर्षानेच शक्ती बाहेर येते. परमार्थात कोणतीही लहानमोठी भूमिका करा. त्याच्यात वाईटपणाही घेण्याची तयारी ठेवा."

परम पूज्य ताईंनी सर्व विष पचविले, काट्यांची फुले केली, म्हणूनच अपार गुरुकृपेच्या धो धो वर्षावात सुनिक, यौगिक अनुभव त्यांना येत आहेत. पण यौगिक सुखाच्या सोहळ्याचा आनंद निर्मळ आहे की, त्यातही लुप्या छळाची बोच आहे. वाचाच एका डायरीतील पुढील अनुभव—

महायोगाचे दिव्य यौगिक अनुभव.

अम्मा म्हणतात असे परम पूज्य ताईसारखे यौगिक अनुभव क्वचितच पाहायला मिळतात. त्यांच्या केसांच्या जटा आपोआप वळून मस्तकावर सर्व केस गोळा होऊन त्याचा जाळीदार मुगुट झाला हे सर्वांनी डोळ्यांनी पाहिले.

तसेच काढलेल्या दातांच्या जागी दुसरे नवीन दातांचे अंकुर फुटले. सर्वच दांत लहान झाले. एक दिवस तर दाढेतून हिरकणी निघाली. पैलू पाडलेल्या हिऱ्याप्रमाणे तो हिरा आम्ही जपून ठेवला आहे.

मंदीर झाल्यावर एक वर्ष काही आठवडे परमपूज्य ताईंच्या केसातून सोनेरी परागांचा, छोट्या विटांच्या आकारांच्या विटांचा, सोन्याच्या टिकल्यांचा वर्षाव होत असे. आम्ही तेही जपून ठेवले आहेत. जवळ बसलेल्यांच्या अंगावरही तो सोन्याचा भुगा (पराग) उडायचा. भुरभुर वर्षाव होतानाही दिसायचा. आम्ही परम पूज्य ताईंना सांगितले की, त्या म्हणायच्या "सहस्रारांतील सुवर्ण कमळाचे पराग आहेत ते." असराच्या थेंबांचा वर्षाव तर खोलीत नेहमीच होतो. कागदावर, साडीवर, डोक्यावर, बिछान्यावर कोठेही थेंब टपकन पडतात. कुंकू, अक्षता निघणे हा तर नेहमीचाच विषय झाला आहे.

परम पूज्य ताईंचा बाह्य कुंभक होऊन उदर पृष्ठ, विशाल (नित्यानंदबाबांसारखे) झाल्यावर त्यांना जमिनीवर बसता येईनासे झाले. भरलेली घागर उचलायला जड होते, तसे प्राण हे जड असल्याने तसे होत असावे. ज्ञानेश्वरीत १७ व्या अध्यायात गणपतीच्या रुपकांतील ओवींतही गणपतीचाही हाच अनुभव दिला आहे. गुरुचरित्रातील गोकर्णमहाबळेश्वराच्या आख्यानातही शंकराने रावणाला बजावले होते, "शिवलिंग खाली ठेवले तर उचलले जाणार नाही. जमिनीचा स्पर्श होऊ देऊ नकोस." परम पूज्य ताईंचा देह शिवलिंगच झाला आहे. म्हणून त्यांना दीतभर तरी उच्चासनावर बसावे लागते. गुरुही हे न कळल्याने त्यांचे नेहमी हसे होते. "खाली बसण्याची, उठण्याची सवय हा ऑफिसर्णीच्या सुखवस्तु जीवनात झाली नाही पण आता ती करायलाच पाहिजे." अशी व्यंगोक्ती टीका होते. नाही नाही ते ऐकावे लागते. संन्यासदीक्षेच्या दिवशी तर कहरच झाला. पण परम पूज्य ताईंनी सर्व शारीरिक, मानसिक ताण सहन केला. त्या म्हणतात, "ज्याने माझी अशी अलौकिक अवस्था केली तोच सारी जबाबदारी घेईल." लौकिक लोकांना हे अलौकिक अनुभव समजणारच नाहीत.

मुली वयात येताना त्यांना जो अनुभव येतो, तो परम पूज्य ताईंना वयाच्या ६२ व्या वर्षी येत आहे, तुर्येचे तारुण्य प्राप्त झाले तर देहही तारुण्यात पदार्पण करत असावा." महायोगिनी आमच्या डोळ्यासमोर घडत आहे. हे स्त्रीयोगिनीचे प्रथमच प्रगट उदाहरण असल्याने ह्याचा कोठे उल्लेखही सांपडणार नाही.

आणि म्हणून परम पूज्य ताईंची परवानगी नसतानाही आम्ही काही प्रमुख अनुभवांना आमच्या जबाबदारीवर प्रसिद्धी देण्याचे धाडस करीत आहोत. पुढच्या पिढीतही कोणाला असे अनुभव आले तर कोठेतरी उल्लेख असावा एवढाच हेतू.

आमचा उदात्त हेतू लक्षात घेऊन आमच्या धाडसास गुरुमाऊलीने उदारपणे क्षमा करावी हीच प्रार्थना.

आता परमपूज्य ताईंचा गुरुगृहीचा सुखाचा निवास वर्णन करणारी काही पाने.

दिनांक १७–७–७८
सोमवार

आज प. पू. ताई येथ्या गुरुपौर्णिमेसाठी गणेशपुरीला तीन दिवस वास्तव्य करण्यास निघाल्या. नुकताच पाऊस पडून गेल्यामुळे झाडाझुडपांच्या व गवताच्या हिरव्या-पोपटी रंगावर टवटवीचा एक आगळाच साज चढला होता. ही झाली पावसाळ्याची गोष्ट. पण प. पू. ताई जाणार असल्या की त्यांच्या आगमनाच्या चाहुलीने ती सृष्टी नेहमीच बहरते. तिचे मनोगत कळल्यामुळेच जणू प. पू. ताई म्हणाल्या, "आपण जातो तेव्हा सृष्टी नेहमी हसत असते नाही।" प. पू. ताईंच्या ह्या उद्‌गाराला उंचउंच झाडांच्या शेंड्यांनी माना डोलावून रुकार भरला.

प. पू. ताई मोटारीत बसल्या की जुन्या ड्रायव्हरच्या भाषेत सांगायचे तर "ताई 'चढ' म्हणतात आणि कोणत्याही अडचणींना न जुमानता गाडी चालू लागते." जणु अनिरुद्ध विमान. पण आज काय झाले कुणास माहीत! गाडीचा टायरच पंक्चर झाला. त्याच्या जागी दुसरा बसवला तर त्यातलीही हवा कमी झाली. व ड्राइव्हरला त्याच्याही पंक्चरची भीती वाटू लागली व त्याने मोटार पेट्रोलपंपात नेऊन उभी केली. हागहुजी होईपर्यंत अर्धापाऊणतास मोडला. प. पू. ताई म्हणाल्या की 'पुढे काहीतरी वाईट होणार असेल ते एवढ्यावरच टळले असेल किंवा काहीतरी खूप चांगलं होणार असेल.' गुरुच्या नाटकात प. पू. ताईंची टाईमली एन्ट्री व्हावयासाठी अशा गोष्टी घडतात असे आम्हाला ह्यापूर्वीही अनुभवास आले आहे. ह्यावेळेलाही तसेच झाले. परमपूज्य ताईंची मोटार आश्रमाच्या समोर येऊन उभी राहिली. श्रीनित्यानंद बाबांच्या मूर्तीसाठी एक हार व परमपूज्य बाबांसाठी एक बेलाचा हार घेऊन त्यांनी हॉलमध्ये प्रवेश केला आणि काय! प. पू. बाबा हॉलमध्ये येऊन बसलेलेच होते. परमपूज्य ताईसारख्या शिष्यशिरोमणीने सोमवारी, शंकराच्या वारी त्यांच्या गळ्यात बेलाचा हार घातला अन क्षणार्धात टाळ्यांचा कडकडाट झाला. परमपूज्य ताईंची प्रसंगाचे औचित्य पाळण्याची विलक्षण हातोटी आहे जिचा उगम त्यांच्या उत्कट गुरुप्रेमामधून झालेला आहे—त्यांची सगळ्यांनीच खूप प्रशंसा केली. प. पू. बाबांच्या पळशासी नावाच्या एका भक्ताने

प. पू. ताईंना बागेत मुद्दाम नेऊन सांगितले की, 'आज आपण बाबांना बेलाचा हार घातला व आम्हाला मोठी दुर्मिळ गोष्ट बघायला मिळाली. आमच्या डोळ्यांचे आज पारणे फिटले.' परमपूज्य ताईही सांगत होत्या की आजच्या त्यांच्या व बाबांच्या भेटीच्या वेळी त्यांनी एका विलक्षण आनंदाची, महानंदाची अनुभूती घेतली. आणि त्या अनुभवात त्या खूप हसल्या त्रिजयाशी. ताईंवर त्यांचा भाव केवढा मोठा! त्या प. पू. बाबांच्या सान्निध्यात कधी मोठ्याने हसत नाहीत. हसल्या तरी नुसते स्मित हास्य करतात. आपण त्यांच्यासमोर खुशाल मजल्यांवर मजले चढवून हसतो. पण त्या नेहमीच प. पू. बाबांसमोर मर्यादा पाळतात. त्यांचे आजचे हास्य काही निराळेच होते.

धूनमध्ये भाग घेतल्यावर प. पू. बाबा कट्ट्यावर बसायला गेले व तेथे त्यांनी प. पू. ताईंशी पोटभर बोलून घेतले. त्यांनी भगवान नित्यानंद बाबांच्या मूर्तीसाठी चांदीचे मखर व त्याला सोन्याचा कळस करून घेतला आहे. त्या नजरानंद गोष्टी चालल्या होत्या. प. पू. बाबा मुंबईला आलेले असताना त्यांचा व प. पू. ताईंचा "तू तुझ्या बाबांचं कर मी माझ्या बाबांचं करीन" अशा शब्दात करार ठरला आहे. त्यानुसार प. पू. ताई मनातल्या मनात म्हणाल्या, "मी तुमच्यासाठी हिरेजडीत, रत्नजडित बनवीन" आमच्या जवळ बोलताना गंमतीने म्हणाल्या, कॉम्पिटिशनच करायची असल्यावर काय! ही कॉम्पिटिशन मोठी गोड आहे. नंतर संध्याकाळी विजयाच्या आई भेटायला आल्या होत्या, सांगत होत्या प. पू. बाबा प. पू. ताईंबद्दल काय म्हणत होते ते. ते म्हणत होते—"स्वामी उमानंद खूप मोठे स्वामी आहेत. मोठे बुद्धीमान!"

१८-७-७८

मंगळवार

आजचा मंगळवार एक खूपच मंगल गोष्ट घडवून गेला. आज सकाळी प. पू. बाबा साधारण सव्वा नऊच्या सुमारास प. पू. ताईंना घेऊन आणखी काही लोकांसह श्रीनित्यानंद बाबांच्या समाधीच्या दर्शनास गेले. आणि त्यांनी प. पू. ताईंना एकट्यांना घेऊन खूप खूप हिंडून हिंडून दाखवले सगळे. निरनिराळ्या जागा दाखवताना त्यांच्या व नित्यानंद-बाबांच्या आठवणी सांगत होते की—"इथे त्यांनी मला रात्री अकरा वाजता बसवले व माझ्या डोक्यावर हात ठेवला. मी रात्रभर तिथेच भिंतीशी उभा होतो." नित्यानंदबाबा खुर्चीत बसले आहेत व मुक्तानंदबाबा खाली बसले आहेत असा फोटो कुठे काढला गेला तेही दाखवले. श्रीनित्यानंदबाबा कुठे निजायचे तीही जागा दाखवली. परम पूज्य ताईंनी त्या बिछान्यावर त्यांचे हात चरणांकडील बाजूला ठेऊन नमस्कार केला. तसे करताना मनात जी इच्छा धरू ती पूर्ण होते असे त्यांना मागे कोणीतरी सांगितले होते. विशेष म्हणजे हे सारे त्यांनी (प. पू. बाबांनी) बरोबर गेलेल्या बाकीच्या कोणालाही न सांगता फक्त प. पू. ताईंनाच सांगितले. गुरुशिष्याची गुह्य गोष्टी नित्यानंद-मुक्तानंद-उमानंद अशी परंपराच सुरक्षित असणार. त्यानंतर परमपूज्य बाबा समाधीच्या इथे जी श्रीनित्यानंदबाबांची मूर्ती आहे तिच्यामागे आसन घेऊन बसले. बरोबर आलेली मंडळी प्रदक्षिणा घालू लागली. इतरांनी नुसत्याच मूर्तीला प्रद-क्षिणा घातल्या. पण प. पू. ताईंनी त्यांच्या गुरुदेवांना प्रदक्षिणा घालण्याची सुसंधी अचूक पकडली. त्यांच्या कधीचे मनात होते बाबांना प्रदक्षिणा घालावी म्हणून. आज ती इच्छा पूर्ण झाली. प. पू. ताईंनी त्यांच्या मागून त्यांना प्रदक्षिणा घालून त्यांच्या पाठीमागे उभं राहून जमिनीला हात लावून हळूच नमस्कार केला. समाधीच्या पुजाऱ्याने प. पू. बाबांना व प. पू. ताईंना हार व नारळाचा प्रसाद दिला. प. पू. ताईंचे असामान्यत्व जणू पुन्हा एकवार सिद्ध झाले.

श्री. नित्यानंदबाबांच्या स्वयंपाक करणाऱ्याने प. पू. ताईंना व प. पू. बाबांना एक औदुंबराचा वृक्ष दाखवला. त्याने सांगितले की 'गुरुचरित्राची १०८ पारायणे झाल्यावर हे झाड लावले आणि आता कित्ती मोठे झाले आहे.' ते ऐकून प. पू. ताई प. पू. बाबांना म्हणाल्या, 'आम्ही पण मंदिरात गुरुचरित्राची पारायणे करतो. १०८ करायची आहेत.' त्यावर प. पू. बाबा म्हणाले, 'रोज गुरुगीता वाचता ना? मग काही जरूर नाही पारायणाची. पण ठीक आहे. पुण्याई जमा करू तितकी कमीच आहे.' प. पू. ताईंनी जागेच्या खटल्या करता नाहीशा व्हाव्या म्हणून, १०८ पारायणे मंदिरात करण्याचा संकल्प सोडला होता. त्याला दुजोरा मिळाला जणू!

आज सकाळी प. पू. बाबा धूनमध्ये येऊन बसले तेच खूप रागावलेले होते. 'Indian लोक काहीच काम करत नाहीत सगळं काम फॉरीनर्स करतात. अशी आहे का आपली संस्कृती?' असे खूप खूप बोलले. प. पू. ताई म्हणाल्या की 'त्यांच्यावर आपली संस्कृती काढण्याइतकी वेळ यायला नको होती. धूनसाठी हजारो लोक बाहेरून येतात, त्यांना कामं वाटून दिली तर करतील की! कारण तेही भक्तीनेच येतात. पण कोणीतरी चांगले organise करणारे हवे.'

१९-७-७८

बुधवार

प. पू. ताई जे वर बोलल्या ते त्यांनी आज स्वतःच कृतीत आणून दाखवले. आज आपल्या ग्रुपतर्फे जिलबीचा भंडारा होता. त्यामुळे आज त्यांनी पंक्तीत वाढायचे असे आधीपासूनच ठरवून ठेवले होते. प. पू. ताई सव्वा दहालाच अन्नपूर्णेत उपस्थित झाल्या. स्वयंपाकघरापासून सगळीकडे फिरून तिथल्या प्रमुख कार्यकर्त्यांना, आलेल्या लोकांकडून कशी कामे करून घ्यायची त्याबाबतीत मार्गदर्शन केले. आज खरोखरीच पोतीच्या पोती गहू साधकांनी निवडून दिले. कोणी मटार सोलले, तर कोणी भेंडी चिरत होते, कोणी तांदूळ निवडत होते तर कोणी संडास बाथरूम साफ करत होते. प. पू. ताई एक उत्कृष्ट संघटक आहेत हे प. पू. बाबांनी विशेषांकात दिलेल्या आशीर्वादात उद्गार काढले आहेत त्याचीही पुष्कळांना पुनः प्रचीति आली. प. पू. ताई खरे म्हणजे गणेश-पुरीला कधीच, कुठेच इंटरफिअर करत नाहीत, इकडे तिकडे जरूरीशिवाय लक्ष देत नाहीत. पण आज त्यांनी कीचनमध्ये येऊन जो Interest घेतला त्याचे सर्वांनी स्वागतच केले.

प. पू. ताईंचे शिष्यत्व पूर्ण होऊन गुरुत्व प्राप्त झालेले. पण मुलाला जसे तो कितीही मोठा झाला तरी 'आई, मी तुझे लेकरू आहे,' असे म्हणण्यात गोडी तशी प. पू. ताईंना 'मी तुझा पुत्र, शिष्य' अशा भावात, अशा भूमिकेत राहण्याचीच मोठी आवडी. आदर्श शिष्यत्वाचे सगळे पैलू त्यांच्या ठिकाणी वेळोवेळी प्रगट होत. तेथे प. पू. बाबा यायच्या वेळेलाच तेवढे सगळे हजर होत हॉलमध्ये. पण प. पू. ताई आधीपासूनच जाऊन

बसायच्या. खरे म्हणजे त्यांना कोणीही आयत्या वेळेला बाजून सुद्धा पुढे जागा करून दिली असती पण प. पू. ताईंना स्वतःलाच राजीव सोपीव असले आवडत नाही. शिवाय फळभाराने वाकलेल्या फांदी सारखी नम्रता. अभ्यासाठी पुढे जागा शिल्लक ठेवून स्वतःचे आसन त्यांच्या मागे घालायच्या. अगदी पहिल्या दिवशी प. पू. ताईंनी हॉलमध्ये प्रवेश केला त्यावेळी प. पू. बाबांनी स्वतः दोन जणांना उठायला सांगून प. पू. ताईंना बसायला जागा करून दिली होती. नंतर प. पू. ताईंना उगाचच चिडवत होते की 'तुला बसण्यासाठी जागा करायला दोन जणांना उठवावे लागले.' पण प. पू. ताई आहेतच आजेगुरुंच्या वळणावर. एवढंसं चिमणीच्या घासाएवढं अन्न खाऊनही देहावर कधी तुष्टी पुष्टी दिसते. गुरुप्रेमाची संतुष्टी आहे ती. आणि मग नंतर लगेच प. पू. ताईंना प्रत्यभिज्ञा हृदयाच्या वाचनात एक संदर्भ मिळाला की ज्याचे प्राण शुद्ध झाले त्याची देहयष्टी अशीच भव्य बनते.

प. पू. ताई धून मध्ये कधी कधी न रहावून विजयाशी हसायच्या. एकदा प. पू. बाबा धून चालू असतानाच कोणाला तरी रागावत होते लाऊड स्पीकर मधून. ते जिथे पाहून रागावत होते तेथे प. पू. ताई मान वळवून बघायला लागल्या. त्याबरोबर प. पू. बाबांनी विजयाला सांगून प. पू. ताईंना समोर बघायला लावले व प. पू. ताईंना म्हणाले, 'काही नाही ग ! माझ्यासमोर लाऊड स्पीकर आहे म्हणून मी असे बोललो.' तो त्यांचा संवाद ऐकल्यावर, ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात, गुरुचरणी ज्याने स्वतःला विकून टाकले आहे त्याच्या छंदात गुरु कसा भडकतो त्याचे वर्णन आहे ना ! त्याची आठवण झाली. मातापुत्राचे प्रेमसंबंध. लहान बालकाला बरा आपली आई इकडे तिकडे बघत असल्याचे, दुसऱ्यांशी बोलल्याचे सहन होत नाही. आणि ते बालक आपल्या आईचा चेहरा हातात धरून वळवून वळवून तिला स्वतःकडे बघायला लावतो इतका तो पझेसिव्ह नेचरचा असतो. तसे वाटले. चित्शक्तिविलासमध्ये प. पू. बाबांनी म्हटले आहे मातृदेव कुसुमेश्वरी !

प. पू. ताईंना सगळेच लोक फार मानतात. नमस्कार घेतल्याखेरीज सरळ पुढे जाताच येत नाही त्यांना हल्ली. प. पू. ताईंनी शैविझमवरील पुस्तकाचे मराठी भाषांतर करायला घेतले आहे अभ्यासासाठी. त्या डायरीवर काल त्यांना प. पू. बाबांची सही घ्यायची होती. प. पू. बाबा दुपारी चौकात बसले असताना त्या वरून डायरी घेऊन येतच होत्या पण जिन्यात एक वृद्ध बाई पुढून उतरत होती. तिच्यामुळे नेमका तेवढाच उशीर झाला व प. पू. ताई गुरुचौकात येऊन पोहचेपर्यंत प. पू. बाबा परत जाण्यासाठी उभे राहिलेले होते. त्यामुळे तेव्हां सही घेता आली नाही. पण प. पू. ताईंनी अर्थातच ह्यातून काहीतरी चांगले निष्पन्न होणार असा अर्थ लावला. त्यानंतर पुन्हा संध्याकाळी त्यांची सही घेण्याची संधी आली. कैवढ्यातरी लोकांच्या जमावाच्या देखत प. पू. ताईंनी प. पू. बाबांची सही घेतली. हेच जर दुपारी सही घेतली असती तर तेव्हा चौकात काहीच गर्दी नव्हती. पण आत्ता संध्याकाळी एवढ्या गर्दीच्या देखत सही घेण्याने त्यांच्या दोघांतील इंटिमसी सगळ्यांना नियतीला दाखवायची असेल. कालच्या दिवसही खास दिवस होता. कालच बाबा ताईंना समाधीपाशी घेऊन गेले होते. प. पू. ताईंना काहीही करून तो दिवस साधायचा होता तो त्यांनी बरोबर साधला.

२०-७-७८

गुरुवार

आज गुरुपौर्णिमा. सकाळी धूनच्या समाधीचा कार्यक्रम होता. त्या-नंतर प. पू. बाबांचे भाषण झाले. प. पू. ताईंसारख्या श्रोता समोर बसल्यामुळे त्यांच्या रसवंतीला बहर आला होता. श्रोत्यांमध्ये प. पू. ताई बसल्यामुळे भाषणात सगळे संत येऊन हजेरी लावून गेले; तसे शेख नासिरुद्दीनच्या गोष्टीला मात्र पूर्णपणे छाट मिळाला होता. प. पू. बाबांनी भाषणात वेदांताची रुक्ष चर्चा करणाऱ्यांवर, डॉक्टर लोकांवर खूप ताशेरे ओढले. नामजपाचे महत्व सांगताना त्यांनी त्यांच्या आवडत्या एकनाथ-महाराजांचा सूचक उल्लेख केला. ते म्हणाले की 'नामधूनने देव आपला ऋणी होतो. एकनाथांचा देव इतका ऋणी झाला होता की तो त्यांच्या घरी पाणी भरीत असे. अजूनही तो एकनाथांकडे पाणी भरतो.'' प. पू. बाबा उघड उघड सुचवत होते की त्यावेळचे एकनाथ महाराज आज ह्या घडीला कुठेतरी (अर्थातच प. पू. ताईंच्या ठिकाणी) प्रगट झाले आहेत आणि देव त्यांच्या घरी अजूनही पाणी भरतो आहे. प. पू. ताईंच्या भाषेत सांगायचे म्हणजे कावडीने नसेल भरत, प्लॅस्टिकच्या बादलीने भरत असेल पण देव पाणी भरतो आहे हे निश्चित. कारण त्यांच्या डोळ्यांच्या दोन कावडी, कोणास माहीत, त्या गुरुआनंद देवासाठी किती भरभरून वाहिल्या असतील ! मग का नाही ऋद्धिसिद्धी धावून येणार सेवा करायला ? पुढे प. पू. बाबा म्हणाले, "ह्या धूनमध्ये देव प्रत्यक्ष आला होता. ज्यांना देव बघायची खरोखर इच्छा असेल त्यांना तो प्रत्यक्ष दिसला असेल.'' हे त्यांचे शब्द व एका बाईने आजच प. पू. बाबांच्या भाषणानंतर तिचा जो अनुभव सांगितला त्यावरून तो देव, ती दिव्यता प्रत्यक्ष कुठे प्रगट झाली होती हे सुज्ञाला तावडतोब कळेल. ती बाई सांगत होती की समाधीची धून चालू असताना तिला प. पू. ताई हिरव्या साडीत दिसल्या आणि अशा रूपात की जणू साक्षात् देवीच !

अशी ही गुरुशिष्याच्या प्रेमाची रीतच न्यारी. एकमेकांना पुढे आण-ण्याचा अहमहमिकेने प्रयत्न करत असतात. तेच त्यांचे जीवन !

प. पू. ताईंनी प. पू. बाबांना वस्त्र, गुरुदक्षिणा व हार अर्पण केला. निरोप घ्यायला गेल्या तशी पुन्हा प. पू. ताईंनी लवकर यावे अशी प. पू. बाबांनी इच्छा प्रदर्शित केली. प्रेमाच्या माणसाचे रहाणे कधी तरी पुरेसे वाटते का ? ती तृषा सदा भुकेलीच रहाणार. इकडे प. पू. ताईंना मुंबईचे भक्त सोडायला तयार नसतात व तिकडे गणेशपुरीच्या माऊलीला त्या पुन्हा पुन्हा यायला हव्या असतात. अशी ही भक्ती व प्रेमाची रस्सीखेच नेहमीच चालू असते. प. पू. ताई निरोप घेऊन आल्यावर तक्रार करत होत्या की 'प. पू. बाबा काही कैश्या सोडत नाहीत. पुन्हा म्हणत होते की अशा इन्टेन्सिव्ह मध्ये 'गुरु'वर इंग्लिश भाषण देणार आहे (आणि ते ऐकायला तू ये...दुसरं काय !) आता लवकरच पुन्हा मी कशी जाऊ ! मला वाटले होते की चांगली तीन दिवस तीन रात्री भरपूर शक्तिपाताबद्दल समाधान व्यक्त करतील पण छे !' ही तक्रार, गोड तक्रार होती. जो साऱ्या जगाचा पिता त्याच्या हृदयात स्थान मिळाल्याची, त्याने आपल्याला एवढे चाहण्याची जाणीवच केवढी सुखावह ! प. पू. बाबांनी उघड उघड 'लवकर ये' अशी आज्ञा दिली नाही पण इच्छा मात्र प्रदर्शित केली. त्यामुळे प. पू. ताई म्हणत होत्या की 'गुरुंची आज्ञा पाळणे त्या मानाने सोपे की जितके त्यांच्या इच्छेप्रमाणे वागणे कठीण आहे.' खरोखर हे सारे पाहून म्हणावेसे वाटते—गुरुरूपी नारायण । विश्वंभर दीनोद्धारणा ।। आपण आपुली दावुनि खुणा । गुरुशिष्यरूपे क्रीडसी ।।

ॐश्रीगुरुदेव

# श्री उमानंद वागीश्वरी

दुष्टांच्या दुष्टाव्याळाही मर्यादा ही असणारच. त्याचाच फायदा साधुसंत घेतात. दुःशासन द्रौपदीचे वस्त्र फेडून फेडून शेवटी थकलाच ना! एकनाथांनीही १०८ वेळा थुंकणाऱ्याला शेवटी थकवलेच. जो तो आपल्या दुष्ट कर्मानेच थकणार हे नक्कीच. शुभ कर्माचे असे नसते. अपार शक्ती त्यात राहू शकते. शुभ कर्म शक्तीसंचय करते, तर दुष्ट कर्माने शक्तीक्षय होतो.

* * *

जीवनात अती सर्वत्र वर्ज्यच. कितीलाही महत्त्व नाही, क्वॉन्टिटीपेक्षा क्वालिटीला महत्त्व हवे.

सातत्य तेथे सत्य प्रगटणारच. आनंदाचे प्राकट्य प्रेम. प्रेमात चुचकळून निघालेले व्यक्तिमत्त्व यशस्वी कार्य करू शकते. निष्प्रेम जीवन रडके. हसण्याचीही ताकद नसते त्यात. हस आसूतच परिणत होते. सेवा मेवा ठरत नाही.

* * *

गुरुकृपेला मयूराण्डरसन्याय लागू होतो. गुरुकृपेच्या पोतडीतून जे तुम्हाला हवे ते मिळेल. गुरुभक्तीप्रीतीच्या हिणीने ही शिस्नी विगलेली असते. आतून बाहेर येते ते बाहेरून आत जाणाऱ्यापेक्षा अधिक प्रभावी, सूक्ष्म असते. गुरुच्या सान्निध्यातल्या व्यक्ती बाहेरून गुरुच्या मनात शिरतात तर गुरुपासून दूर राहणाऱ्यांची आठवण गुरुला झाली तर गुरुच्या हृदयातून तो भक्त बाहेर प्रगटला असे होईल. गुरुला आपली आठवण होणे महद्भाग्याची गोष्ट. अंतरातच अमृत स्त्रवले पाहिजे. मग बाहेरच्या अमृतरसाची गरज नसते.

दोरीच्या साह्याने बादली विहीरीतील खोल पाण्यापर्यंत पोहचते. तद्वत् बाह्य गोष्टींच्या आधारे अंतरी पोहचावे. बहिरंग साधनेने अंतरंगी उमाळे उठावेत. बाह्य गुरुमूर्तीध्यानाने हृदयस्थ सद्गुरु अंतरी प्रगट व्हावा.

* * *

अंतरीचा प्रकाश टॉर्चप्रमाणे आतून बाह्य जगावर जितका पडेल तितके खरे जगत् कळेल. जग व जगदीश दोन नाहीत; वेगळे, भिन्न नाहीत हे कळणाराच जाणतो. देवासाठी आवाज उठविला नाही की आवाज बसणारच. बाहेरून जयजयकाराचा आवाज उठविला की आतून मन शांत होते. मन आनंदात असल्याची खूण बाहेरून आवाज असतो.

* * *

जीवन व्यवस्थित, सुरळीत, नीटनेटके हवे तर सर्व वस्तू जागच्या जागी, नीट, सुलट, स्वच्छ, सुंदर, पवित्र ठेवा. मनातले विचारही सुखद, सुंदर, सुरेख, शुभ व शुभ्र ठेवा. नामजपाने वायुमंडळ शुद्ध होते. गुरुगीता शिवमहिमा, गुरुमहिमा, गुरुचरित्र, मुक्तेश्वरी, विष्णुसहस्रनाम मोठ्याने म्हणा. अंतरबाह्य वातावरण शुद्ध होईल. अरिष्ट टळेल, अनिष्ट दूर होईल.

जीवन आनंदाने जगणे हीच एक महत्तम कला, विद्या, शास्त्र, तंत्र, मंत्र आहे. ह्या कलेनेच खरी पूजा होते. मग दुसऱ्या कला शिकण्याचे मनातही येणार नाही. गुरुच्या निवासस्थानी सेवाकार्य मिळण्याइतके भाग्य नाही. तेथून दुसऱ्या ठिकाणी कार्यार्थ जाण्याची इच्छा होणे दुर्भाग्यच.

* * *

केला पण सोडू नये, मोडू नये.

इच्छाशक्ती वाढविण्याचा हा सोपा उपाय आहे. धरसोड नसावी. सुखदुःख भोगण्यास इंद्रियांचे, मनबुद्धीचे सहाय्य लागतेच. तसे आनंदाचे नाही. आनंद हा अंतरी असतो. आनंद दैवी संपदा, मानवी नाही. आनंदी असणं, राहणं, जगणं म्हणजेच इंद्रियातीत, त्रिगुणातीत होणे, सुखदुःखापलीकडे जाणे.

* * *

मन-मोकळे वागणे, बोलणे तेथे मन कधीच मोकळणार नाही. आक्रंदणार नाही. सुखद, शुद्ध बोल म्हणजे मनाच्या मोकळ्या, विकसित पाकळ्यातून निघालेला सुगंधच. मुक्या कळ्यांच्या मिटलेल्या पाकळ्यांतून आसमंतात सुवास कधी दरवळेल का? मुरड घातलेले ओठ अंतरी रडच मुरलेली दर्शवितात, ना की प्रसन्नता!

चालण्याची गती मंद करायची तर दोन पावलांमधील अंतर कमी करा, त्वरा करायची तर पावलांच्या ढांगा करा.

* * *

ईश्वरपात झाल्याची खूण ईश्वराची ओढ लागते. गुरुकडून शक्तिपात झाल्याची खूण गुरुची ओढ लागते. प्रेयस मार्गावरून श्रेयस मार्गाला लागणे, विचारांची दिशा बदलणे, प्रपंचाचे विचार न करता परमार्थाचे विचार करणे, विचारांची गुणवत्ता बदलणे, फक्त एक गुरुचेच विचार करणे, विचारांची संख्या कमी करणे. गुरुभक्तीत तीन्ही एकदम साधतात.

* * *

यज्ञ, दान तपः कर्म न त्यजेत्, पण कलियुगासाठी यज्ञ, तप, धार्मिक कृत्ये देवदेवतार्चन सोयीची नाहीत. सेवा व दान हीच साधने, नामजप यज्ञ ह्या युगासाठी होत. शूद्राचेच गुणधर्म जास्त. ब्राह्मणाचे गुण अंगी नसतांना यज्ञ, कर्म व तापस कसे होणार! दीर्घायुष्य, आरोग्य, स्थळकाळाची अनुकूलता नाही.

* * *

स्वधर्म पालन म्हणजे सर्वत्र, सर्वांत परमेश्वर बघून जीवन व्यतीत करणे. सत्ला, परमेश्वराला, गुरुला स्मरून आचरण असणे हाच सदाचार.

कितूरहित गुरुप्रेम हवे. गुरुच प्रगट परमेश्वर. जेथे परमेश्वर तेथे लोटा रडे होणारच, ना की लोटांगणपणा, फसवाफसवी चालणार. चितीचा विलास तेथे हिशोब खलास.